म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

९५३

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

# मि० जॉन् ब्राईट्.

जन्म, १८११. मृत्यु, १८८९.

'भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम्।'

आजकाल आमच्या राज्यकर्त्यांचा देश जो सत्ता व संपत्ति यांचे योगानें सर्व पृथ्वींतील देशांपेक्षां श्रेष्ठ बनला आहे, त्याचें कारण त्या देशांतली कारागिरी. कारागीर व कसबी लोक यांचें वर्चस्व त्यांचे देशांत किती झालें आहे, याचीं प्रमाणें आपले समोर वारंवार येत आहेत. म्यांचेस्टर येथील लोकांची मर्जी राखण्याची खटपट लार्ड रिपनसारख्यांस करावी लागली, याचेसारखें या लोकांच्या प्रबलतेचें आणखी कोणचें प्रमाण सांगावें? या लोकांचें इतकें वर्चस्व होण्यास व त्यांचें एवढें प्राबल्य होण्यास जे पुरुष कारण झाले आहेत, त्यांतलेच जॉन् ब्राईट् हे एक आहेत. आपण शेतकरी, कारागीर वगैरे मध्यम स्थितींतल्या लोकांचे अग्रणी आहों, असें ह्मणून घेण्यास इंग्लंडांत पुष्कळांना आवड असे. या प्रकारच्या मानांत जर कांहीं तथ्य असेल, तर जॉन् ब्राईट् हे सर्व प्रकारें त्यास योग्य आहेत. जॉन् ब्राईट् यांचे पूर्वज कारागीर होते. त्यांचे वडील कारागीरच. यांचा वस्त्रें विणण्याचा माग होता. पुढें त्यांची त्या कामांत चांगली मति चालते असें पाहून कित्येक मित्रमंडळीनें भांडवल जमवून त्यांना एक वाफेचा वस्त्रें विणण्याचा कारखाना उठवून दिला. जॉन् ब्राईट् यांचा बापाचा धंदा चालविण्याचाच संकेत होता. परंतु ईश्वरी संकेत कांहीं निराळाच असतो. जॉन् ब्राईट् हे कारखानदार तर झालेच, परंतु त्या वेळच्या लोकस्थितीमुळें त्यांनीं आपलया व्यवसायबंधूंची राजकीय स्थिति सुधारण्याकडे लक्ष्य लावून ते इंग्लंडांत पहिल्या प्रतीचे राज्यकारस्थानी होऊन बसले.

जॉन् ब्राईट् यांस प्रस्तुतच्या मोठ्या मोठ्या राज्यधुरंधर पुरुषांप्रमाणें उच्चशिक्षण मिळालें नव्हतें. त्यांचे वडील 'मित्रमंडळ' अशा अर्थाच्या

नांवाच्या एका धर्मपंथांतले होते; त्यांच्या रीतीप्रमाणें त्यांस मित्रमंडळी-चे साह्यानें साधें परंतु पायाशुद्ध असें शिक्षण मिळालें होतें. जॉन् ब्राइ-ट् हे आरंभीं मोठेसे वक्तेही नव्हते. वक्तृत्वकला आपल्यास पाहिजे असें जेव्हां त्यांना वाटलें, तेव्हां त्यांनीं त्या कलेचा मुद्दाम अभ्यास करून तदं-गभूत असे गुण यत्नानें संपादन केले. त्यांची बुद्धि स्वभावतः तीव्र होती. व कारागीर वगैरे साधारण प्रतीचे लोकांची स्थिति पाहून त्यांच्या संबंधाचे दुःखकारक प्रकार बंद करण्याकडे त्यांच्या स्वाभाविक स्वदेशाभिमानामुळें त्यांची प्रवृत्ति झाली. व त्या वेळच्या देशस्थितीच्या योगानें त्यांस त्या कामांत शिरल्यावर आपोआप राजकीय शिक्षण मिळालें. सन १८३२ सांत इंग्लंडांत एक जंगी वादविवाद चालला होता.त्यानें सर्व देश खळबळून गेल्यासारखा झाला होता. पार्लमेंटांत सभासद पाठविण्याची तेव्हांची जी रीत होती, ती फार जुनी होऊन तींत केवळ अंदाधुंदी चालली होती. कोणच्याही गांवांत लोकसंख्या किती आहे, याचा विचार न राहतां मामूल वहिवाटीप्रमाणें कमी किंवा जास्त सभासद निवडून जात. कित्येक प्रांताच्या भागांत एकाद दुसरा मतदार शिल्लक राहिला असून तेथून आ-पले अमुक एक सभासद जातच असत! पुनः देशांतल्या प्रजाजनाच्या स-मजुतींत व विद्याप्रसारांत फरक पडत असून व नवीन व्यवस्था करावयास पाहिजे होती असें असून ती करण्याचें अनेक कारणांनीं मागें पडत चा-ललें होतें. श्रीमंत लोक व लार्ड वगैरे लोक, यांतले पुष्कळजण या नवी-न व्यवस्थेस विरुद्ध होते. कारण चालू असलेल्या व्यवस्थेनें त्यांना मनास वाटतील ते सभासद आणण्यास व हवें तें करण्यास सांपडे. खुद्द रा-जाची सुद्धां या नवीन व्यवस्थेस संमति नव्हती. पण लोकमताचे जोरा-पुढें कांहींएक न चालून हा नवीन व्यवस्थेचा कायदा या वर्षी पास क-रावा लागला. जान् ब्राइट् हे या वेळीं पार्लमेंटांत नव्हते. परंतु त्यांनीं या देशहिताच्या गोष्टींत मन घालून ठिकठिकाणीं नवीन व्यवस्थेच्या बा-जूनें भाषणें केलीं. याचे योगानें मुख्यतः त्यांस दोन लाभ झाले. एक, ते लोकांस चांगले रीतीनें माहीत झाले; व दुसरा, ते चांगले वक्ते बनून रा-जकीय गोष्टींचें शिक्षण त्यांस अनायासें मिळालें.

तथापि जॉन् ब्राइट् यांची जी एवढी कीर्ति झाली, ती दुसऱ्याच एका कामांत पडल्यामुळें झाली. परमेश्वराच्या योजना कांहीं विचित्र असतात.

सन १८४१ या वर्षी जॉन् ब्राइट् यांस पत्नीचा मरणानें वियोग होऊन त्यांचा संसार विस्कळित झाला. ते केवळ निराश होऊन बसले होते. तों मि० कॉबडन् या नांवाचे गृहस्थ, ज्यांची यांची पूर्वी चांगली ओळख झाली होती, ते त्यांस भेटावयास आले. शांतवन करितांना ते ह्मणाले, "तुमचें दुःख मोठें आहे खरें; परंतु तुह्मीं आपल्या भोंवतालच्या देशबांधवांकडे पाहिलेंत, तर तुमचें दुःख तुह्मांस कांहींच वाटणार नाहीं! आज हजारों लोक आपल्या बायका पोरांसुद्धां या जुलमी धान्याचे कायद्यामुळें उपाशी मरत आहेत. त्यांना दुःखांतून सोडविण्याचे कामांत जर आपण मला मदत कराल, तर तुह्मांस दुःख विसरून जाण्यास एक उत्तम मार्गच सांपडेल." अगोदर जॉन् ब्राइट् यांस देश-हिताच्या कामांत पडण्यास बोलावणें कधीं लागतच नसे. त्यांत यावेळीं त्यांच्या दुःखाचा विसर पडण्यास त्यांस असलाच कांहीं धंदा पाहिजे होता. मि० कॉबडन् यांचे ह्मणण्याप्रमाणें ते लागलेच त्यांस मिळाले. व तेव्हांपासून त्यांनीं या लोक-हिताच्या कामांत अविश्रांत खटपट करून आपल्या देशबांधवांचें अतोनात कल्याण केलें व आपलें नांव अमर करून ठेविलें. मि० ब्राइट् यांचें जगांत नांव होण्यास हा त्यांचा बडा उद्योगच कारण आहे. यासाठीं त्या संबंधाची हकीगत येथें सविस्तर दिली पाहिजे.

या वेळीं विलायतेंत धान्याचे व्यापाराचे संबंधानें कडक कायदे होते. शेतकऱ्यानें पिकविलेलें धान्य खपावें व बाहेर देशांतलें धान्य देशांत फार येऊं नये, ह्मणून धान्यावर जब्बर जकात बसविली होती. हा प्रकार दुसऱ्या देशांतून येणाऱ्या धान्यांचे संबंधानेंच होता असें नाहीं; तर खुद्द देशांतल्या देशांतच एका प्रांतांतील धान्य दुसरे प्रांतांत जातांनाही जकात घेत. प्राचीन काळीं असल्या कडक कायद्यापासून काय लाभ झाला असेल हें आह्मी पहात बसत नाहीं. परंतु या वेळीं देशांतले देशांत व इतर देशांशीं व्यापार करण्याचीं साधनें इतकीं वाढलीं असतां व लोकस्थिति पालटली असतां हे कायदे लोकांस फारच त्रासाचे होऊन गेले होते. यामुळें गरीब लोकांचे निर्वाहाचीं धान्यें महाग विकत. शेतकऱ्यांपासून पैसेवाल्या सावकार मंडळीस हवे तसे पैसे काढून घ्यावयास सांपडत व जमीनदार वगैरे लोकांचें हवें तसें फावे. हे कायदे मोडून टाकावे ह्मणून अनेक वर्षें ओरड चालली होती. परंतु तिला यश आलें नाहीं.

अखेरीस या वर्षी मि० कॉबडन् व मि० ब्राईट् यांनीं मिळून सर्व देशभर लहान मोठ्या मंडळ्या स्थापन करून सर्वत्र सारखी ओरड चालविली. लोकांचें मत ह्या गोष्टीच्या विरुद्ध व्हावें ह्मणून अनेक खटपटी केल्या. मित्र मंडळी त्यांस पार्लमेंटांत जावयास सांगत होती. पार्लमेंटमध्यें शिरून राज्यधुरंधर पुरुष बनावें, अशी जॉन् ब्राईट् यांची इच्छा नव्हती. पण या कामांत उपयोग होईल, ह्मणून ते सन १८४३ त सभासद झाले. सभासद झाल्यावर मात्र त्यांनीं फार मन लावून काम केलें. मि० कॉबडन् हे पार्लमेंटांत होतेच. या दोघांनीं व त्यांचे मित्रमंडळीनें मोठी खटपट करून पार्लमेंटच्या सभासदांचीं आपल्या तर्फेनें मनें वळविलीं; व अखेरीस त्या वेळचे मुख्य प्रधान मि० पील यांचेंही मन वळवून धान्याच्या व्यापाराचे कायदे रद्द करविले, व धान्यांचा व्यापार सुरक्षित चालू केला.

आमच्या इकडे मिठाचा कर आहे, त्याच्या व्यवस्थेकडे लक्ष दिलें असतां हे धान्याचे कायदे कशा प्रकारचे होते हें ध्यानांत येईल. अर्थ-शास्त्राचा असा नियम आहे कीं, सरकारास कर बसविणें झाल्यास त्यानें तो नेहमींच्या निर्वाहाचे पदार्थांवर बसवूं नये; त्यापासून प्रजेस फार त्रास पोंचतो. जे पदार्थ नसले तरी निर्वाह होईल, व जे प्रजा केवळ चैनीकरितां घेत असते, अशा पदार्थांवर कर बसविला असतां गरीब व गरजू लोकांस त्रास न पोंचतां श्रीमंत व चैनी अशा लोकांस मात्र कर द्यावा लागेल. हा जो अर्थ-शास्त्राचा नियम, त्याकडे आमच्या सरकारानें मिठावरील कर बसवितांना पूर्ण डोळेझांक केली आहे. दुसरें अर्थ-शास्त्राचें सांगणें असें आहे कीं, व्यापार अव्याहत असावा; ह्मणजे देशांत येणारा माल व देशांतून जाणारा माल यांचेवर कर बसवूं नये. अशा रीतीनें आलेला व बाहेरचा व्यापार करावांचून मोकळा ठेविला, ह्मणजे व्यापारी लोकांस एकमेकांच्या मालापासून पाहिजे त्या रीतीनें नफा खाण्यास सांपडतो; लांडी लबाडी होत नाहीं. चोरून माल विकला जात नाहीं, व मालांत भेसळही होत नाहीं. दुसरी एक व्यापाराची रीत आहे त्यास ‘ सुरक्षित व्यापार ’ ( Protection ) असें ह्मणतात. याचा उद्देश असा असतो कीं, आपल्या देशांत एकादा जिन्नस उत्पन्न होण्यासारखा असला व दुसरे देशांतून तो येऊन नफा परकी

लोक खातात असें दृष्टीस पडलें कीं, सरकार बाहेरून येणारे मालावर कर बसवून त्यास किंमत फार पडेल असें करितें. मग अर्थात् लोक तो माल देशांत उत्पन्न करूं लागतात. उदाहरणार्थ, चालू शतकाचे आरंभीं इंग्लंडांत कापसाचीं वस्त्रें हिंदुस्थानांतून जात असत. तीं आपले देशांत विणून तयार होतील असें इंग्लंडास वाटून त्यानें हिंदुस्थानचे मालावर जब्बर कर बसविला. त्याचा परिणाम काय झाला, व कापसाचे व्यापाराचा ओघ आज सर्वस्वी कसा फिरला आहे, हें आपण प्रत्यक्ष पहातच आहों. अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांनीं ही अशीच रीत स्वीकारून आपल्या देशांत होण्यासारखा बाहेरून येणारा जो पदार्थ दृष्टीस पडेल, त्याचेवर जब्बर कर बसविला आहे. यामुळें उत्तरोत्तर तसले पदार्थ त्यांच्या देशांत होऊं लागले आहेत. या संबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हा 'सुरक्षित व्यापार' बहुधा लोकांस ज्या पदार्थाची अत्यंत जरूर, त्याचे संबंधानें कधीं मर्यादित करीत नाहींत. अर्थ—शास्त्रवेत्त्यांपैकीं पुष्कळांस तर ही रीत अमान्य आहे. त्यांतून सर्व प्रकारचे बारीक जाडे पदार्थ ज्या देशांत उत्पन्न होतात, त्या इंग्लंडांत तर हा व्यापार कोणास कधींच बरा वाटणार नाहीं. अशी व्यापाराची रीत ही पुनः नियमित मुदतीपर्यंतच अमलांत असली पाहिजे, असें अर्थशास्त्रवेत्त्यांपैकीं जे या रीतीस अनुकूल आहेत, त्यांचें मत आहे. आमचे देशाचे संबंधानें आमच्या राज्यकर्त्यांनीं सर्वत्र स्वतंत्र व्यापार सुरू असावा, अशी रीत काढिली आहे. परंतु आमचा सर्व व्यापार आमच्या राज्यकर्त्यांच्या देशाशीं व आमचे इकडे एकादा पदार्थ उत्पन्न होऊं लागला, तर त्यांचाच माल कमी खपूं लागणार यामुळें जी रीत बरी वाटेल ती चालू असते. मिठावर कर बसवितांना अव्याहत व्यापाराचे व अर्थशास्त्राचे नियम गुंडाळून ठेविले आहेत. रुप्याचे सामानावरील कर नुकताच उठविण्याचा बेत अर्धवट ठरला. आमच्या देशांत अनेक सरकारी कामें करण्याजोगे व स्वस्तांत मिळण्यासारखे लोक विद्या शिकून मोकळे भटकत फिरत आहेत; त्यांस नोकरी धंदा मिळत नाहीं, आणि तशा जाग्यांवर सरकार मोठ्या पगाराचे व या देशाचे संबंधानें सर्वस्वी गैरमाहितगार, असले आपले जातभाई आणून लावितें. पण इकडे कापडाच्या व्यापारास पूर्ण रीतीनें अव्याहत करून टाकिलें आहे! असो; इतक्या हकीगतीवरून व्यापाराच्या संबंधाच्या गो-

ष्टी वाचकांस नीट समजतील. इंग्लंडांत या वेळीं अशी व्यवस्था होती कीं, देशांत उत्पन्न होणारें धान्य बाहेर खपावें व त्यास चांगला दर यावा, ह्मणून बाहेरून येणारे धान्यावर कर बसवून त्याचा दर चढवून टाकिला होता. दुसरें कारण, फ्रान्स, रशिया, जर्मनी वगैरे देशांतील लोकांस इंग्लंडच्या व्यापाराचा मत्सर वाटून ते इंग्लंडच्या व्यापाराच्या मालावर कर बसवीत; त्याबद्दल परत सूड उगविण्यासाठीं ह्मणून इंग्लंडांतही कर बसविला जात असे! पण यामुळें लोकांस अत्यंत उपयोगाचे पदार्थ जीं धान्यें वगैरे, तीं फार महाग झालीं. देशांतले देशांत पुरून उलट बाहेरच्या लोकांस पुरवितां येईलच, इतकें धान्य कांहीं इंग्लंडांत पिकत नाहीं इतकेंच नाहीं, पण बाहेरून धान्य आल्याखेरीज इंग्लंडांतल्या लोकांचा निर्वाह नाहीं. या कारणानें सरकारानें चांगल्या बुद्धीनें जरी ही व्यवस्था केली होती, तरी त्यापासून रयतेस अत्यंत त्रास पडूं लागला. गरिबांस असें वाटूं लागलें कीं, आमच्या अन्नाच्या प्रत्येक घासावर सरकारानें कर बसविला आहे. परंतु या कामांत पुष्कळांची समजूत पडलेली नव्हती. पुष्कळांना वाटे कीं, हा कर काढला कीं एक तर सरकाराचें उत्पन्न कमी होईल; दुसरें बाहेरचीं धान्यें स्वस्त मिळूं लागलीं ह्मणजे देशांतल्या धान्यांचा दर उतरून आपापलीं उत्पन्नें कमी होतील. अशा प्रकारच्या समजुती असल्यामुळें मि० ब्राईट् व त्यांचे स्नेही मि० कॉबडन् यांस सभा स्थापन करून, लेख लिहून, व्याख्यानें देऊन मोठीच खटपट करावी लागली. विरुद्ध पक्षानेंही फार खटपट चालविली होती. श्रीमंत लोक, व त्या वेळची प्रधान मंडळी, जिचे सर राबर्ट पील हे मुख्य होते, हे सर्व या गोष्टीस अगदीं विरुद्ध होते. यामुळें कित्येक वेळां तर दंगा होण्याचाही प्रसंग येत असे. मि० कॉबडन् हे पार्लमेंटचे सभासद होते. मि० ब्राईट् हेही मोठ्या मेहनतीनें इ. स. १८४३ या वर्षी डरह्याम तर्फे सभासद झाले; व त्यांची खटपट जारीनें सुरू झाली. अखेरीस त्याच सुमारास एैर्लंडांत भयंकर दुष्काळ पडला, त्यानें त्यांच्या मतांच्या पुष्टीकरणार्थ मोठेंच साह्य केलें! पुढें मुख्य प्रधान मि० पील यांचीं मतेंही त्यांचे सारखींच होऊन सन १८४६ या वर्षी धान्यावरील कायदे सर्वस्वी रद्द होऊन गरीब लोकांच्या भाकरीवरचा कर उठला. मि० पील हे कान्सरव्हेटिव् पक्षाचे असूनही त्यांनीं या गोष्टीस आपलें मत दिलें, व कर उठविण्याची

पूर्ण खटपट केली. यामुळें त्यांच्या पक्षानें त्यांस सोडिलें व त्यांस राजीनामा द्यावा लागला. धान्यावरील कर काढून टाकल्यानंतर आणखी पुष्कळ व्यापाराचे जिनसांवरील कर काढले जाऊन अव्याहत व्यापाराचीं तत्त्वें हळू हळू पूर्णपणें अमलांत येत गेलीं. यामुळें गरीब लोक, कारखानदार व कारागीर यांची स्थिति फार सुधारली. त्यांचा माल बाजारांत चांगल्या रीतीनें खपत गेला, व इंग्रज लोकांचे व्यापारास चोहोंकडे तेजी आली.

मि० ब्राईट् या वेळीं जे राज्यकारभारांत शिरले, ते शेवटपर्यंत राज्यकारभारांत होते. डरह्याम नंतर ते कांहीं दिवस लिव्हरपूल तर्फे सभासद होते. व शेवटचीं बहुतेक वर्षें बरमिंगह्याम तर्फे सभासद होते. मि० ब्राईट् राज्यकारभारांत होते, तरी ते बहुतेक उदासीनच होते. याचें कारण त्यांच्या पक्षाच्या पुढारी मंडळीचें व त्यांचें बनत नसे. मि० ग्लाड्स्टन् यांचा व त्यांचा अत्यंत स्नेह होता व दोघेही एकमेकांस फार मानीत असत. परंतु मि० ब्राईट् यांस राज्यकारभारांतल्या कित्येक गोष्टी आवडत नसत. मुख्यतः दुसऱ्या देशांशीं लढाई करणें, मोठालीं सैन्यें व आरमारें ठेवणें व शत्रु हल्ला करील या भयानें अतोनात खर्च करून बंदोबस्ताच्या तजविजी करणें, या गोष्टी त्यांस आवडत नसत. ते ह्मणत कीं गरीब लोकांनीं निढळच्या घामानें मिळविलेल्या पैशाचा विनियोग अशा रीतीनें करणें हें फारच अन्यायाचें आहे. लढायांच्या पायीं व सैन्यें आणि आरमारें राखण्याचे भरीं भरून जे कोट्यवधि रुपये आपण खर्च करितों, ते सर्व कारखान्यांत किंवा दुसऱ्या अनेक लोकोपयोगी कामांत पडले, तर गरीब रयतेस किती उपयोगीं पडतील? जोंपर्यंत मनुष्यांची स्थिति केवळ रानटी होती, व एकजण कांहीं बोलला कीं दुसऱ्यानें चिडून जाऊन तरवार उपसावी व दुसऱ्याचा गळा कापण्यास धांवावें असा प्रकार रात्रंदिवस चालू होता, तोंपर्यंत लढाया होऊन हजारों मनुष्यें असत्या आयुष्यांत बळी पडत, देशांतील शेताभातांचा व घरादारांचा नाश होई, व कोट्यवधि रुपयांचा फन्ना पडे हें ठीक होतें. पण मनुष्य इतका सुधारल्यावर व समजूतदार झाल्यावरही त्यानें यःकश्चित् कारणासाठीं चिरडीवर यावें काय? आजकाल शास्त्रीय शोधांनीं मनुष्यानें अनेक गोष्टींनीं व अनेक रीतींनीं आपणास पूर्णत्वास आणण्याची

खटपट सारखी चालविली आहे. जरा कांहीं जखम झाली कीं, जीवित्वाचा नाश होऊं नये ह्मणून आपण खटपटी करितों. पण आमचा रानटी स्वभाव अजून आहे तसाच कायम आहे. राष्ट्रीय मत्सर व गैरसमज आमचे अजून नष्ट झाले नाहींत. युरोपांतील राष्ट्रें एवढीं शहाणीं व सुधारलेलीं आहेतना, पण उद्यां फ्रान्सास जर्मनीचे विरुद्ध ब्र काढूं द्या, कीं जर्मनी आपलीं या एकोणिसाव्या शतकांतलीं माणसें मारण्यांत अत्यंत प्रवीण अशीं शस्त्रास्त्रें सरसावून फ्रान्सावर धांवून जाईल, व लाखों माणसें बळीं पडून कोट्यवधी रुपयांचा फन्ना उडेल! मि० ब्राईट् हे ह्मणत असत कीं, वस्तुतः एका राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्राशीं लढाई करण्याचें या शहाणपणाचे व सुधारणेचे युगांत कारणच नाहीं. तंट्याचें कारण आल्यास चार तिऱ्हाईत नेमून त्यांच्याकडून तंटा मिटवावा. व क्षुल्लक तंट्याचें कारण—ज्याचेकरितां आपण लढाया करितों—त्याची किंमत लढायांपासून होणाऱ्या तोट्याचे मानानें केवळ क्षुल्लक असल्यामुळें प्रत्येक राष्ट्रानें तोटा सोसण्यासही तयार व्हावें. मि० ब्राईट् हे राज्यकारभारांत शिरले, तेव्हांपासूनच बहुधा इंग्लंडास रशियाची फार भीति वाटत आहे. रशिया हिंदुस्थानावर येऊन आपले राज्यास अपाय करील, या भीतीनें कित्येक राज्यधुरंधर पुरुषांस झोंप सुद्धां येत नसेल! यामुळें रशियास नेहमीं दाबांत ठेवण्यासाठीं इंग्लंडचे अनेक उपाय चालू आहेत. या उपायांचे योगानें इंग्लंडास काय फायदे झाले असतील किंवा होणार असतील ते असोत; पण त्यामुळें आमच्या देशास जें भयंकर नुकसान सोसावें लागलें आहे व लागत आहे, त्याची आठवण नेहमीं राहील! इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांत येऊन राज्य स्थापितांना दुसरे राष्ट्रांची संमति थोडीच घेतली होती! मग त्यांनीं रशियाच्या मध्यएशियेंतील खटपटींत मन कां घालावें? हिंदुस्थानांतील आपल्या राज्याचें रशियापासून संरक्षण करणें हें इंग्लंडचें काम आहे. रशिया येण्याची भीति दूरच असतां उगाच काल्पनिक गोष्टींवर विश्वास ठेवून रशियाशीं कुरापती काढाव्या, व तिकडे क्रिमियनच्या लढाईप्रमाणें व इकडे आफगाणिस्थानच्या स्वाऱ्यांप्रमाणें कामें अंगावर घेऊन रयतेच्या निढळाच्या घामाच्या पैशाचा फन्ना उडवावा, हा अन्याय होय. या कामांत फक्त आमचे देशाचा जो पैसा खर्च झाला व होत आहे, तेवढा जरी गरीब लोकांच्या हातीं येता व पुढें

येईल, तरी गरीब प्रजा जी सध्यां उपाशी मरत आहे, ती खुष व टवटवीत राहून उद्यां रशिया आलाच, तर इंग्रज सरकारच्या बरोबरीनें त्यास तोंड देऊन आपले प्राण अर्पिण्यास तयार झाली असती ! पण आतां पहा; आजपर्यंत झालेल्या उधळपट्टीपासून तिळमात्र फायदा तर झाला नाहीं. गरीब प्रजा मात्र निःशक्त व असंतुष्ट झाली, एवढें सरकारानें मिळविलें ! या सर्व मुद्यांवर मि० ब्राईट् यांस लढाई मुळींच आवडत नसे. सर्व तोडजोडीचे प्रकार आटपून व थोडें बहुत नुकसानही सोसून मग जर एकादे हट्टी राष्ट्राबरोबर लढाई करण्याखेरीज गत्यंतर नाहीं असें झालें, तर मात्र लढाई करावी, असें त्यांस वाटे. त्यांचे अमदानींत आमचे सरकाराची मोठी लढाई रशियाबरोबर क्रिमिया येथें झाली. हा प्रकार मि० ब्राईट् यांस न आवडून लढाईचे बेत चालले असतां मि० ब्राईट् यांनीं अनेक ठिकाणीं विरुद्ध भाषणें केलीं; व सरकारचें मन वळावें ह्मणून प्रयत्न केले. परंतु या कामांत त्यांस यश आलें नाहीं. मनुष्यास स्वभावतःच पोकळ डौलाची व दुसऱ्यावर वर्चस्व मिरविण्याची हौस फार. लढाईत या दोन्ही गोष्टी साधतात. मि० ब्राईट् यांच्याप्रमाणें या गोष्टीचा तात्त्विक दृष्ट्या विचार करणारे कितीसे सांपडतील ? आपल्या शिपायांनीं अमुक लढाया जिंकल्या, अमुक लोक मारिले, अमके किल्ले घेतले, अमकीं निशाणें काबीज केलीं, इत्यादि डौलाच्या गोष्टींपुढें ब्राईट्सारख्यांच्या तात्त्विक विचारांचें तेज काय पडणार ? खेरीज पुढारी, विद्वान् व राज्यधुरंधर पुरुषांतही ब्राईट् यांचे मताचे लोक अगदीं थोडे होते. यामुळें मि० ब्राईट् यांचें कोणीं ऐकलें तर नाहींच, पण त्यांनीं लोकांचा द्वेष मात्र संपादिला. तितक्यांतच क्रिमियाचे लढाईत इंग्रज पूर्णपणें यशस्वी झाले. यामुळें तर ब्राईट यांचा पक्ष अगदींच पडून त्यांस निमूटपणें बसावें लागलें ! त्यांनीं लोकहिताचे कामीं झटून व गरीब लोकांची भाकर स्वस्त करून एवढी लोकप्रीति संपादिली होती, व आपलीं मतें फारशीं लोकांस आवडत नाहींत हें पाहून स्वस्थ बसले ह्मणून बरें झालें, नाहीं तर लोकांनीं त्यांस वेड्या माणसांच्या माळिकेंत गोंविलें असतें ! याप्रमाणें मि० ब्राईट् यांचीं मतें होतीं; व प्रधान मंडळींत लढाईचा विचार वारंवार निघणारच, यामुळें मि० ब्राईट् हे एरव्हीं इतके हुषार व स्वदेशाकरितां झटणारे असतांही त्यांचा त्या मंडळींत प्रवेश झाला

नाहीं. तथापि ते बाहेर राहूनही आपल्या पक्षाच्या फार उपयोगीं पडले. महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनीं मोठालीं भाषणें करून अनेक प्रसंगीं लोकमत उत्पन्न करण्याच्या खटपटी केल्या आहेत. ते पार्लमेंटांत लिबरलपक्षाचे आधारस्तंभ होते. प्रधान मंडळींत कधीं तरी आल्याखेरीज कोणाची प्रसिद्धी होत नाहीं, व राज्यधुरंधर पुरुष ह्मणून नांव मिळत नाहीं. पण जॉन् ब्राइट् यांस बाहेर राहूनच तें नांव मिळालें होतें. मि० ग्लाड्स्टन् यांची व जॉन् ब्राइट् यांचीं बहुतेक मतें मिळत, यामुळें त्यांचा अकृत्रिम स्नेह होता. मि० ग्लाड्स्टन् हे यांचा नेहमीं सल्ला घेत. परयांच्या ऐरिश प्रकरणांत जरी जॉन् ब्राइट् हे मि० ग्लाडस्टन यांच्या विरुद्ध बाजूला होते, तरी एकमेकांची परस्परांबद्दल पूज्य बुद्धि कमी झाली नाहीं, व स्नेह व पत्रव्यवहार यांत अंतर पडलें नव्हतें. ही गोष्ट आपण ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. यःकश्चित् कारणासाठीं किंवा एकाद्या गोष्टींत भिन्नमत पडलें कीं, आपण एकमेकांस शत्रू लेखूं लागतों. परंतु थोर पुरुषांचें वर्तन असें कधींही नसतें.

याप्रमाणें मि० ब्राइट् हे बाहेर राहूनच देशसेवा करित असतां त्यांचे मित्र मि० ग्लाड्स्टन् मुख्य प्रधान होऊन त्यांनीं मि० ब्राइट् यांस सन १८६७ या सालीं प्रधान मंडळींत प्रथमतः जागा दिली. परंतु त्यांचा उपयोग देशास फारसा झाला नाहीं; कारण आजारीपणामुळें ती जागा त्यांस सोडावी लागली. पुढें सन १८८३ सालीं मि० ग्लाड्स्टन् यानीं पुनः त्यांस राज्यकारभारांत घेतलें. पण लौकरच इजिप्त देशाचा प्रश्न उत्पन्न होऊन त्या देशांत इंग्रजी सैन्य न्यावें व आलेक्झांड्रिया शहरावर तोफा सुरू कराव्या असा प्रधानमंडळीचा विचार ठरला. या गोष्टीस मि० ब्राइट् यांचें अनुमत न मिळून त्यांनीं आपल्या कामाचा राजीनामा दिला. राज्यकारभाराचे संबंधानें मि० ब्राइट् हे आपल्या एका भाषणांत ह्मणतात:" मी राज्यधुरंधर पुरुषांत आपली गणना करीत नाहीं; प्रधानाचें पद मिळण्याची माझी इच्छाही नाहीं. प्रधान या शब्दाचा अर्थ सध्या चमत्कारिक झाला आहे; इमानानें देश-सेवा ज्यास करावयाची असेल, त्यांस तें नांव खचित आवडणार नाहीं. मला देशाचे राज्य कारभारांत पडून तीस वर्षे झालीं, परंतु या दुसऱ्या सरदार वगैरे मंडळींप्रमाणें मीं प्रधानाची जागा पत्करून आपले हात बांधून घेतले नाहींत. कारण वाग येईल तशी पाठ

सं.ग्रं. ६३।६८

करणें ही गोष्ट मला साधावयाची नाहीं. ज्यांनीं मला आपले तर्फे नेमिलें आहे, त्यांना मी आपलें काम सरासरी करितों असें वाटेल; पण मी प्रत्येक गोष्ट करितों ती इमानानें करितों, असें त्यांस वाटल्यावांचून खचित राहणार नाहीं. हा जो आज लढाईचा प्रश्न उत्पन्न झाला आहे, त्यांस मी एकटाच विरुद्ध आहे असें नाहीं. पण जरी मी एकटाच विरुद्ध असलों, तरी पांच दहा मंडळीच्या मनाच्या समाधानासाठीं लोकांनीं निढळाच्या घामानें मिळविलेला पैसा उधळणें व तरुण व उद्योगी लोकांचें रक्त सांडणें या गोष्टीस मीं संमति दिली नाहीं, एवढ्याच गोष्टीचा मला फार अभिमान वाटतो." प्रधानाची जागा ह्मणजे साधारण नाहीं. या जागेची मिळकत वर्षाची सुमारें दीड लाख रुपये असते. खेरीज आप्त इष्टांचें कल्याण करण्याची सवड, व थोरपणा आणि नांव, या गोष्टी निराळ्याच. पण 'निस्पृहस्य तृणं जगत्,' असें ज्यांचें ब्रीद, त्या ब्राईट सारख्या गृहस्थांना देशसेवा इमानानें करणें, याशिवाय दुसऱ्या कोणच्या गोष्टीची पर्वा असणार? बाकी स्वतंत्र अशा इंग्लंड देशांतही अशा प्रकारचे निस्पृह थोडे आढळतील. आपले मित्र, हितकर्ते, वरिष्ठ, अशांची मर्जी संपादण्याकरितां व पैशाच्या लोभानें आपलें स्वतःचें मत मनांतल्या मनांत राखून हित साधून घेणारे लोकच फार. आमच्या इकडे अंशतः तरी असा निस्पृहपणा बाळगणारे लोक उत्पन्न झाल्याखेरीज देशोन्नतीची आशा नको. आमच्यांतली विद्वान् व पुढारी मंडळी बहुधा सरकारची एकनिष्ठ सेवा करणारी मंडळी असणार. पण अशांना निस्पृहपणा दाखविण्याचा प्रसंग आला असूनही रुपेरी बिडी तोडतां आली नाहीं, अथवा पैशाचा लोभ तुटला नाहीं, अशीं उदाहरणें पाहिजे तितकीं आढळतील. आमच्यांतले कितीक अपमान सोसून निमूटपणें महिन्याचे महिन्यास पगार घेऊन आनंद मानीत असतील! त्याचप्रमाणें सामाजिक गोष्टींत कोणच्याही प्रकारापासून सुटका करून घेण्यासाठीं घरच्या ह्याताऱ्या कोताऱ्या माणसाकडे बोट दाखवून वेळ मारून नेणारे किती आढळतील? अमुक पाहिजे, तमुक पाहिजे, अमुक करावें, तमुक करावें, असें तोंडानें बोलणें सोपें; परंतु अंगास चट्टा लावून घेऊन बोलण्याप्रमाणें कृति करून दाखविणें फार कठीण. याकरितांच मि० ब्राईट् सारख्यांचें वर्तन कित्ता घेण्यासारखें होय. मि० ग्लाड्स्टन् यांना कांहीं लढाईंत

आपला पैसा व माणसें खर्ची पाडण्याची हौस होती असें नाहीं. पण सर्व राष्ट्रांस घेऊन ओघा ओघानें व बेतानें एकेक पाऊल पुढें टाकावयाचें असें त्यांचें व इतर राज्यकारस्थाना पुरुषाचें मत असतें. मि० ब्राइट्सारखी निस्पृह मंडळी अगदींच निराळी. इमानानें जी गोष्ट लोकहिताची असें त्यांस खात्रीपूर्वक वाटेल, ती करणें हें त्यांचें ब्रीदच होय!

मि० ब्राइट् हे याप्रमाणें लढाईस विरुद्ध असल्यामुळें ते या वेळीं बरेच अप्रिय झाले. मुख्यतः क्रिमियाचे लढाईचे वेळीं लोकांना मि० ब्राईट् यांचा राग आला. रशियाचा गर्व हरण करून त्यास एकदां हात दाखवावा व त्याचेवर आपलें वर्चस्व स्थापन करावें, असें त्या वेळीं सर्वांस वाटे, यामुळें मि० ब्राइट् यांचीं तत्त्वें कोण मानतो! परंतु इतर रीतीनें मि० ब्राइट् यांचे जनसमाजावर फार उपकार झालेले होते, यामुळें त्यांचे विरुद्ध उत्पन्न झालेले क्षणिक विचार लौकरच नष्ट होऊन मि० ब्राइट ह्यांच्या बद्दलची लोकांची पूज्यबुद्धि कायम राहिली. ती तशी राहण्याचें दुसरें कारण निस्पृहपणा. आपले मताप्रमाणें झालें नाहीं तर दीड लाख रुपयांचे वार्षिक वेतनावर जो लाथ मारण्यास तयार होणारा, त्याचे विरुद्ध लोकांचें मत कितीही झालें तरी त्याचा अंमल किती वेळ टिकेल? लढाईचे संबंधानें अलीकडे हळूहळू ब्राइट् यांचे मताची मंडळी फार होत चालली आहे. बहुधा लिबरलपक्षास लढाई आवडत नाहीं. लढाईमुळें इंग्लंडच्या व्यापारी लोकांचें, उद्योगी व कारागीर लोकांचें फार नुकसान होतें. यामुळें हल्लींच इंग्लंडची राज्यधुरंधर मंडळी लढाई टाळवेल तितकी टाकूं लागली आहे. अलीकडल्या अनेक लढायांत इंग्लंडानें पहिल्यासारखें मन घातलें नाहीं. रशिया व तुर्कस्थान यांच्या भानगडींतही अलीकडे इंग्लंड लढाईकरितां ह्मणून शिरलें नाहीं, व यामुळें त्या देशास हळूहळू भिरु असें नांवही मिळत चाललें आहे! पण यामुळें देशाचा पैसा व्यर्थ खराब न होतां ज्या हजारों तरुण बांडांचें रक्त नाहक सांडलें असतें, ते आज देशांत शारीरश्रम करून रोजच्या रोज देशाच्या संपत्तींत भर पाडीत आहेत. सकृद्दर्शनीं जरी राष्ट्रास स्वदेशाचें नांव गाजणें व आपली कीर्ति होणें याची हौस वाटते, तरी पुढें देशाची भरभराट झाली व संपत्ति वाढली हें पाहून राष्ट्रांतील विचारी लोक मि० ब्राइट् सारख्यांचे गुणानुवाद गाइल्याखेरीज खचित राहणार नाहींत.

मि० ब्राईट् यांच्या वेळीं जेवढीं लोकहिताचीं कामें झालीं, तेवढ्यांत त्यांनीं पुढारीपण घेतलें आहे. यहुदी लोकांस प्रथमतः पार्लमेंटमध्यें घेत नसत. रोमनक्याथलिक लोकांस न घेण्याचा कायदा रद्द झाला होता, पण यहुदी लोकांच्या संबंधाचा बंद झाला नव्हता. तो ग्लाड्स्टन्, ब्राईट्, इत्यादि लिबरलपक्षाच्या पुढाऱ्यांचे उद्योगानें बंद झाला. याच सुमारास मि० ग्लाड्स्टन् यांच्या दीर्घप्रयत्नानें व त्यांच्या पक्षाच्या मंडळीच्या उद्योगानें ऐरिश लोकांवर धर्मसंबंधाच्या कराचें जें उगाच ओझें पडत असे, तें बंद झालें. ऐर्लंड देशांत रोमन क्याथलिक लोकांची संख्या फार. बाकी राहिलेल्यांत कांहीं इतर पंथांचे, व थोडेसेच प्राटेस्टंट. असें असून त्या देशांत प्राटेस्टंट धर्मखातें ठेवून सरकारानें त्याचा खर्च उगाच त्या लोकांवर लादला होता. पण लिबरलपक्षानें नवीन कायदा करून ऐर्लंडांतलें धर्मखातें बंद केलें. त्याचप्रमाणें ऐरिश लोकांचा व जमीनदार लोकांचा संबंध वगैरे प्रकरणांत ऐरिश लोकांच्या हिताच्या गोष्टींत मि० ब्राईट् यांचें नेहमीं अंग असे. ऐरिश लोकांची गरीब स्थिति व त्यांचीं दुःखें, यासंबंधानें मि० ब्राईट् नेहमीं उत्सुक राहून त्यांचे हिताकरितां झटत. यामुळें ऐरिश लोकांचीं त्यांचेविषयीं शेवटपर्यंत पूज्यबुद्धि होती. ऐर्लंड देशास स्वतंत्रता देण्याचे संबंधाचें मि० ग्लाड्स्टन् यांनीं चार वर्षांपूर्वी जें बिल पुढें आणिलें होतें, व ज्यासाठीं आज इंग्लंडांत लिबरलपक्षांत दुफळी झाली आहे, त्या गोष्टींत मि० ब्राईट् यांचें मत ग्लाड्स्टन् यांस अनुकूल नव्हतें. या दोन राज्यकारस्थानी पुरुषांत भिन्न मत होण्याचीं कारणें काय, हें स्पष्टपणें सांगणें व समजणें, या गोष्टी आह्मांस अशक्यच आहेत. परंतु त्या वेळचीं त्यांचीं भाषणें वाचून ऐरिश प्रकरणांत ते विरुद्ध कां होते, याचें अनुमान करितां येईल. हें अनुमान नीटपणें होण्यास प्रथमतः मि० ब्राईट् यांच्या स्वभावाचें थोडें वर्णन केलें पाहिजे.

एका ग्रंथकारानें असें लिहिलेलें आढळतें कीं सर्व इंग्रजी राष्ट्राच्या स्वभावाचें जॉन् ब्राईट् हें एक चित्रच होतें. ह्मणजे जॉन् ब्राईट् यांचा जो स्वभाव, तो साधारणतः सर्व इंग्रजी राष्ट्रांत सांपडेल. इंग्रजी राष्ट्र हें स्वभावतः कान्सरव्हेटिव ह्मणजे जुन्या गोष्टींची आवड धरणारें, किंवा नवीन गोष्टींचा लौकर स्वीकार न करणारें असें आहे. आजकाल फ्रान्स, जर्मनी, इटाली, रशिया, अमेरिका, वगैरे देशांत प्रत्येक गोष्टीच्या संबंधानें

घटके घटकेस फेरफार होत आहेत. पण इंग्लंडचें पाऊल कोणत्याही बाबदींत पहा, अगदीं धिमेपणानें पुढें चाललें आहे. चरित्रनायकाचा ज्यांच्याशीं संबंध अशा राजकीय गोष्टीच पाहिजे तर घेऊं. इंग्रजी राज्यव्यवस्थेचा पाया कधीं पडला, तिच्यांत थोडी थोडी सुधारणा कशी होत आली, व ती सुधारणा जेव्हां जेव्हां झाली, तेव्हां कायमपणानें कशी झाली, व ती करण्यास किती सावधपणा धरावा लागला, या गोष्टी इंग्लंडच्या इतिहासांत सुप्रसिद्ध आहेत. फ्रान्स देशाचे लोक आपणास स्वातंत्र्याचे भोक्ते समजतात, पण त्यांचे राज्यव्यवस्थेस अजून कायमपणा आला नाहीं, व त्या देशांत आजपर्यंत एका मागून एक अनेक राजकीय फेरफार झाले, आणि त्या फेरफाराच्या पायीं अनेक वेळां रक्तपात झाला. इंग्लंडच्या इतिहासांत रक्तपाताचे प्रसंग फार थोडे आहेत, व जी व्यवस्था झाली, ती कायमचीं झाली असेंच नेहमीं ह्मणतां येईल. या दृष्टीनें पाहिलें असतां इंग्लंड देशास कान्सरव्हेटिव ह्मटलें तरी चालेल. मि० ब्राईट् हे जरी लिबरल पक्षाचे होते, तरी ते कान्सरव्हेटिव लिबरल होते. आपले वाडवडील जें करीत आले, किंवा त्यांनीं ज्या संस्था ठरवून ठेविल्या, त्या सदोष आहेत असें ह्मटलेलें त्यांस खपत नसे. दुसरा इंग्रजी राष्ट्राचा गुण मानीपणा. पैसा, अंमल, व्यापाराची सद्दी, विद्वत्ता, या सगळ्याच गोष्टींची सुदैवेंकरून आमच्या राज्यकर्त्यांस अनुकूलता असल्यामुळें त्यांस अभिमान साहजिकच वाटेल; ह्या मानीपणाकरितां इंग्रज लोकांची फार प्रसिद्धि आहे. यासंबंधानेंही मि० ब्राईट् हे मूर्तिमंत इंग्रजी राष्ट्रच होते. वरील गोष्टींच्या बरोबर नेहमीं गैरसमज किंवा बुद्धीची असमता, जिला इंग्रजींत Prejudice असें ह्मणतात, तिचें वास्तव्य असावयाचेंच. एकाद्या गोष्टीबद्दल एकदां वाईट समजूत झाली ती झालीच, ती मग कालत्रयीं फिरावयाची नाहीं! असे पुरुष सर्वत्र असतात, ह्मणून त्यांचें जास्त वर्णन करावयास नको. मि० ब्राईट् यांचा स्वभाव एकंदर इंग्रजी राष्ट्राच्या स्वभावाशीं ताडून पहावा. त्यांस कोणचीही नवी गोष्ट एकदम करावयास नको. तिची चर्चा होऊन, तिच्याबद्दल वादविवाद होऊन जेव्हां ती चांगली अशी खात्री होईल, तेव्हां तिचा ते लोक स्वीकार करितात. त्यांना दुसऱ्याचें वर्चस्व खपत नाहीं, व दुसऱ्याचा बुद्धिवादही आवडत नाहीं; व जें वडिलोपार्जित चालत आलें, त्याचा त्यांस मोठा अभिमान. 'पुरातन

इंग्लंडदेश ' ( Old England ) या सांकेतिक नांवाचा पलटणींतल्या शिपायापासून मुख्य प्रधानापर्यंत, व रंकापासून राजापर्यंत साऱ्यांस कट्टा अभिमान! अशा रीतीचा एकंदर राष्ट्राचा स्वभाव, व त्याच प्रकारचे आमचे चरित्रनायक होते. ऐर्लंडच्या संबंधानें त्यांनीं अनेक चांगल्या गोष्टींत मदत केली असून स्वातंत्र्य देण्याची वेळ आली असतां ते विरुद्ध झाले, याचें कारण व इंग्रजी राष्ट्र ऐर्लंडास स्वातंत्र्य देत नाहीं, या दोन गोष्टींचीं कारणें एकच आहेत. प्रथमतः मि० ब्राईट् यांचें मत असें होतें कीं, सन १८०० या वर्षी आपल्या शहाण्या पूर्वजांनीं एवढी जी साऱ्या राष्ट्राच्या हिताची व्यवस्था केली, ती मोडण्यास योग्य कारण नाहीं. दुसरें, ऐर्लंडास निराळें पार्लमेंट दिलें ह्मणजे इंग्रज लोकांस स्वतः होऊन ऐर्लंडची व्यवस्था करितां आली नाहीं असें स्पष्ट झालें. ही गोष्ट मानी स्वभावास कशी खपेल? तिसरी गोष्ट, आपल्यास स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं ऐरिश लोकांनीं स्वीकारलेला मार्गही मि० ब्राईट् यांस बिलकुल खपण्या जोगा नव्हता. दंगे धोपे, पोलिसास हरकती, ल्यांडलीगच्या सभा, दुष्ट लोकांनीं केलेले खून, व पार्लमेंटांत ऐरिश सभासदांची गडबड व दांडगाई, या गोष्टींमुळें पूर्ण अभिमानी मि० ब्राईट् यांचें मन ऐरिश लोकांविषयीं पुरें विटलें होतें. एकदां एकास पार्लमेंटचा नव्यानेंच सभासद व्हावयाचें होतें, व तो मि० ब्राईट् यांचा स्नेही होता; ह्मणून त्यानें 'मी आपल्या निवडून देणारांस एक पत्र पाठविणार आहें, त्यांत काय लिहिलेलें बरें दिसेल?' असा प्रश्न केला. ब्राईट् यांनीं उत्तर पाठविलें कीं, हे ऐरिश सभासद पार्लमेंटच्या कामांत कशा हरकती आणतात, हें प्रथमतः लक्षांत घ्या! दुसरा एक प्रकार असा आहे कीं, एकाद्या वयोवृद्ध माणसानें एकादी नावाजण्यासारखी गोष्ट केलेली असली, व वृद्धपणीं दुसरें कांहीं हातून होत नसलें, ह्मणजे मग त्यास त्या स्वतःच्या गोष्टीशिवाय दुसरें कांहीं सुचत नाहीं, व आवडत नाहीं. ब्राईट् यांनीं एकदां धान्याच्या कायद्याच्या खटपटांत अक्षय्य नांव मिळविलें होतें. अलीकडे मन फिरल्यामुळें त्यांचीं मतें लोकांस आवडत नव्हतीं; व त्यांच्या मानी स्वभावामुळें ते इतरांच्या मतांकडे नीट अकलुषित बुद्धीनें पहात नसत यामुळें ग्लाड्स्टन् पक्षाचे लिबरल व मि० ब्राईट् यांचे मध्यें जुळेनासें झालें. कान्सरव्हेटिव पक्षाचे लोकांचा ऐर्लंडशीं जो विरुद्धपणा आहे. त्याच्यामध्यें व मि० ब्रा-

ईट् हे विरुद्ध होते, यामध्यें मोठा फरक होता. कान्सरव्हेटिव पक्षाचे लोक ही नवीन गोष्ट आहे ह्मणून विरुद्ध होते; पण ब्राईट् हे ज्या कारणानें एकंदर इंग्रजी राष्ट्र विरुद्ध आहे, त्या कारणानें विरुद्ध होते. ऐरिश लोकांस स्वातंत्र्य नाहीं, तें देणें रास्त आहे, व ऐरिश लोक स्वतःचें राज्य वहिवाटण्यास तयार आहेत, व आहे ही व्यवस्था त्यांचे सुखाची नाहीं, असें इंग्रजी राष्ट्रास अजून वाटूं लागलें नाहीं. हाच प्रकार मि० ब्राईट् यांचा होता, ह्मणून ते ऐरिश प्रश्नास विरुद्ध झाले होते. व कदाचित् काळांतरानें एकंदर राष्ट्राबरोबर त्यांचेंही मत फिरलें असतें.

संकेताप्रमाणें मि० ब्राईट् यांच्या चरित्राच्या संबंधाच्या सर्व मुख्य मुख्य गोष्टी थोडक्यांत सांगितल्या. आतां खुद्द आमच्या देशाकरितां त्यांनीं काय केलें, हें थोडक्यांत सांगून आटोपतों.

मि० ब्राईट् यांनीं हिंदुस्थानाकरितां काय केलें, याचा विचार करण्यापूर्वीं कोणच्याही इंग्रज गृहस्थाची आमच्या देशाबद्दल कितीही चांगली बुद्धि असली तरी त्याच्यानें काय काय करवेल, हें सांगितलें पाहिजे. आमच्या देशाची हल्लींची राज्य-व्यवस्था मोठी चमत्कारिक आहे. खुद्द चक्रवर्तिनी, पार्लमेंट, स्टेटसेक्रेटरी किंवा इकडील मुख्य अधिकारी, यांपैकीं एकाच्या सुद्धां हातीं धडपणें कांहीं नाहीं. तरी सर्व प्रकारची व्यवस्था व अधिकार पार्लमेंटानें एकदां स्टेटसेक्रेटरीस देऊन टाकले आहेत. गरज लागल्यास स्टेटसेक्रेटरीला हव्या त्या कामांत पार्लमेंटाची संमति घ्यावी लागते. पण तसें नसलें ह्मणजे त्यास पाहिजे त्या गोष्टी त्या सभेला विचारिल्याखेरीज करतां येतात. कायद्याप्रमाणें पार्लमेंटास जरी स्टेटसेक्रेटरीचे कामांत हात घालितां येईल, तरी सभासदांस इकडली माहिती जितक्यास तितकीच असते. व स्टेटसेक्रेटरीला इकडल्या माहितगार लोकांचें कौन्सिल व इकडे प्रत्यक्ष जाग्यावर असणारीं स्थानिक सरकारें यांचा जोर असतो. यामुळें पार्लमेंट त्याच्या कामांत फारसा हात घालीत नाहीं. अलीकडे आमच्या लोकांच्या व आमच्या कित्येक हितकर्त्यांच्या खटपटीनें पार्लमेंटाचें आमच्या देशाकडे विशेष लक्ष जाऊं लागलें आहे. पण या गोष्टीचा योग्य परिणाम होऊं लागण्यास अजून पुष्कळ अवकाश आहे. दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, मि० ब्राईट् यांचें त्यांच्या पक्षाच्या प्रधान मंडळीशीं नमत

नसे, यामुळें त्यांनीं कोणच्याही गोष्टींत विशेषतः लक्ष्य घालावयाचें सोडिलें होतें. तथापि प्रसंगविशेषीं अलीकडे सुद्धां त्यांनीं आमच्या देशाच्या संबंधानें आपलें चांगलें मत व आमच्या हिताकरितां कळकळ प्रदर्शित केली आहे. पांच वर्षांपूर्वीं पार्लमेंटाच्या निवडणुकीच्या वेळेस जेव्हां आमचे मुक्त्यार तिकडे गेले होते, तेव्हां मि० ब्राइट् यांनीं त्यांस फार मदत केली. ठिकठिकाणच्या सभेंत त्यांचें पुष्कळ अंग होतें. व आमच्या देशाची माहिती त्यांनीं आमच्या मुक्त्यारांजवळ संभाषण करून विचारून घेतली. परंतु त्यांचा आमच्या देशाशीं आलेला संबंध फार जुना आहे व त्या वेळीं त्यांनीं आमच्या हिताच्या गोष्टींकरितां खटपट केली. त्यांनीं सुचविलेल्या गोष्टी जरी त्या वेळीं मान्य झाल्या नाहींत, तरी त्या मान्य केल्या असत्या तर बरें झालें असतें, असें आतां वाटूं लागलें आहे. ह्मणजे त्या वेळीं त्यांनीं आमच्या देशाच्या संबंधानें विचारपूर्वक जी व्यवस्था सुचविली, ती मोठ्या दूर दृष्टीनें व शहाणपणानें सुचविली होती, असें उघड दिसून येतें. ही एकंदर हकीगत अशीः—इ० स० १८५३ या वर्षीं इस्ट इंडिया कंपनीस हिंदुस्थानच्या कारभाराची नवीन सनद करून देण्याची वेळ आली. ही सनद दर वीस वर्षांनीं बदलीत असत, व ती बदलण्याची वेळ आली असतां प्रथमतः झाल्या वीस वर्षांची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमीत, वादविवाद होई, व अखेरीस सनद देत. हा प्रश्न पार्लमेंटांत निघाला असतां मि० ब्राइट् यांनीं त्यांत फार मन घातलें. कंपनीच्या हातीं राज्यकारभार दिल्यानें फार घोटाळा झाला आहे; कोणच्या वेळीं काय अनर्थ होईल याचा नेम नाहीं, यासाठीं पार्लमेंटानें प्रत्यक्ष राज्यकारभार हातीं घ्यावा, असें मि० ब्राइट् यांनीं सुचविलें. त्या वेळीं सर्व कारभार कंपनीच्या डायरेक्टर मंडळीच्या हातीं असे; व त्यांचेवर पार्लमेंट 'बोर्ड आफ् कन्ट्रोल' ह्मणून कांहीं अधिकारी मंडळी नेमी. यांचा मुख्य किंवा चेअरमन हा प्रधान मंडळींतला असून सध्याचे स्टेट सेक्रेटरीप्रमाणें होता. पण संपूर्ण अधिकार, जबाबदारी व नफ्यातोट्याची मालकी कंपनीची व डायरेक्टरांची असल्यामुळें बोर्ड फक्त राजकीय गोष्टींचे संबंधानें काय तें मन घाली. इकडे देशांत प्रजेच्या सुखदुःखाच्या संबंधानें कांहीं होवो, त्यांत ते मन घालीत नसत. यावेळींच आमच्या देशाची फार

वाईट स्थिति झाली आहे, अशी इंग्लंडांत सर्वत्र समजूत होती. आद्यापेक्षां खर्च वाढत चालला होता, व कोणी ना धनी ना गोसांवी, अशा प्रकारचा घोटाळ्याचा प्रकार होऊन पाहिजे तो पाहिजे तें करीत होता. ही स्थिति आतांच्या स्थितीशीं ताडूनच पाहिली, तर त्यावेळची स्थिति सद्य स्थितीपेक्षां फार वाईट होती कीं काय, याचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हे. मुद्दा ह्मणून एवढाच आहे कीं, आतां धनी गोसावी कोणी आहे; आज प्रत्यक्ष राणीसाहेब स्वतः व मुद्दाम आमच्या चक्रवर्तिनी झाल्या आहेत, व सर्व कारभार जबाबदारीवर चालतो. त्यावेळीं तशी जबाबदारी कोणावर नव्हती. मि० ब्राईट् यांनीं पार्लमेंटांत निस्पृहतेनें व स्पष्टपणें सांगितलें, कीं ही कंपनीची झोटिंग पाच्छाई मोडून प्रत्यक्ष पार्लमेंटाचे हातून चांगली व्यवस्था झाली पाहिजे; व नियमित मुदतशीर ज्या लढाया होत आहेत व मुलूख राज्यांत सामिल करण्याचें काम चाललें आहे, तें बंद झालें पाहिजे. मि० ब्राईट् यांनीं पार्लमेंटमध्यें जोरदार भाषण केलेंच, पण त्याबरोबर कलकत्ता येथें प्रसिद्ध होणारें 'फ्रेंड आफ् इंडिया* ' जें त्यावेळीं प्रसिद्ध इतिहासकार मि० मार्शमन हे चालवीत असत, त्यांतील एक लेख वाचून दाखविला. तो ऐकून पार्लमेंट गजबजून गेलें, व कंपनीचे डायरेक्टर व इतर अधिकारी जे पार्लमेंटांत होते, त्यांची तर पायांची आग मस्तकास गेली! या लेखांतलीं कांहीं वाक्यें येथें उतरून घेतों. "बंगल्यांतल्या शेतकऱ्यांची स्थिति किती वाईट झाली आहे, याची आपणास कल्पनाही करवणार नाहीं. त्यांना रहावयास जीं घरें आहेत, त्यांत कुत्रीं सुद्धां कोणी पाळणार नाहीं; त्यांचे अंगावर चिंध्या आहेत; आणि त्यांना व त्यांचे कुटुंबांस फार तर एकदां पोटभर जेवावयास मिळत असेल. संसारांतलें अगदीं साधें सुख देखील त्या बिचाऱ्यांचे नशीबीं नाहीं. याप्रमाणें सुमारें तीन चार कोट रुपये वसूल वर्षास ज्यांपासून घेतों, त्यांची स्थिति ऐकून कोणाचेही अंगावर शहारे येतील!" पुढें मि० ब्राईट् यांनीं हिंदुस्थानांत कर किती आहेत व कसे घेतात याचें वर्णन

* हें पत्र हल्लीं 'स्टेटस्मन्' नामक पत्रांत सामिल झालेलें आहे व याचे कर्ते हिंदुस्थानचे प्रसिद्ध मित्र राबर्ट नाईट हे आहेत. हिंदुस्थानचा पक्ष घेऊन भांडण्याचें ब्रीद या पत्रानें अद्यापि सोडलें नाहीं. व या पत्रांत जसे जोरदार व निर्भीडपणाचे लेख येतात, तसे हिंदुस्थानाच्या दुसऱ्या एकाही पत्रांत येत नाहींत.

करून शेवटीं पार्लमेंटच्या तर्फे हिंदुस्थानच्या कारभाराची व्यवस्था पहाण्याकरितां नेमलेल्या बोर्डाची स्थिति सांगितली. " हे गृहस्थ कधीं सठी सामासीं इंडिया हापिसाचें तोंड पाहून सही करणार. सह्या करण्याचे कागद कसले, तर लढाया कराव्या व राज्यें द्यावीं; खर्चाचा पैसा कोठून घ्यावा याचा विचार नको. बिचारा देश भिकेस लागून त्यांस लाहा घेण्याची पाळी आलेलीच आहे! " शेवटीं मि० ब्राईट् यांनीं सांगितलें कीं, कंपनी बिपनी मोडून टाकून राणीनें प्रत्यक्ष कारभार हातांत घ्यावा; फ्रान्सच्या दहापट ज्याचा विस्तार, व ग्रेट ब्रिटनच्या चारपट ( अर्थात् सन १८५३ त ) ज्यांत लोकवस्ती आहे असा मुलूख मिळाला आहे तेवढा पुरे, आतां आणखी हाव नको. हिंदुस्थानास चांगले स्थितींत आणवयाचें असेल, तर ती गोष्ट आपण नीतीनें व विचारानें वागल्याखेरीज साध्य होणार नाहीं हें आपण स्पष्ट लक्षांत ठेवावें.

मि० ब्राईट् यांनीं केलेला हा बोध कांहीं फारसा उपयोगीं पडला नाहीं. कंपनीच्या भागीदारांचा यांत सर्वस्वी तोटा होणार. त्यांचा जोर पार्लमेंटांत चांगला होता. यामुळें कित्येक सुधारणेच्या गोष्टी कबूल करवून कंपनीस पुनः सनद दिली. यावेळीं ब्राईट् यांनीं वर्णिलेली स्थिति आजच्या आमच्या स्थितीशीं कितपत जुळेल, हा प्रकार विचार करण्यासारखा आहे. कंपनीची राज्यव्यवस्था झाली काय आणि हल्लींची झाली काय, राज्यकर्त्यांच्या मनांत जोंपर्यंत आपलेपणा वागत नाहीं, व जोंपावेतों उंटांवरून शेळ्या वळविण्याचा प्रकार चालूच आहे, तोंपर्यंत आमच्या देशाचा कारभार सुरळीत होण्याची आशा नको! असो; सन १८५३ नंतर कंपनीचा कारभार पुनः सुरक्षित चालला. कित्येक राज्यें भराभरा खालसा केलीं. अखेरीस १८५५ त ज्याचें संरक्षण करण्याचें पत्करलें होतें, त्या तेरा वर्षांच्या धुलीपशिंगाकडून तहनाम्यावर सही करून ख्रिस्ती धर्माचे पूर्ण अभिमानी जे इंग्रज लोक त्यांनीं पूर्ण बेइमानी होऊन पंजाब प्रांत खालसा केला. कारण काय, तर राज्यांत बेबंदाई चालली; पण राज्य चालविणारे, धुलीपशिंगाचें संरक्षण करणारे सर्व काय ते इंग्रजच होते. असो; अशा रीतीनें ख्रिस्ती राजनीतीचा कळस झाला. तो न्यायदेवतेस कोठून रुचणार! इ० स० १८५७त इंग्रज राज्यकर्त्यांवर आकाश कोसळलें. भयंकर बंड उद्भवून चोहींकडे दंगा उसळला. व रा-

ज्यें घशांत घालितांना इंग्रज बाहादुरांनीं न्याय-अन्याय, नीति-अनीति ज-शी पाहिली नाहीं, त्याचप्रमाणें दुष्ट व अघोरी बंडवाल्यांनीं बायकापोरें, लायक नालायक काहींच पाहिलें नाहीं ! सारखा पट्टयाचा हात चालवून चोहींकडे हाहाःकार करून दिला ! अखेरीस इंग्रज बहादुरांच्या सद्दीनें बंडवाल्यांचा मोड होऊन पुनः शांतता झाली. पण कंपनीच्या हातीं राज्यकारभार ठेवावा कीं नाहीं, हा विचार पुनः पुढें आला. इ० स० १८९८ त हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची व्यवस्था कशी असावी, हा प्रश्न पुनः उद्भवला. यावेळींही मि० ब्राईट् यांनीं पुनः हिंदुस्थानाच्या कारभारांत मन घातलें व राज्यव्यवस्थेचा त्यांना वाटला तो प्रकार सुचवून त्याचे पुष्टीकरणार्थ कित्येक जोरदार भाषणें केलीं. मुख्य गोष्ट त्यांनीं अशी सांगितली कीं, “ लढाईत तरवार गाजविल्याची कीर्ति बरी असो वा वाईट असो; हिंदुस्थानांत तुह्मीं ती मिळविली तितकी पुरे. आतां यापेक्षां महत्त्वाच्या गोष्टींकडे चित्त लावा. ज्यांच्यापासून कर घेतों त्या शेतकऱ्यांस सुखाचा मोबदला कसा मिळेल; देशांतले रस्ते, सडका, रेलवे वगैरे वाढून व्यापार कसा भरभराटींत येईल; लोकसंरक्षणाची व लोकांस न्याय मिळण्याची सोय कशी होईल, इत्यादि गोष्टींचा आतां विचार करा. लढायांचीं स्मारकें व जयस्तंभ याच्या स्थापना करण्यापेक्षां हिंदुस्थानच्या हजारों हजार प्रजेच्या सुखाची चिरस्थायी व्यवस्था करण्यास इंग्लंडानें झटणें, हें आतां त्याचें कर्तव्य आहे. इकडील सर्व व्यवस्थांचे संबंधानें त्या वेळीं मि० ब्राईट् जें बोलले, त्यांतला बराच प्रकार अजून अक्षरशः खरा आहे. मि० ब्राईट् गव्हरनर जनरलच्या संबंधानें पार्लमेंटांत बोलले;—

“ आमचे इकडून गव्हरनर जनरल ह्मणून जो गृहस्थ हिंदुस्थानांत जातो, त्याला त्या देशाची कांहींएक माहिती नसते. नेमणूक झाली कीं, हिंदुस्थानची माहिती मिळविण्याची इच्छा होते. मग इकडे गलबतावर सामान पाठविण्याची गर्दी, इकडे आप्तइष्टांच्या भेटी आहेतच, त्यांतच मित्रमंडळी भेटी घेतच आहेत, अशा धामधुमींत मिल्लसाहेबांचा हिंदुस्थानचा इतिहास घेऊन वाचावयाचा ! मग तो हिंदुस्थानांत जातो. हिंदुस्थान ह्मणजे कसला विलक्षण देश ! त्या एका देशांत दहावीस निरनिराळीं राष्ट्रें व पन्नास पाऊणशें भिन्न भिन्न भाषा. बिचाऱ्या राज्यप्रतिनिधीस एका तरी राष्ट्राची ओळख ! एका भाषेतल्या शब्दांचे उच्चार देखील त्यास

कळावयाचे नाहींत. पुढें तेथें गेल्यावर स्वतः देशांत फिरून स्थिति पाहीन ह्मणेल, व तशी मनापासून इच्छा असली, तरी ना धड रस्ते, ना रेलवे, ना पूल, तेव्हां मग तिकडे वीस वीस वर्षें कारभार केल्याचा डौल सांगणारी आफिसर मंडळी भोंवताली जमते, व ते जो बुद्धिवाद सांगतील, त्याप्रमाणें सर्व व्यवस्था व्हावयाची. आपण गैरमाहीत, मग हे अनुभवशीर सरकारी कामगार सांगतात यांचे विरुद्ध कसें जावें? अशा रीतीनें त्या बिचाऱ्याचे भोंवतीं अंधारपटल असतें. सरकारी कामदारांचा अंधुक प्रकाश काय पडेल तो पडेल. एकाद वेळ खरा प्रकाश चमकलाच तर तो विद्युल्लतेचा क्षणिक देखावा आहे, असें भोंवतालच्या मंत्री मंडळीनें सांगितलें कीं झालें! अशी आमच्या गव्हरनर जनरलांची स्थिति आहे." पुढें मि० ब्राइट् ज्यांचेवर संपूर्ण राज्यकारभाराचें ओझें असणार, त्या सिव्हिलियन लोकांचें वर्णन करितातः—"यांची स्थिति सुद्धां बहुतेक अशीच. हे लोक त्या देशांत जास्त वेळ राहून थोडे अधिक माहितगार होतात. पण त्यांना तरी चांगली माहिती होईपर्यंत एका प्रांतांत कुठें राहवयास मिळतें? समजा कीं, एक कामगार वीस बावीस वर्षें तेथें आहे, तर तेवढ्यांत त्यास वीस बावीस निरनिराळ्या ठिकाणीं जावें लागतें. मग त्याला तरी लोकस्थिति, भाषा, रीतिभाति यांची माहिती होणार कशी?" याप्रमाणें मि० ब्राइट् यांनीं त्या वेळीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें वर्णन केलें आहे. सध्यां अनेक कारणांनीं या स्थितींत फरक पडला आहे. पण यांतल्या अनेक गोष्टी आज तीस वर्षें होऊन गेलीं असूनही कायम आहेत. या वेळीं असा विचार पुढें आला होता कीं, कंपनीच्या हातून राज्याधिकार घ्यावा. एक स्टेट सेक्रेटरी नेमून त्याच्या मदतीकरितां तिकडील माहितगार अशा पंधरा लोकांचें एक कमिशन नेमून द्यावें. व स्टेट सेक्रेटरी हा प्रधान मंडळींपैकीं असून पार्लमेंटास जबाबदार असावा. मि० ब्राइट् यांस ही व्यवस्था बरी वाटली नाहीं. ते ह्मणाले कीं, हल्लीं आहे ती व्यवस्था व नवीन सुचविली जाणारी व्यवस्था यांत काय फरक आहे? कोर्ट आफ डायरेक्टर्स व बोर्ड आफ कन्ट्रोल यांचे जागीं ज्याला कोणास जबाब विचारतां येणार नाहीं असें कौन्सिल आलें. व बोर्डाचे चेअरमनच्या जागीं सेक्रेटरी आला. ते असें सुचवीत होते कीं, हिंदुस्थानचे निरनिराळे प्रांत हे आपापले ठिकाणीं स्वतंत्र असावे; त्यांचे गव्हरनर, त्यांचा

वसूल, त्यांची राज्यव्यवस्था, यांचा परस्परांशीं विशेषसा संबंध ठेवूं नये. व सर्वांवर इंग्लंडमध्यें कालनीचे सेक्रेटरीप्रमाणें एक सेक्रेटरी, व त्यास मदतगार अशी पार्लमेंटची कायमची कमेटी असावी. कायमची पार्लमेंटची ह्मणजे खुद्द पार्लमेंटच्या सभासदांची कमेटी. अर्थात् तिचे सभासद पार्लमेंटांत बसणारे असले ह्मणजे जबाबदारीनें काम करतील. अशा प्रकारची राज्यव्यवस्था तीस वर्षांपूर्वीं आमच्या देशासाठीं मि० ब्राईट् यांनीं सुचविली होती. ही कितपत चांगली निपजली असती, याचा विचार या लहानशा चरित्रांत करणें अशक्य आहे. पण सध्यांची जी राज्यव्यवस्था आहे, तिच्यापेक्षां ही खचित चांगली अशी अनुभवास आली असती, असें पुष्कळांचें ह्मणणें आहे.

सन १८५८ नंतर मि० ब्राईट् यांनीं आमचे देशाच्या राज्यकारभारांत फारसें मन घातलें नाहीं. बोलणें निघालें किंवा पार्लमेंटांत वादविवाद झालाच, तर ते आमच्या पक्षाचें व आमचा कड घेऊन बोलत. मि० ग्लाड्स्टन् यांच्या पहिल्या प्रधानकींत त्यांनीं मि० ब्राईट् यांस आमच्या देशाचे सेक्रेटरी नेमलें होतें. पण आजारीपणामुळें त्यांनीं काम सोडलें. त्यांच्या राज्यकारभाराचा लाभ मिळावा, इतकें आमचें सुदैव नव्हतें. पुढें त्यांनीं राज्यकारभाराच्या कोणच्याच गोष्टींत फारसें मन घातलें नाहीं, त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतही घातलें नाहीं.

मि० ब्राईट् यांचा स्वभाव व वर्तनक्रम यांच्या संबंधानें येथें चार शब्द लिहिले पाहिजेत. ‘ क्वेकर ’ किंवा ‘ मित्रमंडळी ’ अशा नांवाचा एक धर्मपंथ इंग्लंडांत आहे, त्या पंथाचे मि० ब्राईट् हे होते. या पंथांतली विशेष गोष्ट साधेपणा, सत्यानें व नीतीनें वागणें, छानछोकी व डौल न आवडणें, या होत. अर्थात् मि० ब्राईट् यांस श्रीमंत लोक, सरदार वगैरे आवडत नसत. परंतु पुढें त्यांचा स्वभाव यासंबंधानें पालटून लार्ड हार्टिंग्टन्सारखे त्यांचे कित्येक मित्र बनले होते. त्यांचा पोषाख व चालचलणूक अगदीं साधी असे. लंडन पंच ह्मणून एक थट्टेबाज पत्र आहे, त्यांत जॉन् ब्राईट् यांचें चित्र काढलें असतां त्याला चष्मा लावीत. मि० ब्राईट् ह्मणत असत कीं, मी कधीं असला चष्मा लावीत नाहीं, आणि हा पत्रकर्ता माझे नाकावर मुद्दाम चष्मा कां ठेवितो ? यांचें सर्व प्रकारचें वर्तन साधें असे. खाणें पिणें, व्यायाम, या गोष्टी सुद्धां साध्याच असत.

टेबलावर गोट्यांनीं खेळणें त्यांस आवडे. ते क्वचित् चिरूट ओढीत, तो येथें खेळत असतांना ओढीत. ते थट्टा मस्करी फारशी करीत नसत; पण थट्टेबरोबर किंचित् लागून बोलण्याची त्यांस संवय असे. जॉन् ब्राईट् हे आरंभीं चांगलें बोलत नसत. पुढें त्यांनीं वक्तृत्वाचा मुद्दाम अभ्यास केला. बापाच्या कारखान्यांतून संध्याकाळीं सर्व लोक निघून गेल्यावर ते एक मोठ्या दिवाणखान्यांत एका कोंपऱ्यांत उभे राहून मोठ्यानें वाचीत किंवा बोलत, व कारखान्यांतील एक क्लार्क त्यांचे गुण-दोष सांगत. ब्राईट् यांस ज्या दिवशीं पार्लमेंटांत बोलायचें असेल, त्या दिवशीं त्यांची भेट घेण्याची सोय नसे. कारण ते विचारांत गढलेले असावयाचे. आपल्या भाषणाचा शेवट चटकदार करण्याचें त्यांस आवडत असे. बोलतांना सुचण्यासाठीं ते कागदाचे तुकड्यावर मजकूर लिहून घेत. पण तो मजकूर लोकांच्या दृष्टीस पडूं नये, ह्मणून ते तुकडे ते आपल्या टोपीच्या आंतल्या बाजूस अडकवून ठेवीत. लोकांत त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस मान मिळे, पण तो मिळण्यासाठीं त्यांनीं कधीं पुढें पुढें केलें नाहीं. त्यांचे पंथाच्या मताप्रमाणें लोकांचे उपयोगीं पडणें हें एक कर्तव्यच समजलें आहे. सन १८८१ पासून त्यांस प्रथमतः ऐर्लंडचा तिटकारा येऊं लागला. त्या वर्षी तेथें दंगे झाल्यामुळें तेथें बंदोबस्ताचे कडक कायदे केले. त्यांस मि० ग्लाड्स्टन् यांनीं सुद्धां आपली संमति दिली, व मि० ब्राईट् यांनींही दिली. पण ऐरिश लोक यांस तेव्हांपासून फार टोंचून बोलूं लागले व त्यांची थट्टा करूं लागले. या गोष्टीचा मि० ब्राईट् यांस इतका तिटकारा आला कीं, कित्येक दिवसपर्यंत त्यांनीं ऐर्लंडचे कामांत मतही दिलें नाहीं, असें पार्लमेंटचें रजिस्टर पाहिलें असतां आढळेल. ऐर्लंडचे संबंधाचें यांचें मत फिरलें नाहीं. व मि० ग्लाड्स्टन् यांनीं ऐर्लंडास स्वराज्य देण्याचा विचार केला, त्यामुळें ते ग्लाड्स्टन् यांच्या विरुद्ध बोलत. एकदां त्यांनीं एका ग्लाड्स्टन् पक्षीय मित्रास लिहिलें कीं, तुह्मांस नायक चांगला मिळाला आहे, असें तुह्मांस वाटत असेल; पण माझी खात्री आहे कीं, 'साठी न् बुद्धि नाटी' असें त्याचें झालें आहे. तो सरते शेवटीं तुह्मांस खड्ड्यांत घालील. रिकाम्या वेळीं मि० ब्राईट् यांचा आवडीचा खेळ नदीवर बसून गळीनें मासे मारणें. मुंबईचे मुक्त्यार चंदावरकर यांस हे या उद्योगांत गुंतलेले असतांनाच भेटले! मरावयाचे अगोदर सुमारें वीस वर्षें

मि० ब्राईट् यांचीं मतें किंचित् फिरलीं होतीं. पार्लमेंटच्या सुव्यवस्थेचें बिल जें १८६७ त पास झालें, त्यांत त्यांनीं मेहनत केली. पण पुढें त्यांचे मध्यें शिथिलता येत चालली होती. त्यांचे इतर सोबत्यांपेक्षां त्यांचेवर म्हातारपणाचा पगडा अधिक लौकर पडला. श्रीमंताचा त्याचे मनांतील द्वेष उत्तरोत्तर कमी झाला; व पहिल्याप्रमाणें ते लौकिक कामांत झटून पडेनातसे झाले. त्यांचे स्वभावांत असा फरक पडल्यामुळें लोकांची त्यांचेबद्दल तितकी पूज्यबुद्धिही राहिली नाहीं. आपले अमदानींत त्यांनीं लोकहिताचीं फारच मोठालीं कामें केल्यामुळें त्यांचेबद्दलचा लोकांचे मनांतला पूज्यभाव नष्ट न झाला, तरी त्यांत अंतर पडलें. ऐरिश सभासदांनीं जरी त्यांचेवर हल्ले करण्याचें सोडून दिलें होतें, तरी त्यांचे मनांतील पूज्यभाव कमतावला. व त्यांचे मरणानंतर जरी पार्लमेंट सभेंत सर्व पक्षाकडून एक शब्दानें दुःख प्रदर्शित करण्यांत आलें, तरी वेस्टामिनिस्टर ॲबीमध्यें कलेवरास चिरंतनचें स्थळ मिळण्याचा मान—जो थोर विद्वान्, थोर राज्यकारस्थानी, थोर कवि वगैरे लोकांस मिळत गेला आहे, व जो मिळण्यास हे सर्व प्रकारें योग्य होते, तो यांस मिळावा असें कोणींच सुचविलें नाहीं! यांत मि० ब्राईट् यांचे स्वभावाचें जसें वर्णन झालें, तसेंच यावरून लोकांचा स्वभाव नेहमीं कसा असतो यांचेंही अनुमान होईल.

मि० ब्राईट् यांच्या चरित्रांत आपणास अनुकरणीय अशा पुष्कळ गोष्टी आहेत. शेंकडा शंभर असे ब्राईट् आमचे इकडे निपजण्याची आशा कित्येक शतकें नको; पण एक-दोन-चार शंभरांश ब्राईट् जरी आमचेकडे पैदा झाले, तरी पाहिजेतच आहेत. निस्पृहपणें लोकापवादाची भीति तिळमात्र न बाळगितां गरीब गुरिबांच्या हितासाठीं झटणें, हा मि० ब्राईट् यांचा पहिला गुण. लाख दीड लाखाची मिळकत टाकून केवळ आपल्या मता विरुद्ध गोष्ट होते ह्मणून प्रधानकी सोडणें, हा निःसंगपणा लहानसान नव्हे. आमच्या मी मी ह्मणणारे मंडळींत तो हजारांशानें सुद्धां नाहीं. किती थोर थोर मंडळींवर वरिष्ठांची इतराजी स्वदेशाकरितां करून घेण्याचा प्रसंग आला असेल! व त्यावेळीं अंशतः तरी ब्राईट्पणा कितीकांनीं दाखविला! मि० ब्राईट् यांच्यांमध्यें जुन्याचा अभिमान जो होता, तो कदाचित् त्यांच्या देशांत बरासा नसेल पण ज्या

आपल्या देशांत घडोघडीं पाश्चिमात्य नव्या गोष्टींची व प्राच्य जुन्या गोष्टींची चढाओढ चालू आहे, तेथें आह्मांस ब्राईट् पाहिजे. नाहींतर आमच्यांतली कित्येक मंडळी पहा. ती वेद–पठनांत आहे, आर्य–समाजांत आहे, सोहं-समाजांत आहे, प्रार्थना-समाजांत आहे. ती बालविवाह करणार नाहीं ह्मणून प्रतिज्ञेवर केलेली सही वाळली नाहीं तोंच येऊन आपल्या बारक्या पोरांचीं लग्नें करण्यास मागें घेत नाहीं. पुनः एकादा मलबारी, एकादी रखमाबाई किंवा एकादी रमाबाई निघाली, कीं त्यांचे ह्मणण्याचा यत्किंचितही विचार न करितां व खऱ्या स्थितीकडे लक्ष न देतां मेषवृत्ति स्वीकारून ‘ पिच्छेसे आई ’ या ह्मणीप्रमाणें सह्या देण्यास तयारच ! अशा मंडळीची संख्या पहाणें असेल तर नुकता परवां मि० मलबारी यांनीं आमच्या वैवाहिक रीतीच्या संबंधाचा जो एक प्रश्न काढला आहे, त्या संबंधानें त्यांस मिळालेलीं मतें पहावीं. बिचाऱ्यांनीं मलबारी काय ह्मणतो याचाही धडपणें विचार केला नसेल ! अशा रीतीनें लोंढ्याबरोबर वाहून जाणारे आपले मंडळीकरितां मि० ब्राईट्सारखे खडक पाहिजेत. मि० ब्राईट् याचें चरित्र त्यांनीं आपले देशाकरितां काय केलें हें पाहण्यासाठीं वाचावयाचें नाहीं, तर ते आपल्या स्वतःच्या देशस्थितीचे मानानें योग्य वेळीं काय करीत आले हें पाहून करवेल तितकें त्यांचें अनुकरण करण्यासाठीं वाचावयाचें. आमच्या देशांत तिकडे त्यांच्या वेळीं होते त्यासारखे कैवार घेण्यास योग्य असे गरीब लोक फारच आहेत. त्यांचे भाकरीवर कर आहे. आमची भाकरी महाग झाली आहेच, पण आमचें मीठही तोडलें आहे. आमच्या गाई ह्मशींस चारा नाहींसा झाला, यामुळें आमच्या देशाचें जीवन जें दहीं दूध, त्याचा दुष्काळच पडला आहे. आमच्या देशांतले व्यापार धंदे बसले आहेत. इंग्लंडास लढाईमुळें नुकसानी झाली आहे; पण आमचा देश लढायांपायीं इतका खालीं आला आहे कीं, या स्थितीपुढें त्यांची स्थिति कांहींच नाहीं ! आमच्या जमेचीं व खर्चाचीं तोंडें कधीं तरी मिळतात का ? पंचवीस कोटींची जमाखर्चाचे अजमासांत तूट कधीं स्वप्नीं तरी कोणी ऐकली असेल काय ? अशा एक ना दोन, शेंकडों गोष्टींकरितां आमचे देशांत ब्राईट् उत्पन्न होण्यास पाहिजे आहेत. चरित्रें वाचून चरित्रनायकासारखे लोक निपजतात. कथा पुराणें

ऐकून भारतीय योद्धयांसारखा शिवाजी व रामानें जशी रावणापासून सीता सोडविली, तशी ही पीडित आर्यभूमि अविंधांपासून त्यानें सोडविली. त्याच शिवाजीचें चरित्र वाचून बाजीराव बनला. अशा प्रकारचें हजारांश, लक्षांश कांहीं तरी हित व्हावें, ह्मणून हें लहानसें चरित्र देशबांधवांस अर्पण करीत आहें. त्याचा उपयोग त्यांस थोडासा तरी होवो!

रा० भि० जो०.

P. B. W. SERIES NO. 4.

२८७अ

# श्रीमति

# जगन्मोहिनी

# देवी.

( ब्रह्मानंद केशव चंद्रसेन यांची पत्नि. )

द्वारकानाथ गोविंद वैद्य.

मुंबई " कर्नाटक " छापखान्यांत छापविलें.

मार्च १८९९.

# दोन शब्द.

१८९७ च्या अखेरीस P. B. W. Series ह्या नांवानें येथील प्रार्थना समाजाच्या कांहीं तरुण सभासदांच्या अनुमतानें जी एक माला सुरू करण्यांत आली, त्या मालेचें हें चौथें पुस्तक आज वाचकवर्गास सादर करण्यांत येत आहे.

पति व पत्नि ह्यांचीं सारखीं उन्नत धर्ममतें व दोघांचेंही आचरण अत्यंत धर्मशील, अशी अत्यंत स्पृहणीय स्थिति फारच क्वचित पहाण्यास सांपडते. ब्रह्मानंद केशव चंद्रसेन ह्यांच्या चरित्राविषयीं आपल्या इकडच्या मंडळीस थोडी बहुत माहिती आहे, आणि नसली तरी, साधनें असल्यामुळें, ती, इच्छा झाल्यास करून घेतां येण्यासारखी आहे. परंतु त्यांचें कुटुंब त्यांच्या प्रमाणेंच धर्मशील होतें अशी माहितीच आमच्या येथील पुरुषांस व स्त्रियांस नसल्यामुळें, त्यांच्या चरित्राविषयीं आपणांस थोडी बहुत माहिती व्हावी अशी जिज्ञासाच उत्पन्न होणें शक्य नाहीं. अशी वास्तविक स्थिति असल्या मुळें व अगदीं जुन्या समजुतींत वाढलेल्या, प्रथमतः नवीन विचारांचा व प्रचारांचा पूर्ण तिरस्कार करीत असलेल्या, पण नंतर विचार गांभिर्य, ज्ञानार्जन व धर्म परायण पतीचा सहवास ह्यांच्या योगें पूर्वीच्या अनुदार वृत्तीचा त्याग करून ब्राह्म धर्माची एक नम्र सेवक झालेल्या ह्या साध्वी स्त्रीचें अल्प चरित्र ह्या प्रांतींच्या सुशिक्षित व साधारण शिक्षित स्त्री वर्गापुढें ठेविल्यास त्यापासून बराच फायदा होईल असें वाटल्यावरून जगन्मोहिनी देवींचें हें अल्प जीवनवृत्त प्रसिद्ध करण्यांत येत आहे. बंगल्यांत सर्व ब्राह्ममंडळींत ह्यासाध्वी विषयीं अत्यंत पूज्यबुद्धि वसत आहे, असें तेथील पुढाऱ्यांच्या निरनिराळ्या प्रसंगींच्या उद्गारांवरून दिसतें. जगन्मोहिनीचा ईश्वरावरील पूर्ण विश्वास, विमल आचरण, परमेश्वराविषयीं सेव्य सेवक भावाविषयीं जागृति, पति निधना नंतरचें तिचें आचरण, ईश सेवेविषयीं तिचा उत्साह, आपल्या भगिनी वर्गाच्या उन्नतीविषयीं आस्था इत्यादि अति महत्वाच्या गुणांची साधारण ओळख जरी ह्या अल्पचरित्रा


U. Ray.

ग्रं. प. ७९८८

१७७८

## परलोकवासी

# श्रीमति जगन्मोहिनी देवी.

(बाबू केशव चंद्रसेन यांची पत्नी.)

साधु पुरुष, महात्मे, व देशकल्याणकारी लोक यांच्या चरित्रांपासून साधारण जनसमुहास मोठा फायदा होत असतो. लोकांस उत्तम वळण लावावयास, त्यांच्यांत कांहीं विशेष गोष्टीविषयीं स्फूर्ति उत्पन्न करावयास, अशा चरित्रांपासून जशी मदत होते तशी दुसऱ्या उपदेशानें होत नाहीं. थोर पुरुषांच्या चरित्रा पासून साधारण लोकांस जसा फायदा होण्याचा संभव आहे तसाच तो साध्वी स्त्रियांच्या चरित्रानें स्त्रीजनास होण्याचा फार संभव आहे. संसारांत मार्गक्रमण करीत असतां कुटुंबांतील स्त्रियांच्या अंतःकरणांतील धर्मज्योति जागृत करावयाची असेल, किंवा स्त्रियांचा रूढ व प्रचलित धर्माकडील कल कमी करून शुद्ध विमल धर्माची जर त्यांना गोडी लावून द्यावयाची असेल, तर अशा वेळीं जुन्या समजुतींत वाढलेल्या, विवाह झाल्या नंतरही रूढ धर्मसमजुती स्वीकार केलेल्या, इतकेंच नव्हे, तर शुद्ध व विमल धर्माचा तिरस्कार करीत असलेल्या, पण अखेरीस त्याच धर्माची पूर्ण अनुयायी बनलेल्या साध्वी स्त्रीचें चरित्र हें काम करूं शकणार नाहीं असें कोण ह्मणेल !

बाबु केशव चंद्रसेन ह्यांनीं एकेश्वरीधर्माच्या प्रसारास बरीच मदत केली. ब्राह्मधर्मासंबंधानें लोकांत विशेष जागृति उत्पन्न करावयास तेच कारण झाले. त्यांचा अंत होण्यापूर्वीचें त्यांचें वर्तन व विचार जरी पुष्कळांस मान्य नाहींत, व त्यासंबंधानें आज ब्राह्मलोकांतही जरी बराच मतभेद आहे, तरी बाबू केशव चंद्रसेन हे एक थोर पुरुष होऊन गेले व त्यांच्यांत बरेच असाधारण गुण

होतें ह्याविषयीं कोणासही संशय नाहीं. अशा वेळीं ज्याप्रमाणें ह्या थोरपुरुषाचें चरित्र लोकांपुढें आहे त्याप्रमाणें त्यांच्या पत्नीचें चरित्रही स्त्रीसमुहापुढें ठेविलें तर त्यापासून त्यांना विशेष फायदा होईल असें वाटल्यावरून तिचें अल्प चरित्र पुढें दिलें आहे

## जन्म व बाळपण.

कलकत्त्यापासून सुमारें १० मैलावर ' अगरपाडा ' ह्या नांवाचें एक खेडें आहे. तेथें वैद्य कुळांत जगन्मोहिनी देवी ह्यांचा ता. २६ डिसेंबर सन १८४७ रोजीं जन्म झाला. ह्यांच्या पित्याचें नांव चंद्रकुमार मुझुमदार. जगन्मोहिनी देवीस लहानपणी गुलाब सुंदरी असेंहा ह्मणत असत. आणि बाह्य सौंदर्याच्या दृष्टीनें पाहिलें तरी बाळपणीं व नंतर तरुणपणीं त्यांचें लावण्य अप्रतिम होतें. पण ह्या बाह्य सौंदर्यांत अंःतकरणाच्या सौंदर्याची जर भर पडली नसती तर गुलाब सुंदरीचें चरित्र आज येथें लिहिण्याचा प्रसंग आलाच नसता हें उघड आहे. बाबू केशव चंद्रसेन ह्यांच्याशीं जगन्मोहिनी देवीचें लग्न तिच्या नवव्या वर्षीं झालें. बाबू केशव ह्यांचें कुटुंब खानदानी मानिलेलें. अर्थात हें लग्न मोठ्या थाटानें झालें. ह्या वेळा संबंधानें बाबू केशव चंद्रसेन ह्यांनीं आपल्या " जीवनवेद " नामक स्वलिखित चरित्रांत ह्मटलें आहे कीं, ह्या वेळापासूनच ऐहिक विषयांत सौख्य, आनंद व रमणीयपणा नाहीं असें त्यांस वाटूं लागलें. असो. वयांत आल्यावर जगन्मोहिनी देवी पति गृहीं आली. पण तेथें आल्यावर तिची बहुतेक निराशाच झाली, असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं. " सेन " कुटुंब फार मोठें; कुटुंबांतील कोणी वडील माणसें हिचा तिरस्कार करीत किंवा हिच्यामागें विशेष जाच वगैरे होता असें जरी नाहीं, तरी यौवनावस्थेंतील अप्रगल्भ विचारांच्या युवतीस आपल्या पतीची तरुण वयांतीलच वैराग्यवृत्ति पाहून खेद झाला तर त्यांत नवल तें काय ? केशव चंद्रसेन हे आपल्या पत्नीकडे कधीं पहातसुद्धां नसत, त्यांच्या मनांत तिच्या विषयीं कधी विचारही येत नसत.

आणि त्या विशाल कुटुंबांतील इतर सर्व समवयस्क मुली आपल्या पतींच्या संगतिसुखाचा सुखमय अनुभव घेत आहेत हें पाहून जगन्मोहिनीस विशेष खेद होत असे. पण, आपली स्थिति तीस कोणासही कळवितां येत नसे. ही अशी स्थिति फार दिवस सहन न झाल्यामुळें जगन्मोहिनी कांहीं दिवस, आजारी सुद्धां पडली. तिला प्रथम आपलें जीवित विफळ होणार असें वाटत असे. पण, त्यावेळीं ही तिची भ्रममूलक समजूत होती! जो पति तिला तरुण वयांत आपल्या सुखाविषयीं अगदीं उदासीन आहे असें वाटत असे त्याचें खरें वैभव, त्याचें खरें प्रेम नंतर अनुभविल्यावर जगन्मोहिनी देवीस आपल्या पूर्वीच्या विचारांबद्दल किती तरी खेद होत असेल!

नानक, चैतन्य, बुद्ध, तुकाराम, आदिकरून साधु पुरुषांच्या चरित्रांत एक सर्वसाधारण गोष्ट दिसून येते; ती अशी कीं, संसारसुख पत्नीसमागम सुख—ह्याविषयीं ते अगदीं बेपर्वा असत. नानक ह्याचें संसाराकडे लक्ष नसे ह्मणून त्यांची पत्नी "चौनीजी" ही फार खेद करीत असे. चैतन्य, बुद्ध ह्यांच्या स्त्रिया आपले पति आपला त्याग करून गेले ह्मणून अखेरपर्यंत खेद करीत होत्या. आणि साधु तुकारामाच्या चरित्राची व त्यांच्या संसाराची तर आपणांस साधारणपणें माहिती आहेच. पण, ह्या सर्व साधूंच्या चरित्रांपेक्षां संसारासंबंधाचें बाबू केशव चंद्रसेन व जगन्मोहिनी देवी ह्यांचें चरित्र भिन्न आहे, हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

साधारणपणें आपल्या स्त्रियांत इतर देशांतील स्त्रियांपेक्षां जो विशेष गुण आढळतो व ज्यामुळें अनेकवेळां त्यांचें अपरिमित हित झाल्याचा अनुभव आहे, तो असा कीं, पतीचें आपल्याकडे लक्ष असो वा नसो, पतीचें आपल्यावर प्रेम असो वा नसो, पति सद्गुणी असो वा दुर्गुणी असो, तो विद्वान असो वा अविद्वान असो, लोकांत पूजनीय असो वा नसो, त्याच्या पत्नीचें ह्या गुणांकडे लक्ष नसतें व तिचे घरांत कितीही हाल होत असले, पति समागमसुख—

संसारसुख हें जरी तिला लाभत नसलें तरी आपल्या पतीविषयीं तिच्या अंतःकरणांत शुद्ध पूज्यबुद्धि असते. पति हें आपलें दैवत, अर्थात तें आपणांस पूजनीय, अशी अनेक स्त्रियांची समजूत असते व ह्या समजुतीच्या बळावर दुर्गुणी पतींच्या सहवासांतही त्या संसाराचा गाडा चालवीत असल्याचें दिसून येतें. जगन्मोहिनी देवीची स्थिति कांहींअंशीं अशाच तऱ्हेची असे. आपला पति दुर्गुणी नाहीं, व त्याला संगतही चांगल्यांची आहे, ह्या विषयीं तिला खातरी होती. पण, तो आपल्याविषयीं अति निष्काळजीपणा दाखवितो, किंवा आपल्या एकंदर ज्ञातीनें, आपल्या प्रचलित धर्मानें, आपल्या आप्तांनीं भ्रष्ट मानिलेल्या धर्मतत्वांचा त्यानें स्वीकार केला आहे, तो आपल्या समाजांतून पतित झाला आहे ह्मणून तिनें त्याच्या विषयीं कधींही अनादर दर्शविला नाहीं. आपल्या पतिविषयीं आपल्या कुटुंबांत होत असलेलीं भाषणें ऐकून ती स्वस्थ बसे. पण, तीं तिनें केशव चंद्रसेन ह्यांच्या कानावर घातलीं नाहींत. केशव चंद्रसेन ह्यांनीं ब्राह्मधर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांच्या ज्ञातीच्याच लोकांनीं त्यांचा छळ मांडिला असें नसून, खुद्द त्यांच्या आप्तांनींही त्यांना त्रास द्यावयास सोडिलें नाहीं. "सेन" कुटुंबांत वयांत आल्यावर कुटुंबाच्या गुरुपासून दीक्षा घेण्याची वहिवाट असे. त्याप्रमाणें केशव चंद्रसेन ह्यांजवर प्रसंग आला; तेव्हां त्यांनीं तें नाकारिलें व आपण ब्राह्मधर्माचे अनुयायी आहों, असें आपल्या सर्व आप्तांस विदित केलें. त्यावेळीं केशव चंद्रसेन ह्यांस फार त्रास झाला. जगन्मोहिनी देवीनें ब्राह्मधर्माचा स्वीकार केला नाहीं, असें जरी सर्वांस माहित होतें, तरी ती केशवचंद्रसेन ह्यांची पत्नी एवढ्यावरून तिला कुटुंबांतील माणसें छळीत असत.

ह्या अशा स्थितींत फार दिवस राहणें बरें नाहीं, व त्यापासून आपणास आपल्या मतांप्रमाणें आचरण ठेवितां येत नाहीं, अशी केशव चंद्रसेन ह्यांची खात्री झाल्यावर त्यांनीं एक मोठेंच धाडस केलें. ह्या वेळीं महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर ह्यांस सर्व ब्राह्मलोक

प्रधान आचार्य मानीत असत. पण, एकंदर जुन्या लोकांच्या दृष्टीनें ते पतित होते. सर्व लोक त्यांस भ्रष्ट झालेले असे समजत असत. ब्राह्म धर्माचा स्वीकार करणें ह्मणजे ख्रिस्ती किंवा मुसलमान होणें असा सर्वांचा त्यावेळीं समज असे. तेव्हां त्यांस सर्व लोकांनीं अति निंद्य गणावें ह्यांत कांहीं नवल नाहीं. अशी स्थिति असतां १८६१ सालीं ब्राह्म समाजाचा उत्सव चालू असतां केशव चंद्रसेन आपल्या पत्नीसह महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर ह्यांचे घरीं गेले. ते केवळ त्यांस भेटावयास, किंवा त्यांचें दर्शन घ्यावयास नव्हे, तर आपल्या सर्व कुटुंबाचा, आपल्या गृहाचा व आपल्या आप्तांचा त्याग करून, महर्षींच्याच घरीं राहावयास गेले! ह्यावेळीं गुलाबसुंदरीचें वय फक्त तेरा वर्षांचें होतें. तिचा ब्राह्मधर्मावर मुळींच विश्वास नव्हता. ब्राह्म धर्माविषयीं तिनें विचारही केला नव्हता. किंवा तितकें तिच्यांत अद्याप सामर्थ्यही आलें नव्हतें. पण, केशव चंद्रसेन यांनीं महर्षींच्या गृहीं जाण्याचा आपला निश्चय कळवितांच पति सान्निध राहणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें जाणून, मागें पुढें न पहातां, जगन्मोहिनी केशव चंद्रसेन ह्यांच्याबरोबर गेली. केशव चंद्रसेन ह्यांच्या सर्व आप्तांनीं ह्या प्रसंगीं फारच अडथळे आणिले. पण, त्यांकडे त्यांनीं मुळींच लक्ष दिलें नाहीं. अर्थात ह्या त्यांच्या कृतीमुळें जिकडे तिकडे मोठी चळवळ झाली! सर्व लोक केशव चंद्रसेन ह्यांचा तिरस्कार करूं लागले. व जगन्मोहिनी देवीविषयींही त्यांच्या ज्ञातींतील स्त्रिया वाईट उद्गार काढूं लागल्या.

वर एके ठिकाणीं नानक, चैतन्य, बुद्ध, तुकाराम ह्या साधु पुरुषांच्या चारित्रांपेक्षां केशवचंद्रसेन व जगन्मोहिनी देवी ह्यांचें चरित्र भिन्न आहे असें ह्मटलें आहे. त्याची साक्ष वरील एकाच गोष्टीवरून पटण्यासारखी आहे. चैतन्य, बुद्ध ह्यांनीं आपल्या पत्नींची पर्वा न करितां देशत्याग करून वैराग्यवृति धारण केली. पण, ह्या अर्वाचिन थोरे पुरुषानें आपल्या पत्नीसही आपल्या समा-

गर्में घेतली, व तेणेंकरून संसारांत राहूनच स्वोन्नति व परोन्नति कशी करून घेतां येते तें त्यांनीं दाखविलें. साधु तुकाराम यांनीं सुद्धां

नको त्यजूं स्त्रिया पोर ॥
बांधीं सोपे माझ्या घर ॥

असे उद्गार काढिले आहेत. पण, अनेक प्रसंगीं त्यांनीं संसाराविषयीं फारच विरक्तीही दाखविली आहे. केशवचंद्रसेन ह्यांनीं तसें केलें नाहीं. ह्मणूनच ही गोष्ट जगन्मोहिनी देवी व केशवचंद्रसेन ह्यांच्या चरित्रांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. असो.

केशवचंद्रसेन आपल्या पत्नीसह महर्षि देवेंद्रनाथ यांच्या येथें सुमारें आठ महिने राहिले. येथें असतांनाच जगन्मोहिनी देवीच्या धर्मसंबंधाच्या समजुतींत हळुहळु फरक पडत चालला. महर्षींच्या घरीं हें तरुण जोडपें कालक्रमण करीत असतां महर्षि ह्यांस आपल्या मुलांप्रमाणें मानीत असत. येथें असतांनाच जगन्मोहिनी देवीवर एक नवीनच प्रसंग आला. केशवचंद्रसेन ह्यांस महर्षींच्या येथें गळवांचा आजार झाला. हें त्यांचें दुखणें अनावर झालें व ते अशा स्थितींत असतांनाच त्यांना एका निराळ्या घरांत नेण्यांत आलें. हें घर त्यांच्या मित्राच्या घराजवळ होतें. केशवचंद्रसेन अत्यावस्थ होते तरी त्यांच्या आप्तांपैकीं कोणीही येऊन त्यांचा समाचार घेत नसे. घरात दुसरें कोणी नाहीं, आसपासच्या लोकांकडून विशेष मदत नाहीं, धीर देण्यासाठीं कोणी वडील किंवा बरोबरीचें माणूसही जवळ नाहीं, अशा स्थितींत जगन्मोहिनी देवीस रात्रंदिवस पतिसन्निध राहावें लागत असे. केशवचंद्रसेन ह्यांचें दुखणें ह्या वेळीं तर इतकें विकोपास गेलें होतें कीं, कोणत्यावेळीं काय होईल आणि काय नाहीं याचा नियम नव्हता. जगन्मोहिनी देवीनें ह्यावेळीं जें अलौकिक धैर्य दाखविलें, ईश्वरावरील दृढविश्वास व आपल्या पतिविषयीं प्रेम व पूज्यबुद्धि जी दर्शविली तिचा परिणाम ईश्वराच्या दयेनें चांगला झाला. केशव चंद्रसेन

ह्यांच्या प्रकृतीस आराम पडला. व ह्याचवेळीं जगन्मोहिनी देवीस पुत्ररत्न झालें. त्याचें नांव करुणचंद्र असें ठेवण्यांत आलें.

आपल्या ह्या प्रांतीं पति पत्निमध्यें विचारसाम्य नसल्याचें अनेक वेळां आढळून येतें. पति फार विद्वान, ज्ञाता, लोक पुढारी, तत्वज्ञानी; आणि त्याची पत्नी अगदीं अज्ञानी, इतकेंच नव्हे, तर ज्ञानाचा, शिक्षणाचा तिरस्कार करणारी ! असा हा प्रकार अनेक ठिकाणीं घडत असल्यामुळें किती तरी लोकांचें संसारसुख नष्ट होतें ! बाहेर मोठमोठ्या गोष्टी करण्याविषयीं आव घालावयाचा, मोठमोठ्या धर्म अगर समाज सुधारणेवर व्याख्यानें द्यावयाचीं, मोठमोठ्या कौटुंबिक सुधारणेच्या गप्पा मारावयाच्या आणि तेथूनच घरीं परत आल्यावर सर्व अंधार !! तीं मोठमोठीं धर्म सुधारणेचीं व्याख्यानें, तत्वज्ञानाच्या गोष्टी, ती अति श्रेष्ट कौटुंबिक सुधारणा व्यासपीठाच्या सभोंवतालच्या वातावरणांतच ! श्रोत्यांच्या व व्याख्यात्यांच्या घरींही सारखीच स्थिति ! ह्या अत्यंत शोचनीय स्थितीचा अनुभव विद्वान ह्मणविणाऱ्या अनेक गृहस्थांस येत असल्यामुळें तिचेविषयीं विशेष लिहिण्याची अवश्यकता नाहीं. ह्या ठिकाणीं ह्या विचारांची स्फूर्ति व्हावयास कारण असें झालें कीं, केशव चंद्रसेन ह्यांच्या कुटुंबांतही कांहीं अंशीं असाच प्रकार होता. प्रथमतः जगन्मोहिनी देवी तर अगदीं जुन्या मताची होती, हें वाचकांस माहीत आहेच. जसजसे प्रसंग येत गेले, तसतसा तिचा ब्राह्मधर्मासंबंधाचा गैरसमज दूर होत गेला व अखेरीस तिनें त्या धर्माचा स्वीकारही केला. पण, सामाजिक स्थितिसंबंधानें तसें नव्हतें. आपल्या समाजांतील चालीरीतीसंबंधानें वयांत आल्यावर झालेले तिचे ग्रह तिनें तसेच कायम ठेविले होते. ब्राह्मधर्मासंबंधानें तिची पूर्ण खातरी होईपर्यंत तिनें त्या धर्माचा अगदीं तिरस्कार केला ! आपले आप्त, बंधु, इष्ट, मित्र ह्या सर्वांचा त्याग करून जरी ती देवेंद्रनाथांच्या घरीं आपल्या पतीबरोबर गेली होती तरी तिनें

आपल्या पतीसाठीं ह्मणून ब्राह्मधर्मानुसार असें कांहीं केलें नाहीं. ह्यावरून जगन्मोहिनी देवीच्या स्वभावाची आपणांस चांगल्या रीतीनें ओळख होण्यासारखी आहे. त्या अल्प वयांतही विचार व आचारस्वातंत्र्य ह्मणून जें आहे तें तिच्याठायीं होतें आणि ह्मणूनच केशव चंद्रसेन ह्यांची तिच्याविषयीं एका प्रकारची विलक्षण पूज्य बुद्धि असे. जगन्मोहिनी देवी व आपल्या एकंदर हिंदुसमाजांतील अशिक्षित व साधारणपणें शिक्षित स्त्रिया ह्यांच्यात साधारणपणें मोठा फरक जो आहे तो हा कीं, आमच्या स्त्रिया शिक्षित जरी असल्या तरी त्यांना निराळें अस्तित्व ह्मणून नाहीं. विचारस्वातंत्र्य व आचार स्वातंत्र्य ह्यांची त्यांना ओळखही नाहीं! सामाजिक प्रगतीविषयीं अनुकूल असणाऱ्या अशा कितरी स्त्रिया आपल्या समाजांत सांपडतील कीं, ज्यांना कांहीं विवक्षित गोष्टी अन्यथा असें वाटत असूनही, आचार स्वातंत्र्य माहीत नसल्यामुळें, क्षुल्लक गोष्टींतही त्यांचेकडून विचारांप्रमाणें आचार होत नाहीं! पण एकार्थीं, ह्या बाबतींत स्त्रियांनाच कशाला हंसावयाचें? पुरुष काय ध्वज लावीत आहेत, तर त्यांच्याच पत्नींच्या संबंधानें समाजानें ज्यास्त अपेक्षा करावयाची! पण जगन्मोहिनी देवीची स्थिति अशी नव्हती. विचारस्वातंत्र्याची ज्योत तिच्यांत इतकी प्रबल होती कीं, सामाजिक किंवा धर्मसंबंधाच्या गोष्टींसंबंधानें तिनें आपल्या पतीशीं उघडपणें वादविवाद करावा व त्यासंबंधानें तिची खातरी झाली नाहीं तर तिनें कधींही माघार घेऊं नये. वाचकांस हें माहित आहेच कीं बंगाल्यांतील स्त्रिया पडद्यांत राहतात. तेथें शिक्षणाचा प्रसार जरी बराच झाला आहे, तरी अनेक सुशिक्षित लोकांसही ही गोषाची चाल अवश्य आहे असें वाटत आहे. प्रथमतः सर्व ब्राह्मंडळीही गोषास अनुकूल होती व नंतर हा गोषा काढून टाकून स्त्रियांस समाजांत उघडपणें हिंडू फिरूं द्यावें असें कांहीं ब्राह्म जेव्हा प्रतिपादावयास लागले तेव्हां मोठा खडाजंगी वाद झाला! आपल्या

ह्या प्रांताच्या लोकांच्या दृष्टीनें ही अगदीं क्षुल्लक गोष्ट; पण तिकडे त्यावेळीं ह्या सुधारलेल्या मंडळीनेंही त्या वादाला फार महत्व दिलें. व त्यामुळें निरनिराळे पक्षही झाले. अद्यापही सर्व ब्राह्म मंडळीनें गोषा टाकिलेला नाहीं. साधारण ब्राह्मसमाजांतील बहुतेक कुटुंबांनीं मात्र ही सुधारणा केली आहे. असो.

केशव चंद्रसेन ह्यांना आपल्या स्त्रियांचा गोषा नाहिंसा व्हावा असें मनापासून वाटत असे. पण, स्वतःच्या कुटुंबासंबंधानें मात्र त्यांचा ह्या बाबतींत इलाज नसे. आणि त्यांच्या समवयस्क मित्रांनीं आपल्या पत्नींच्या इच्छेविरुद्ध जेव्हां हा गोषा टाकून दिला असें त्यांस आढळलें व त्या त्यांच्या मित्रांनीं जगन्मोहिनी देवी ह्या बाबतींत आपला हट्ट सोडित नाहीं हें पाहून जेव्हां बरेंच असमाधान प्रदर्शित केलें, तेव्हां केशव चंद्रसेन ह्मणाले "आपल्या स्त्रियांच्या इच्छेविरुद्ध ही किंवा कोणतीही सुधारणा प्रचारांत आणणें बरें नाहीं. कोणतीही सुधारणा आंतूनच होत आली पाहिजे." हें केशव चंद्रसेन ह्यांचें मत सर्वांस मान्य होईल कीं नाहीं, ह्याचा संशयच आहे. आमच्या स्त्रिया अनेक प्रसंगीं कांहीं क्षुल्लक अशा नवीन प्रचारांस जो विनाकारण अवरोध करीत असतात तो, जगन्मोहिनी देवी सारखी त्यांची स्थिति असते ह्मणून नव्हे, तर तें केवळ नवीन आहे, प्रचारांतील नव्हे ह्मणूनच. केशव चंद्रसेन ह्यांनीं जे उद्गार काढिले ते आमच्या समाजास लागू करितां येतील कीं नाहीं, या विषयीं मतभेद असावयाची जरूरच नाहीं. त्यांची पत्नि सुशिक्षित व विवेकी होती. अर्थात् तिला जें अप्रशस्त वाटलें तें आपण तिला जुलमानें तिच्या इच्छेविरुद्ध करावयास लावण्यांत अर्थ नाहीं, असें त्यांस वाटणें हें साहजिकच आहे; पण आमच्या समाजाची स्थिति बरीच निराळी असल्यामुळें हा नियम आपणांस लागू करून घेतां येणार नाहीं. कारण, तसें करावयाचें जर कोणी मनांत आणिलें तर त्यास आपल्या कुटुंबांत सामाजिक किंवा धर्मसुधारणेचा प्रवेश होणें अशक्य असें आढळल्या वांचून राहणार नाहीं. एखादी सुधारणा प्रचारांत आणण्या संबंधानें केशव चंद्रसेन ह्यांचें जें वर मत दिलें आहे, त्यासंबं-

यानें एक महत्वाची गोष्ट अशी लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, कोणतीही सुधारणा कुटुंबांतील समंजस स्त्रियांच्या संमतीनें प्रचारांत आणिली तरच तिचेपासून फायदा होण्याचा संभव आहे. अवरोध होत असूनही एखादी नवीन, पण चांगली, गोष्ट प्रचारांत आणण्याचा प्रयत्न केला, किंवा प्रचारांत आणिली, तर त्यायोगें विशेष हित होणें शक्य नाहीं. ज्या आनंदासाठीं व सुखासाठीं एखादी गोष्ट करावयाची तो आनंद किंवा तें सुख जर त्या नवीन गोष्टीच्या प्रचारामुळें नाहिसें होऊं लागलें तर त्या नवीन गोष्टीचें महत्व कुटुंबांतील सर्व व्यक्तीस कसें कळावें ? अशा आणीबाणीच्या वेळीं, ह्मणजे एखादी नवीन गोष्ट प्रचारांत आणितानां जेव्हां स्त्रियांकडून विनाकारण अवरोध होत असतो तेव्हां— आणि असे प्रसंग विसंगत विचारांच्या कुटुंबांत थोडे येतात असें नाहीं-- आपले इच्छे प्रमाणें सर्व स्थिति घडवून आणण्यास एकच उपाय दिसतो. तो हाच कीं, ज्यांच्या कडून एखाद्या चांगल्या गोष्टीस अडथळा होतो त्यांचीं मनें अनुकूळ करावयास मोठ्या ईर्षेनें लागावें. आपल्या सयुक्तिक मुद्यांकडे दुर्लक्ष किंवा कानाडोळा करणें, ही स्थिति फार दिवस राहावयाची नाहीं. आपणास इष्ट असलेली स्थिति ह्या दिशेनेंच साध्य होईल. असो.

१८६९ सालीं जगन्मोहिनीची प्रकृति बरीच बिघडली. ह्मणून "मोंघीर" गांवीं तिला नेण्यांत आलें. ह्या ठिकाणीं हळुहळु तिच्या प्रकृतींत चांगला फरक पडत गेला. व त्यामुळें केशव चंद्रसेन ह्यांस आपलें धर्मप्रचारासंबंधाचें काम मोठ्या जोमानें करावयास बरेंच स्वाथ्य मिळालें. केशव चंद्रसेन ह्यांनीं "भक्ति" संबंधाची मोठी चळवळ ह्याच ठिकाणीं सुरू केली. त्यांनीं नेहमीं संकीर्तनें करावीं, धर्मसंबंधाचीं संभाषणें करावीं; व तेणेंकरून ब्राह्मधर्माचा प्रसार मोठ्या जारीनें करावा; असा प्रकार कांहीं दिवस तेथें चालला होता. जगन्मोहिनी नगरसंकीर्तनास जात असे. धर्मसंबंधानें जे वादविवाद होत असत ते सर्व जगन्मोहिनी मोठ्या आस्थेनें ऐकत असे. व त्यामुळें अध्यात्मिक बाबतींत आपली प्रगति करून घेणें तिला बरेंच सुलभ जाई. स्त्रियांच्या सभा ह्मणून जेथें जेथें होत असत तेथें जगन्मोहिनी नेहमीं जावयाची. आणि जगन्मोहिनी

 सं. पं. ५३७ ६८

सभेंत हजर असल्यावर अध्यक्षस्थानीं दुसऱ्या कोणाची नेमणूक कधींही होत नसे. **भारताश्रम** ह्या नांवाची कलकत्यास जी स्त्रियांची संस्था आहे तिची जगन्मोहिनी अध्यक्ष होती.

जगन्मोहिनी संबंधानें सर्व ब्राह्ममंडळी मध्यें मोठी पूज्यबुद्धि असे. तिच्यापेक्षां वयानें जे लहान ते तीस मातेप्रमाणें व मोठे ते तीस आपल्या भगिनीप्रमाणें मानीत असत. आणि हें ती केशव चंद्रसेन ह्यांची पत्नि होती ह्मणून नव्हे; तर तिचें शुद्धाचरण, विनयी स्वभाव, धार्मिक वृत्ति, इतरांवरील प्रेम वगैरे अत्यंत श्रेष्ठ गुण तिच्यांत बऱ्याच प्रमाणानें वास करीत आहेत हें पाहून सर्वांस तिच्याशीं तशा तऱ्हेनें आचरण ठेवावेंच लागे, असें ह्मणावयास हरकत नाहीं.

कुचबिहारच्या राज्याशीं केशव चंद्रसेन ह्यांच्या कुटुंबाचा जो संबंध जडला त्या संबंधानें अद्यापपर्यंत पुष्कळांत मतभेद आहे. ह्या लग्नासंबंधानें जेव्हां मागें मोठा खडाजंगी वाद झाला व हल्लींही जेव्हां जेव्हां ह्यासंबंधानें वाद चालूं लागतो तेव्हां कांहीं मंडळीं बराच दोष केशव चंद्रसेन ह्यांच्या पत्नीवर, अर्थात् जगन्मोहिनी देवीवर, लादतात. जगन्मोहिनी देवीच्या आग्रहामुळेंच तसा प्रकार झाला, असें त्यांचें ह्मणणें असतें. ह्यांत किती सत्यांश आहे तें आज सांगतां येणें शक्य नाहीं. ह्या प्रसंगामुळें ब्राह्ममंडळांत आपापसांत पुष्कळ मतभेद झाले. परस्परांत द्वेषभाव ही उद्भूत व्हावयास कांहीं अंशीं हा प्रसंग कारण झाला. तें कांहीं असलें तरी ह्या वादग्रस्त विषयासंबंधानें येथें चर्चा करीत बसण्यांत अर्थ नाहीं. देवीच्या चरित्राशीं त्या प्रसंगाचा कांहीं संबंध नाहीं.

हें लग्न झाल्यावर केशव चंद्रसेन ह्यांनी आपल्या चरित्रांत बराच फरक करावयास सुरुवात केली. ह्या वेळीं त्यांचें कुटुंब बरेंच मोठें झालेलें. त्यांस पांच मुलगे व पांच मुली होत्या. त्यांनीं संसारासंबंधाचें लक्ष बरेंच काढून घेतलें. व सर्व बोजा आपल्या वडील मुलावर व सुनेवर टाकिला. जगन्मोहिनी देवीही अर्थात् आपल्या पतीप्रमाणेंच आचरूं लागलीं. ह्याचवेळीं "लिली कॉटेज" विकत घेण्यांत आली. केशव चंद्रसेन व त्यांची पत्नि ह्यांनीं आपल्या एकंदर कुटुंबांत जी एक विशेष गोष्ट

केली ती ही कीं, त्यांनीं आपल्या धर्मसमजुती आपल्या जवळच ठेविल्या नाहींत. आपल्या सर्व मुलांस त्यांनीं ब्राह्मधर्मानुसार वाढविलें व त्यामुळें त्यांस आपल्या कुटुंबांत धर्मसंबंधाची अशी कोणतीच अडचण आली नाहीं. आपल्या ह्या प्रांतीं ह्या वर्तनाचें जर अनुकरण करण्यांत आलें असतें, तर किती चांगलें झालें असतें ? पति समाजमतानुयार्या, पण त्याच्या पत्नीस समाज ह्मणजे काय, त्याचीं मतें काय, आपले यजमान समाजमतानुयायी झाले आहेत ते कां, आपल्या जुन्या समजुतींत व आपल्याच पतीच्या हल्लीच्या मतांत विशेष फरक तो काय आहे, हें आमच्या स्त्रियांस मुळींच माहित नसतें. तें जाणून घेण्याची त्यांची इच्छाही नसते; व त्यांस ती जाणून घेण्याची इच्छा व्हावी अशी त्यांच्या मनाची तयारीही त्यांचे पती करीत नाहींत. अर्थात् कुटुंबांतील मातांची जर ही अशी स्थिति तर त्यांच्याच मुलांची याहून भिन्न स्थिति कोठून असावी? मुलांच्या अध्यात्मिक शिक्षणासंबंधानें आपल्यावर कांहीं जबाबदारी आहे असें पित्यांस वाटावयाचें नाहीं, आणि मातांची तर तितके विचार सुचण्यापर्यंतही मजल पोंचलेली नसावयाची. मग अशा स्थितींत मुलांना बापाचें वळण न लागलें तर त्यांत आश्चर्य तें काय ? आह्मी बेपर्वाईनें ज्या आडवाटेनें चाललों आहों ती केशव चंद्रसेन व त्यांची पत्नि ह्यांनीं धरिली नाहीं, आणि ह्मणून त्यांचीं मुलेंबाळेंसुद्धां त्यांच्याच मतांचीं झालीं इतकेंच नव्हे, तर त्यांचें अनुकरण इतर अनेक कुटुंबांनीं केलें. मुलांचें धर्मशिक्षण आईबापांच्या मतांप्रमाणें होऊं लागलें; व त्यामुळें आजकाल बंगाल्यांतील ब्राह्म कुटुंबांतील मुलांस व त्यांच्या आईबापांत धर्ममतासंबंधानें सहसा विशेपसा मतभेद दिसून न येण्यासारखी स्थिति झाली आहे. ह्याचें श्रेय केशव चंद्रसेन व श्रीमति जगन्मोहिनी देवी ह्यांसच बऱ्याच अंशानें देणें योग्य नव्हे काय ?

वर एक दोन ठिकाणीं असें ध्वनित करण्यांत आलेंच आहे कीं, केशव चंद्रसेन ह्यांचीं सर्व मतें एकेश्वरी धर्माचें अनुसरण करणाऱ्यांस सर्वांशीं मान्य होणें शक्य नाहीं. तरीपण ते थोर पुरुष होते अशा विषयीं मात्र फारसा मतभेद नाहीं. आतां आह्मी जी पुढें एक गोष्ट लिहिणार आहों

तीसुद्धां सर्वांस पसंत पडेल कीं नाहीं, ह्याचा संशय आहे. परंतु त्या गोष्टीशीं आमच्या चरित्रनायिकेचा संबंध असल्यामुळें ती येथें आह्मी देत आहों.

केशव चंद्रसेन ह्यांचें असें मत असे कीं, सर्व पौराणिक गाबाळ वजा केला असतां शिव व पार्वति ह्यांचें चरित्र अध्यात्म बाबतींत जगास अत्यंत अनुकरणीय आहे. ह्या विषयीं विशेष स्पष्टीकरणार्थ असा एखादा लेख कोठें असला तरी तो आमच्या वाचण्यांत आलेला नाहीं, येवढें येथें नमूद करणें जरूर आहे. असो. १८८१ सालीं त्यांनीं नवविधानाची स्थापना केली व १८८२ च्या आक्टोबर महिन्यांत ते एकदां हिमालयाच्या शिखरावर गेले असतां त्यांनीं पुढील सर्वांस अगदीं नवीन वाटणारी गोष्ट केली—

पुरुष व स्त्री ह्यांचा जो विवाह होतो तो साधारण विवाह. अध्यात्म विवाह ( Spiritual Marriage ) झाल्या वांचून उन्नतीचा खरा मार्ग लाभत नाहीं; जगाच्या रीतीप्रमाणें जीं विवाहित माणसें आहेत, तीं मोहपाषांत फार पडतात; जगास ज्ञानी करणें, अध्यात्मज्ञानाची गोडी लावणें, ईशभक्ती विषयीं त्यांच्या मनांत आस्था व प्रेम उत्पन्न करणें हें अध्यात्मविवाह केल्यानें चांगल्या रीतीनें साधतां येणार आहे, असें त्यांस वाटे. ह्मणून एके दिवशीं वर ह्मटल्या प्रमाणें, हिमाचलाच्या शिखरावर सहकुटुंब वास्तव्य करीत असतां त्यांनीं पुढील आशयाची बंगालींत प्रार्थना केली:—

जगन्नियंत्या परमेश्वरा ! आह्मीं दोघेंही कितीतरी दिवस धर्मसंबंधानें पूर्ण शांति मिळावी ह्मणून घरदार सोडून फिरत होतों. आह्मीं कोठें भडकूं, हांकारलेली नाव कोणत्या तिराला जाऊन पोंचेल अशा विषयीं कोणास कांहींच सांगतां येत नसे. पण बरेच दिवस भटकल्या नंतर अध्यात्म विवाहरूपी नवविधानाच्या अत्यंत पुण्यप्रद अशा घाटांस आमची बोट आतां लागली आहे. हे अनाथाच्या नाथा ! माझी पुष्कळ दिवसांची आशा पूर्ण करण्यास तूंच मला समर्थ केलें आहेस. एकवेळ आमचा विवाह घडवून आणण्यास तूंच कारण झालास; पण तसा विवाह ऐहिक दृष्ट्या

उपयुक्त असेल. पण, धर्म संबंधाच्या बाबतींत त्याचा फारसा उपयोग नाहीं. पूर्व विवाहित अशा ह्या दंपत्याची तूंच आतां नवीन अध्यात्म ग्रंथी बांधीत आहेस. आमचा तो पूर्व विवाह **बाळी** घाटावर झाला, पण हा **नवविधान** घाटावर होत आहे. इतउप्पर ऐहिक व्यवहारांत गुरफटून गेलेल्या पतिपत्नींस अननुभूत अशा प्रेमाचा अनुभव आह्मांस प्राप्त होईल. माते! माझी ही आशा लवकरच पूर्ण होईल, अशी माझी खातरी होती. प्रार्थनेच्या योगें काय लाभणार नाहीं? ह्या पामरास आजपर्यंत काय लाभलें नाहीं? प्रथम प्रथम माझी पत्नीही माझ्या मतांस अनुकूल न-व्हती; तिला अनुकूल करून घेणें फार प्रयासाचें होतें. पण, तुझी कृपा असल्यावर दुरभिमान व अप्रगल्भ विचार किती दिवस टिकणार? देवाधि देवा! वीस वर्षे सतत तुझ्या प्रार्थनेंत घालविलेल्या ह्या आत्म्यांचें आज साफल्य होत आहे. तूं आतां आपल्या चरणासन्निध आह्मांस अनंत काळचें सुख अनुभवण्यास केव्हां नेशील!

हाच **अध्यात्म विवाह.** त्यावेळीं झालेला संस्कार ह्मणजे वरील प्रार्थना. हा प्रकार अगदीं नवीन आहे. पण, वरील प्रार्थनेंत बारकाईनें पहाणारांस बरेंच विचारगांभिर्य आढळणार आहे. केशव चंद्रसेन ह्यांनीं ह्यावेळीं एक फोटो घेतला. व तो अद्याप अस्तित्वांत आहे.

आपल्या आयुष्यांतील हा एक विशेष प्रसंग होय, असें जगन्मोहि-नीला वाटलें. ह्या प्रसंगा नंतर दोघांनींही विशेष वैराग्यवृत्ति धारण केली. नेहमी देवाच्या चरणासन्निध राहण्यास ह्याच प्रसंगामुळें आप-णांत सामर्थ्य प्राप्त झालें, व आतां ह्यापेक्षां आणखी ज्यास्त सुखाची स्थिति ती काय असणार असें मानून देवाच्या सेवेंत असतां जगन्मोहि-नीवर बिकट प्रसंग गुजरला. हा बिकट प्रसंग ह्मणजे ब्रह्मानंद केशव चं-द्रसेन ह्यांचा परलोकवास होय. आमच्या वाचकांस हें माहित असेलच कीं, १८८४ च्या ज्यानेवारींत केशव चंद्रसेन ह्यांची ह्या लोकींची यात्रा संपली. त्यापूर्वीं त्यांची प्रकृति बरीच क्षिण झाली होती. त्यांच्या प्रकृ-तीस आराम पडावा ह्मणून शक्य तितके सर्व प्रयत्न केले. पण त्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. मृत्युपूर्वी त्यांनीं आपल्या नवविधानाविषयीं

त्यांच्या जवळ असणाऱ्या धर्म प्रचारकांस पुष्कळ सांगितलें. नवविधानास आपल्या मृत्यू नंतर अमुक अमुक अडथळे येतील असेंही त्यांनीं त्या-वेळीं भाकीत केलें.

## पतिनिधना नंतर—

आपल्या हिंदु समाजांत पूर्वी पति निधनानंतर त्याच्या पत्नीनें वैराग्यवृत्तीनें राहण्याची चाल प्रचारांत असावी, असें वाटतें. प्रौढ व-यांतील स्त्रीचा पति गत झाल्यावर वैराग्यवृत्ति धारण करून देवाच्या सेवेंतच तिनें राहावें, व परलोकीं आपल्या पति सन्निध जाण्याच्या प्रसंग लवकर यावा अशी तिनें मार्गप्रतिक्षा करीत असावें, ह्यांत विशेष गैर असें कांहीं आहे, असें नाहीं. फक्त आमच्या एकंदर समाजाची आज-ची स्थिति अशी आहे कीं, ह्या वैराग्य वृत्तीच्या वरचें टरफल मात्र आज राहिलें आहे. गतधवा स्त्रियांनीं आपलें विद्रूप करून घेणें, कितीही प्रखर थंडि असली तरी थंडी पासून रक्षण होण्यासाठीं अंगांत कांहीं न घालणें, हत्तीच्या सोंडे सारखी पर्जन्य वृष्टि पडत असली तरी छत्रीचा उपयोग न करणें, दिवसांतून एकच वेळ आहार करून राहणें, देवळांत राऊळांत जाऊन इतर संसारिक व्यवसाय करीत असतांच पुराण कीर्तनाचें श्रवण करणें वगैरे प्रकार खऱ्या वैराग्यवृत्तीच्या टरफलाचे भाग होत. ह्या पेक्षां विशेष स्पृहणीय अशी स्थिति आहे अशा विषयीं कल्पनाच आजच्या आमच्या विधवा स्त्रियांस नसावी.

आमच्या चरित्रनायिकेची स्थिति पति निधना नंतर अशी नव्हती. आपला सर्व सुखाचें साधन करून देणारा, अधर्मवृत्तीपासून पराङ्मुख करणारा, देवाच्या सेवेविषयीं अभिरुची लावणारा, पूर्वीच्या अज्ञानी स्थितींतून काढून ज्ञानमय प्रकाशांत आणून सोडणारा व आपलें सर्वस्व होऊन बसलेला पूज्य पति परलोकवासी झाला हें पहातांच तिच्या वैराग्यवृत्तींत ज्यास्त भर पडली. आपल्या आत्म्याचा उत्तमांश नाहिंसा झाला आहे व काळेंकरून तो आपणांस प्राप्त झालाच पाहिजे ह्या सुखप्रद आशेंत ती ईश्वराची अनन्यभावें सेवा करून काळक्रमण करूं लागली. आपल्या परलोकस्थ पतीचें आपल्यावर पूर्ववत प्रेम आहे व तो

आपल्यासाठीं अनंतकाळ टिकणारें सुखाचें स्थान तयार करण्यासाठीं पुढें गेला आहे, असें तिनें मानावें. केशव चंद्रसेन ह्यांच्या प्रार्थना अत्यंत प्रेमळ असत. त्या इतक्या कीं, शांतपणें श्रवण करणाऱ्यांच्या अंतःकरणांवर इतका परिणाम व्हावा कीं, त्यांच्या डोळ्यांतून सारखा अश्रुपात होत असावा. तशाच तऱ्हेच्या अत्यंत प्रेमळ प्रार्थना देवी करीत असावयाची. अत्यंत प्रेमळ प्रार्थना, व केशव चंद्रसेन ह्यांच्या प्रसिद्ध एक ताऱ्याच्या साह्यानें ईशस्तवनपर पदांचें गायन हें अक्षय चालूं असे व त्यांतच नेहमी ती तल्लिन असावयाची.

ब्राह्म समाजांतील सर्व पक्षांच्या मंडळींत देवी विषयीं मोठी पूज्यबुद्धि असे. विशेषतः धर्मप्रचारकांवर देवींचें मोठें प्रेम असे. नवविधान पक्षाचे कांहीं प्रचारक देवीशीं तासच्यातास संभाषण करीत. व त्यावेळीं देवींची धर्मबुद्धि, धर्मप्रचाराविषयीं तिची आस्था, सर्व ब्राह्म मंडळावरील तिचें प्रेम, ईश्वरावरील तिची अनुपमेय श्रद्धा, स्वधर्माविषयींचा मोठा अभिमान वगैरे पाहून तिच्या विषयींची त्यांची पूज्यबुद्धि दिवसें दिवस ज्यास्त ज्यास्त वृद्धिंगत होई. धर्मप्रचारकां पैकीं कोणावर कांहीं संकट आलें, एखादा अणीबाणीचा प्रसंग ओढवला, ह्मणजे मातेसमान मानिलेल्या ह्या साध्वीकडे त्यांनीं जावें. आणि तेथें गेल्यावर अंतःकरणास शांति ही प्राप्त व्हावयाचीच.

देवाच्या सेवेकडे देवींचें सर्व लक्ष असे. व त्यामुळें स्वतःच्या प्रकृतीविषयीं काळजी घेण्याचा विचार तिला कधींच सुचला नाहीं व त्यामुळें मधुमेहाची व्यथा तिला जडली. ब्रह्मानंद केशव चंद्रसेन ह्यांचा अंत होण्यास हाच घातकी रोग कारण झाला. ही दुष्ट व्यथा जडतांच अपला अंत समीप आला आहे, अशी तिची खातरी होऊं लागली. व इकडे दुखणें तर दिवसेंदिवस ज्यास्तच वाढूं लागलें. १८९७ च्या मे महिन्यांत देवींची प्रकृति फारच बिघडली. त्यावेळच्या दुखण्यांतून ती वांचेल असें त्यावेळीं कोणासही वाटलें नाहीं. ह्या दुखण्यांतून देवी वांचली खरी; परंतु तिची पूर्वींची शक्ति नाहिंशी झाली व ती दिवसें दिवस ज्यास्त अशक्त होऊं लागली.

देवीची प्रकृति जरी इतक्या नाजुक स्थितींत होती तरी ब्राह्मसमाजाच्या ६८ व्या वार्षिकोत्सवाच्या प्रसंगीं देवीनें बराच पुढाकार घेतला. आर्यनारी समाजाचा उत्सवही तेथें ह्याच वेळीं होत असतो. व त्यावेळीं जगन्मोहिनी देवीनें एक उपासनाही चालविली. हा उत्सव चालला असतांनाच देवीनें उद्गार काढिले कीं, मला आतां ह्या जगांत फार दिवस काढावयाचे नाहींत. पुढील सालचा उत्सव आपणांस पहावयास सांपडणें कठिण. आणि देवीचे हे उद्गार खरे झाले. उत्सवाच्या वेळीं बरेच श्रम केल्यामुळें ती अगदीं गलित झाली व तिच्या पाठीवर त्यानंतर लवकरच कांहीं व्यथा झाली. ह्या व्यथेपासून तीस फारच त्रास झाला. ह्यावेळीं परलोक, मुक्ति, अनंतकाळ ठिकाणीं सुख, ईश नामाचा महिमा ह्यां विषयीं आपल्या आसपासच्या लोकांनीं भाषणें केलीं ह्मणजे तीस फार समाधान वाटावें. अखेरीस अनेक औषधोपचार, वगैरेंचा कांहींच उपयोग झाला नाहीं. सोमवार ता. २८ फेब्रुवारीं रोजीं तर मृत्यूची कळा देवीच्या मुखावर दिसूं लागली. शेवटीं मंगळवार ता. १ मार्च १८९८ रोजीं सकाळीं आठ वाजतां श्रीमति जगन्मोहिनी देवीची इह लोकींची यात्रा " जगत् चिंतामणी ! आपल्या पदरीं घे " असें वाक्य उच्चारतां उच्चारतां संपली.

जगन्मोहिनी देवी सारख्या परमेश्वर भक्त साध्वी स्त्रिया नेहमीं निर्माण होत नसतात. सर्व काळच्या लोकांस अशा साध्वी स्त्रियांच्या, किंवा साधु पुरुषांच्या संगतीचा लाभ मिळणें शक्य नसतें. त्यांचीं प्रसिद्ध झालेलीं लहान मोठीं चरित्रें हींच त्यांचें विषयीं कमी ज्यास्त माहिती करून देणारीं साधनें होत. हा विचार मनांत आणून मिळालेल्या माहितीच्या आधारानें हें जगन्मोहिनी देवीचें अल्प चरित्र विशेषतः भगिनी वर्गासाठीं लिहिलें आहे. धर्म हा विषय फार गहन आहे, स्त्रियांस त्यांत कांहीं कळणें शक्य नाहीं, अशी भ्रामक समजूत ज्यांची असेल त्यांची ती समजूत हें अल्प चरित्र वाचतांच नाहिंशी जरी नाहीं झाली, तरी तिचा जोर कमी होईल, अशी आशा करावयास जागा आहे.

नें झाली तरी ह्या मालेच्या उत्पादकांस मोठें समाधान होणार आहे. असो.

ह्या पुस्तकासंबंधानें एक महत्वाची गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे. जगन्मोहिनी देवीचें मराठींत लहानसें स्वतंत्र चरित्र छापून प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे असें कळतांच कुचबिहारच्या महाराणी साहेबांनीं आपल्या मातोश्रीच्या—जगन्मोहिनी देवीच्या—तसबिरा लंडनहून मुद्दाम छापवून आणविल्या. ह्याबद्दल आह्मी त्यांचे फार ऋणी आहों. त्यांनीं जर कृपा केली नसती तर देवीची तसबीरही आह्मांस मिळाली नसती व चरित्रा सोबत ती आह्मांस देतांही आली नसती.

आतां ज्या मालेचें हें चवथें पुस्तक आहे त्या माले संबंधानें येथें दोन शब्द लिहावे असा विचार आहे.

धर्मप्रचाराच्या संबंधानें एक विशेष गोष्ट अशी लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, जरी वास्तविक पहातां ह्या बाबतींत प्रत्येक लहान मोठ्या व्यक्तीवर कमी अधिक जबाबदारी आहे, तरी कांहीं विशिष्ट व्यक्तींनीं त्याकामीं इतरांपेक्षां प्रमाणतः ज्यास्त कार्य करावयास सिद्ध असलें पाहिजे. आणि ज्या ठिकाणीं स्वतंत्रपणें धर्मप्रचारकाची योजना नसते, किंवा ती अपुरी असते, अगर अनेक कारणांमुळें धर्मप्रचारकाच्या हातून व्हावें तसें कार्य होत नाहीं, त्याठिकाणीं तर विशिष्ट व्यक्तींनीं विशिष्ट कार्य उचलण्याची विशेष अवश्यकता असते. अर्थात् अशा वेळीं आपला जसा मगदूर असेल त्याप्रमाणें धर्मप्रचारास मदत करण्याची जबाबदारी **नवीन पिढीवर** येते. ही विचारजागृति मनांत विशेष जोरानें झाल्यामुळें येथील समाजाच्या कांहीं तरुण सभासदांनीं आपल्याहातून कांहीं काम झालीं तर पहावीं असा विचार केला. दुर्दैवानें मंडळीकडून ज्या रीतीनें पद्धतशीर काम व्हावयास पाहिजे होतें तसें तें कधींच झालें नाहीं व पद्धतशीरपणें मंडळीची स्थापनाही झाली नाहीं. तरी पण ईश्वराच्या कृपेनें चार लहान लहान पुस्तकें प्रसिद्ध झालीं; व पैशासंबंधानें वगैरे पाहिजे तसें सहाय्य मिळत गेलें तर दरसाल लहान लहान अशीं ब्राह्मधर्मप्रतिपादक पुस्तकें निदान सहा तरि प्रसिद्ध करितां येतील. आपल्या हातून विशेषसें कार्य कांहींच होत नाहीं व धारण केलेलें नांव तर मोठें

आहे ह्मणून पुस्तकें प्रसिद्ध करिते वेळीं P. B. W. Series. असेंच प्रसिद्ध करण्यांत येत असतें. पुढील कार्य क्रमाविषयीं कायमची दिशा वगैरे ठरल्यावर लवकरच हल्लींचा संक्षेप सोडण्याचा सुप्रसंग येईल अशी उमेद आहे.

ब्राह्मधर्मप्रतिपादक लहान लहान निबंध, थोर थोर साधु पुरुष व साध्वी स्त्रिया ह्यांचीं चरित्रें प्रसिद्ध करून अत्यल्पमोल घेऊन, किंवा मुळींच मोल न घेतां त्यांचा प्रसार चांगल्या लोकांत केल्यानें धर्मप्रचारास थोडी बहुत मदत होईल असें ज्यांस वाटत असेल त्यांस तूर्त विनंती आहे कीं, लहान लहान पुस्तकें देखील प्रसिद्ध करण्याचें काम फार खर्चाचें आहे. चांगल्या चांगल्या लेखकांस उत्तम उत्तम विषयांवर निबंध लिहिण्यास सांगणें व त्यांचे जवळून ते लिहिवणें हें साधारणपणें फारसें अवघड नाहीं. पण ते निबंध, हितचिंतकांकडून खर्चा संबंधाची मदत न झाली तर, तसेच पडून राहण्याचा संभव आहे. करितां ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आह्मांस शक्त्यानुसार मदत करावी.

मुंबई, १ मार्च १८९९.

संपादक P. B. W. Series.

सहविचारिणी सभेची ग्रंथमाला.

'समाजसुधारणेच्या कित्येक बाजू' या पुस्तकापैकीं

नागेश विनायक बापटकृत.

# लीक्रेयरचरित्र.

प्रकाशक

खळे आणि मंडळी.

मुंबई येथें 'वर्तमानतत्वदर्शक' छापखान्यांत छापिलें.

सन १८६७ चे २५ वे आक्टाप्रमाणें नोंदवून सर्व हक्क राखले आहेत.

सन १८९४.

किंमत पांच आणे.

Baroda 26.6.98

Presented to

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें

by the

Author

# लीक्केअरचरित्र.

इसवी सन १८०१ च्या मे महिन्याच्या १४ व्या तारिखेस **एसी** गांवीं **लीक्केअर** जन्मला. आपल्या इकडे ज्या प्रदेशांतून **माण** नदी वाहत जाते त्याला **माणदेश** ह्मणतात. तसेंच **फ्रान्स**च्या मध्यभागीं **योण** नांवाची नदी आहे, ह्मणून त्या प्रदेशाला **योण-देश** ह्मणतात. त्या **योण**प्रदेशांत वर सांगितलेला **एसी** हा गांव आहे.

**लीक्केअर** हा तेथील एका **रोहिदासासारख्या** गरीब चांभाराचा मुलगा होता. बापानें त्याला गांवांतील गांवठी शाळेंत शिकावयास घातलें होतें; पण गरीबी असल्यामुळें आपल्या मुलाला सुद्धां लहानपणींच त्यानें कष्ट करावयास लाविलें. मुलगा दोन आणे चार आणे मिळवून आणील तेवढेंच सई, अशा समजुतीनें बापानें त्याची शाळा सोडविली. त्या वेळेस **लीक्केअर** लहान १० वर्षांचा बाळ होता. त्याला अक्षरवटिकेचें ज्ञान सुद्धां बरोबर झालें नव्हतें तोंच त्याची शाळा सुटली. अर्थात् त्याला ताव अर्धा ताव सुद्धां कधीं शुद्ध लिहितां आला नाहीं, ह्मणून पुढें शेंवटपर्यंत त्याचें मन त्याला वारं-वार खात असे.

**वाटर्लू**ची लढाई झाल्यावर तीन वर्षांनीं, ह्मणजे इसवी सन १८१८ सालीं **लीक्केअर**नें आपल्या जन्मभूमीस सलाम करून **पारिस** राजधानीचा रस्ता धरला. तेथें जाऊन आपल्या प्रारब्धाची परीक्षा पाहण्याचा त्यानें निश्चय केला. हा **रोहिदास**पुत्र आपल्या सत-राव्या वर्षी आपला गांव सोडून निघाला. आपल्या इकडे घाटावरचे

किंवा घाटाखालचे घाटी, कामाठी, कुणबी वगैरे लंगोटे लोक **कोंकणांतून मुंबईंत** हमाली किंवा दुसरा मोलमजुरीचा धंदा करून पोट भरण्यासाठीं जातात, आणि दोन पैसे मागें पाडून तो पैसा आपल्या मूळ गांवीं शेतीभातींत घालितात. तसेच **फ्रेंचलोक** शेतीभाती करून उदरनिर्वाह करणारे आपले आप्त, इष्ट, मित्र यांस सोडून दोन पैसे कमावण्याकरितां **पारिस** शहरीं जात असत. तें पाहून आपणाहि त्या धनवान् शहरांत जाऊन तेथें दोन पैसे गांठीं पडतील ते घेऊन आपल्या जन्मभूमीस फिरून एकदम परत जावें, आणि एकादा जमिनीचा तुकडा विकत घेऊन पुढें आपले म्हातारपणाचे दिवस आपल्या गांवीं राहून सुखानें काढावे, असें **लीक्लेअर**च्या मनानें घेतलें.

**पारिस** राजधानींत गेल्यावर तो इमारती रंगविण्याचें काम करणाऱ्या एका धंदेवाल्याकडे रंगाचा धंदा शिकावयासाठीं, अन्नवस्त्राची व कांहीं रोकड पगाराची बोली करून चाकरीस राहिला. सकाळची न्याहारी, दुपारचें व रात्रीचें जेवण, दर आठव्या दिवशीं थोडीशी चिरीमिरी म्हणून, शिवाय सालाच्या कांठीं थोडासा पगार, अशा करारानें यजमानाच्या घरीं राहून त्याच्या दोघां मुलांबरोबर कामधंदा करावा, असें ठरून तो त्याजपाशीं राहिला. पहिल्या वर्षी ४०, दुसऱ्या वर्षी ८०, आणि तिसऱ्या वर्षी १२० याप्रमाणें त्याचें साल वाढत गेलें. तेथें चाकरीस राहून तीन वर्षें पुरीं झालीं. वयाला वीस वर्षें झालीं, व याबरोबर वेतन वाढत गेलें, आणि वेतनाबरोबर आशाहि वाढत चालली. मग एक दिवस तो आपल्या धन्यास म्हणाला. "धनीसाहेब ! माझें एवढ्याशा सालानें भागत नाहीं. मला रोजीं निदान १॥ रुपया तरी मजुरी मिळाली पाहिजे." हें ऐकून धनी जरा चपापला. पण करतो काय ? असा मन लावून काम करणारा इमानी व होतकरू चाकर मिळतो कोठून? म्हणून मनांत नव्हतें, तरी चुनत त्याला त्याचें साल वाढवावें लागलें.

मग चौथ्या सालांत ४५० रुपये त्याच्या खिशांत पडले. त्या देशांत लष्करी कायद्याचा मोठा जुलूम होता. लष्करी खात्यांत ज्याची राहण्याची मर्जी नसेल, त्याला कांहीं पैसा भरावा लागे. तितक्यापुरती त्यानें आलेल्या रकमेंतून अजमासें २४० रुपयांची पुंजी मागें टाकिली.

वयाच्या २२ वे वर्षी लीक्केअरनें आपलें लग्न केलें. दोन हातांचे चार हात झाले. इतके दिवस एकच पोट होतें, आतां एकाचीं दोन झालीं. त्या मानानें त्याला अधिक खटपट करणें भाग पडलें. या दंपत्याला इतर सर्व प्रापंचिक सौख्यें प्राप्त झालीं; मात्र एकाची वाण होती, ती पुरी झाली नाहीं. संसारामध्यें ज्याला सर्व सुखाचें नाक मानिलें आहे, आणि ज्याला संस्कृतांत दोघांचा ‘ आनंदग्रंथि ’ असें नांव दिलें आहे, त्या अपत्याच्या सुखाला तीं नवराबायको शेंवटपर्यंत मुकलीं ! तरी पण लीक्केअरच्या पोटांतले मायेचे झरे यामुळें आटून गेले, असें झालें नाहीं. तिकडे त्यांना वाहण्याला मार्ग मिळेना म्हणून ती दिशा सोडून त्या झऱ्यांनीं समाजहिताची दिशा धरली. सारांश, संततीच्या अभावीं कायावाचामनानें समाजकल्याणाकडे अधिक लक्ष देण्यास तो मोकळा राहिला.

त्याच्या कारागिरीची ख्याति होऊन पुढें त्याला रोज २॥ रुपये मजुरी मिळूं लागली. पुढें लौकरच अडीचाचे तीन, साडेतीन झाले. पुढें २६ व्या वर्षी त्यानें आपल्या स्वतःच्या भांडवलावर एक स्वतंत्र रंगाचा कारखाना काढिला. त्याच्याजवळ त्या वेळेस ४०० रुपयांहून अधिक भांडवल नव्हतें, तरी पुढें दोन वर्षीनीं सात इमारती आठ हजार रुपयांला रंगवून देण्याचा त्यानें मक्ता घेतला. त्यानें असा लहान तोंडानें मोठा घास घेतला, म्हणून त्याच्या सोबत्यांनीं त्याची पुष्कळ फजीती केली.

तरी त्यानें आपली हिंमत सोडली नाहीं. "हिंमत मर्दा मदद खुदा" ही ह्मण त्यानें आपल्या गळ्याशीं ताइतासारखी बांधून ठेविली होती. कारागिराला थोडी मजुरी देऊन वाईट काम करून घेण्यापेक्षां मनमुराद पगार देऊन लोक खुष राहतील असें उत्तम काम करून घेणें चांगलें, हें धंद्याला बरकत येण्याचें मूलतत्व त्याच्या हृदयांत बिंबून गेलें होतें. त्या वेळेस ह्मणजे ९० वर्षांपूर्वी **फ्रान्स** देशांत कारागिराला रोज दीड रुपया मजुरी मिळे. मनासारखें चांगलें काम होण्यासाठीं तो आपल्या कारागीर मजुरांला रोजचे दोन सवादोन रुपये मजुरी देऊं लागला; आणखी **लीक्लेअर** आपल्या मजुरांबरोबर स्वतः खांदा देऊन खपत असे, यामुळें आपण कोणत्या प्रकारचें काम केलें असतां आपल्या धन्याला पसंत पडेल, हें त्यांना चांगलें कळून चुकलें होतें. पूर्वीं कधीं कोणास ठाऊक नाहीं, असें सुसूत्र व सुयंत्रपणानें त्याचें रंग देण्याच्या मक्त्याचें काम चाललें. कामावर मजूर उशिरा आल्याची तक्रार नाहीं, भांडण नाहीं, कज्जा नाहीं, आळसाचें नांव नाहीं, जेवणाखाणांत जास्ती वेळ घालवून अळं टळं केल्याचा बोभाट नाहीं, घंटा वाजल्याशिवाय कामावरून हालूं नये ह्मणून सक्तीचे नियम काढण्याची गरज लागली नाहीं, कांहीं एक नाहीं. जो तो सोंपिलेलें काम ह्मणजे जातीचें काम अशी भावना ठेवून कुचरपणा न करितां लक्ष लावून करीत असे. अशा रीतीनें पतकरलेलें काम कबूल केलेल्या मुदतींत त्यानें संपवून टाकिलें. तें काम पाहून मक्ता देणारा व इतर लोकहि खुष झाले. अखेरीस हिशेबाचें मान पाहतां त्याला त्या कंत्राटांत २४०० रुपये निवळ नफा उरला!

याप्रमाणें **लीक्लेअर**चा स्वतंत्र धंद्यांत बराच जम बसत चालला. दोन पैसे गांठीला पडूं लागले. शहरांतील इतर कारागीरहि त्याच्या आर्जवानें राहूं लागले.

असें होतां होतां इसवी सन १८३४ सालांत पारिस शहरांतील कांहीं सरकारी इमारती व ब्यांकेचें काम अशीं मोठमोठीं बांधकामें त्याला मिळालीं. थोडक्यांत तृप्त राहणारा दुसरा एकादा कच्चया छातीचा धंदेवाला असता, तर ' मिळालें इतकेंच बस्स झालें, आतां जास्ती आशा करण्यांत मजा नाहीं ' असा संकल्प करून मिळालेल्या नफ्यांत आनंद मानून स्वस्थ बसता. पण लीक्लेअरचा खाका कांहीं निराळाच होता. आपल्या पायापुरतें पाहून स्वस्थ बसणारा तो पुरुष नव्हता. याहून दुसरा अलौकिक चमत्कार असा कीं, आपल्या भर्त्यानें आपल्याच पोळीवर तूप ओढून स्वस्थ बसावें, असें त्याच्या अर्धभागिनी भार्येलाहि वाटत नसे. पोटीं पुत्र किंवा कन्या संतति नाहीं, जवळ दोन पैशांची माया, सभोंवती स्वहिताचा गराडा पडलेला, अशा प्रकारच्या दंपत्याचे थंडीच्या दिवसांत, रात्रीच्या वेळेस, शेगडीजवळ हातपाय शेंकीत कांहीं विचार चालत. अहाहा! किती त्यांचे ते थोर विचार! मजुरांना थोड्यांत थोडी मजुरी देऊन पुष्कळ काम करून घेण्याचे, ' अथवा आपण कुबेर बनून कामधंद्याच्या दगदगींतून मुक्त होऊन आनंदानें आपण कधीं राहूं ' असले कोते ग्राम्य विचार? छेः त्यांचें नांव कशाला? ' आपल्या आश्रित मोलमजुरांची आपल्याप्रमाणेंच सुखकारक स्थिति कशी होईल? त्यांना चांगली नीति व वळण कसें लागेल? व त्यांच्या गांठीला दोन पैसे कसे राहूं शकतील?' अशा उपयांची योजना करण्याची वाटाघाट त्या थोर मनाच्या नवराबायकोच्या मध्यें रात्रंदिवस चालत असे. **लीक्लेअर** इतर मजुरांप्रमाणेंच आपणाहि स्वतः एक मजूर होता; त्याच मजूरवर्गातून तो पुढें सरकला होता. प्रपंचांत काटकसर कशी करावी, उद्योगाची कास कशी बळकट धरावी, हातीं धरलेल्या धंद्याकडे कशी दक्षता ठेवावी, हें स्वतःच्या वागणुकीनें त्यानें इतर बंधुवर्गाच्या निदर्शनास चांगलें आणून दिलें. तो जणू त्यांच्या नजरेपुढें एक सर्वोत्कृष्ट नमुनाच

ठेविला होता. फांवल्या वेळांत पुस्तकें वाचून आपल्या बाल्यावस्थेंतील कोंवळया अभ्यासांत भर घालून त्यानें आपलें ज्ञानभांडाराहि बरेंच वाढविलें !

एवढ्यानेंच त्याची तृप्ति झाली नाहीं. दहांचा पोशिंदा एवढेंच ह्मणवून घेण्यांत त्याचें समाधान झालें नाहीं. हा नमुना इतर मानवी नमुन्यांहून कांहीं निराळ्याच तऱ्हेचा होता. मजुरांचा धनी होऊन राहणें व धनी ह्मणवून घेणें, हाच कायतो त्यांना नीतिशिक्षण देण्याचा धोपट व खरा मार्ग आहे असें तो समजत नव्हता. आश्रित मंडळीला धनीपणा सोंपून धनीपणाचे फायदे त्यांना मिळवून देऊन त्यांना आपली प्रतिमा बनविण्यांत, किंबहुना आपल्या मध्यें मिसळून जाण्यासाठीं त्यांना हात देण्यांतच तो भूषण मानीत असे. याप्रमाणें समाजहिताचें मूलतत्त्व या अलौकिक पुरुषाच्या अष्टांगीं भिनून गेलें होतें. बहुसमाजाचें हित नसून केवळ व्यक्तिविशेषाच्याच संकुचित हिताची गोष्ट असली, ह्मणजे तिचा तो मनापासून तिटकारा करी. तो नेहमीं ह्मणत असे कीं, 'अपूर्ण स्वरूपाची पूर्णता असावी असा सृष्टिकर्त्या विधात्याचा हेतु दिसत नाहीं. आपल्या सभोंवती जे दुःखराशि व दुर्गुणसमूह दिसतात, त्यांच्या अस्तित्वाची जबाबदारी आमच्या प्रत्येकाच्या हातीं त्यानें ठेविली आहे.' ह्मणजे व्यक्तिमात्रानें ऐहिक दुःखें व दुर्गुण कमी करण्यास झटलें पाहिजे. समाजहितासाठीं समाजानें—प्रत्येकानें निरनिराळें नव्हे—झटून खपलें पाहिजे. या दैविक तत्त्वावर त्याचा पूर्ण भरंवसा होता. आपल्या समाजाच्याच हातांत हात घालून, समाजांत मिळून मिसळून समाजाबरोबर तो काम करणारा होता. अशा एकवटून काम करण्यानेंच बंधुप्रीतीचा मोड हृदयभूमिकेंत उगवतो. हें धर्माचें खरें तत्त्व त्याला चांगलें कळलें होतें, आणि हेंच खरें तत्त्व दररोज हरघडीला त्याला यशःप्राप्ति करून देत होतें. त्याच्या आश्रित मंडळींत इतर धंदेवाल्यांपेक्षां त्याचा नैसर्गिक हुरूप अधिकाधिक संचार करूं

लागला. त्याचेंहि कारण खऱ्या तत्त्वाची ओळख हेंच होय. समाजहिताची पताका हातीं घेऊन दंभ माजविण्याचें त्याला कधीं आवडलें नाहीं. आपल्या हाताखालच्या लोकांना आपल्या फायद्याचे भागीदार होऊं देण्यांत, किंवा आपल्यांत मिसळूं देण्यांत आपल्या धंद्याला बरकत येणार नाहीं, अशी त्याची कोती समजूत नव्हती. तो ह्मणत असे कीं, "उद्योगधंद्यांत चढाओढ होण्यासाठीं माझ्या अल्प समजुतीप्रमाणें मीं ही एक युक्ति योजिली आहे, आणि याच युक्तीनें मानवी आकृतीच्या यंत्रांतून ( **पारिस**चे कारागिरांकडून ) सर्वोत्तम काम निपजूं लागेल असा माझा भरंवसा आहे". **लीक्लेअर**चा समाजहितासाठीं विशेषेंकरून झटण्याचा दुसरा हेतु असा होता कीं, आपल्या मजुरांना, वृद्धापकाळीं त्यांचे हातपाय थकले ह्मणजे, अन्नवस्त्राची ददात पडूं नये, आणि कारखान्यावरचे कारभारी नवेजुने झाले तरी मजूर लोक उघडे पडूं नयेत. ही समाजहिताची कळकळ मूळ त्याच्या डोक्यांत कोणी एक **फ्रेजियर** या नांवाच्या पुरुषानें भरली. पण ती कल्पना अखेर शेंवटाला कशी न्यावी याविषयींचा खर्डा नक्की करण्यास त्याला इसवी सन १८३५ ते १८४२ पर्यंत सात वर्षें लागलीं. तो ह्मणाला " या खर्ड्याची मीं अशा रीतीनें रचना केली आहे. मुळारंभीं मीं आपल्या मनाला असें पुसलें कीं, जर या कारखान्यांत कोणीं अधिक लक्ष लावून काम केलें, तर तितक्याच वेळांत ह्मणजे एकाच दिवसांत एक तासाच्या किंमतीइतकें चार आण्यांचें जास्ती काम तो करूं शकेल कीं नाहीं? शिवाय त्याला सोंपिलेल्या हत्यारांची विशेष काळजीनें तो जोपासना करील, तर त्यापासून रोज आणा दोन आण्यांची बचत राहील कीं नाहीं? या प्रश्नाला—होय, नफा होईल, बचत राहील—असाच जबाब मिळाला. मग दररोज पांच सहा आण्यांप्रमाणें एक सतत वर्षभर तीनशें दिवस एकाद्या धंद्यांत नफा होऊं लागला, तर वर्षाच्या कांठीं दर मजुराकडून अजमासें शंभर

रुपये किंवा कारखान्यांतील तीनशें मजुरांकडून सालाच्या कांठीं तीस हजार रुपये निव्वळ नफा उरेल. एवढा मोठा नफा विशेष आयास न करितां घरीं बसल्या होऊन सगळ्यांना या नफ्याचे वांटेदार करावयाचें! हा ठोकळ हिशेब अगदीं बरोबर आहे. यांत चूक-भूल नाहीं." अशी **लीकेअरची** खात्री होऊन इसवी सन १८३८ सालांत एका जुटानें काम करणारी एक लहानशी सभा (मंडळी) त्यानें स्थापिली. प्रथम तिला त्यानें छोटेसें नाव दिलें. मग ती वाढीस लागल्यावर तें चिमुकलें नांव बदलून तिला (Mutual Aid Society) **अन्योन्यसाहाय्यकारिणी** असें नांव दिलें. मजुरांच्या हिताचा तिनें नेहमी विचार करावा, एवढाच त्या सभेचा मुख्य हेतु होता. या सभेला दरमहा दर मजुरानें बारा आणे वर्गणी भरावी. या वर्गणीच्या रकमेंतून आजारी पडलेल्या दुखणाईत मनुष्यास तीन महिनेपर्यंत दररोज बारा आणे प्रमाणें भत्ता मिळावा; तसेंच औषधपाणी त्याला फुकट मिळावें, असें ठर-विलें. तरी हातपाय थकलेल्यांच्या पेनशनाच्या बाबतींत अजून त्याचा नक्की विचार झाला नव्हता. सभेच्या कलमयादींत असें एक कलम होतें कीं, सभासदांची मर्जी नसेल तर पंधरा वर्षांनीं ही मंडळी मोडून टाकून सभेचें भांडवल असेल तें सर्वांनीं सारखें वांटून घ्यावें. याच्या पुढ-च्या सालीं ह्मणजे १८३९ सालीं त्यानें तिसरी एक तजवीज काढली. कारखान्याचें काम अधिक उमेदीनें व्हावें ह्मणून मजुरांवरच्या मुख्य कामगाराला रोज बारा आणे, त्याच्या खालच्या मोकदमाला रोज तीन आणे, आणि नोकरीस राहून ज्याला दोन वर्षं पुरीं झालीं असतील त्याला रोज दीड आणा, याप्रमाणें नेहमीच्या पगारावर रोजिना जास्ती भत्ता देण्याचें ठरवून त्याप्रमाणें देण्यास सुरुवातहि केली.

पुढें इसवी सन १८४० च्या जून महिन्यांत विचार करण्यासाठीं अजमासें ऐंशी निवडक माणसांची सभा आपल्या खासगी घरीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

भरविण्याची लीक्लेअरनें सरकारची लेखी परवानगी घेतली. त्या वेळेस विसांहून अधिक माणसांचा सामाजिक मेळा सरकारच्या मंजुरी-शिवाय भरून एकत्र होऊं नये, असा कायदा होता; ह्मणून त्याला पोलिस अधिकाऱ्यांची रजाचिठ्ठी काढावी लागली. अशी रजा कोणाला फारशी मिळत नसे. ही जून महिन्याची सभा कोणत्याहि प्रकारची गडबड न होतां निर्विघ्नपणें पार पडली. पण इसवी सन १८४२ त आपला जमलेला नफा कशा रीतीनें वांटून दिला जाईल, हें सर्वांस जाहीर करण्यासाठीं जाहीरसभा भरविण्यासाठीं पुनः पोलिस-खात्याकडे त्यानें रजा मागितली. तेव्हां अशा जुटीबंद मंडळ्या एकत्र झाल्यापासून कांहीं अनिष्ट परिणाम निपजतील, अशी शंका घेऊन सभा भरविण्याच्या कामाला सरकारानें मनाई केली, व रजाचिठ्ठी देण्याचें साफ नाकारिलें.

मजूर लोक कोणत्याहि प्रकारच्या बंधनांत नसावे, त्यांना आपली मजुरी व नफातोटा ठरवण्याची पूर्ण मोकळीक असावी, या तत्त्वावर मुळीं समाजसभा स्थापन केली असून या उदार तत्त्वाला सरकारानें बाध आणिला, आणि आपल्या स्तुत्य उद्योगाकडे सरकारानें दुर्लक्ष केलें, ह्मणून या माहात्म्याचें धैर्य खचलें कीं काय? छे, छे, नांव कशाला? समाजसभा हें एक मजूर लोकांना आपल्या जाळ्यांत पडकण्यासाठीं कारखान्याच्या मालकानें एक प्रकारचें खूळ माजविलें आहे, ह्मणून लोकांना मदत करणाऱ्या असल्या सभा (मंडळ्या) होऊं देऊं नयेत, व असे मोठा धंदा करणारे मालकहि नसावेत, अशी राजपक्षाच्या लोकांची व वर्तमानपत्रांची कोल्हेकुई चालली होती. तिजकडे त्यानें बिलकुल लक्ष दिलें नाहीं; पण त्याच्याच पक्षाचे कांहीं लोक त्यांच्या स्वतःच्या फायद्याची गोष्ट असून प्रथम त्याच्या-विषयीं भलताच संशय घेऊं लागले, ह्मणून त्याला अतिशय वाईट

वाटलें. तरी ज्यांचा त्याजवर भरंवसा होता आणि ज्यांनीं त्याची कड घेतली होती त्यांचा टेका, व आपण केवळ शुद्धबुद्धीनें हें लोककल्याणाचें काम हातीं घेतलें आहे अशी मनाची पूर्ण निष्ठा, या दोन गोष्टींची खात्री असल्यामुळें मध्यें कितीहि विघ्नें आड आलीं, तरी त्यानें हातीं धरलेलें काम दृढ निश्चयानें चालविलें. मग आपला खरेपणा सिद्ध करण्यासाठीं, नफ्याच्या रकमेंतून प्रत्येकाला भाग मिळेल अशा आशयाचा एक खर्डा तयार केला होता त्याप्रमाणें रोकड पैसा हातीं पडला, ह्मणजे लोकांचा आपल्यावर भरंवसा बसेल, असें वाटून तो नफ्याची अजमासी रक्कम पाहूं लागला. पण त्या सालचा हिशेब निघाला नव्हता, ह्मणून गेलें साल ह्मणजे १८४१, त्या सालचा निव्वळ नफ्याचा आंकडा काढून मंडळीपैकीं चार संभावित व वाकबगार लोक आपल्या घरीं बोलावून त्यानें रुपयांनीं भरलेली थैली मेजावर आणून ठेविली. हिशेबाला निव्वळ ४७५० रुपयांचा नफ्याचा आंकडा दाखविला होता. त्या रकमेवर ४४ असामींचा हक्क पोहोंचत होता; ह्मणजे प्राप्तीच्या मानानें दर माणशीं सरासरी १०० रुपयांहून थोडी अधिक रकम वांटणीस आली. ती तेव्हांच्या तेव्हां देऊन टाकण्यासाठीं थैलीचें तोंड सोडून तो रुपये मोजूं लागला; तेव्हां सर्वांवर त्यानें जादू टाकिल्यासारखें झालें. त्याच्या अंतःकरण-शुद्धीविषयीं कोणालाहि संशय राहिला नाहीं. इसवी सन १८४२ त ४४ असामींना ४९०० रुपये, आणि पुढच्या सालीं ८२ असामींना ७८८० रुपये नफ्याबद्दल रोकड मिळाले. याप्रमाणें सालोसाल नफ्याचा आंकडा वाढत गेला, आणि पुढेंहि तसाच जोरानें वाढत चालला.

नफ्याच्या दृष्टीनें व काटकसरीच्या बाजूनें सन १८४२ ते १८५० पर्यंतचीं ९ वर्षें कारखान्याची उमेद खचण्यासारखें कांहीं

विशेष घडलें नाहीं; पण एका गोष्टीनें मात्र त्याला मोठा त्रास झाला. रंगाचा धंदा करणाऱ्या मजुरांमध्यें एका प्रकारचा आजार फैलावून त्यानें कारखान्यांतील बरेच लोक मरूं लागले, हें पाहून त्याला फार दुःख झालें. मग त्यानें आजारी माणसांची व बेनीफिटक्लबाची नोंद-बुकें तपासून पाहिलीं. त्यांवरून शेंकडा तीस माणसें शिशाच्या रंगांत काम करीत असल्यानें आजारी पडल्याचें दिसून आलें. शिशाच्या ऐवजीं दुसरी एकादी धातु योजून हा आजार कारखान्यांतून समूळ नाहींसा करण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. एका प्रख्यात रसायन-शास्त्रवेत्त्या डाक्टराशीं स्नेह जोडून त्याच्या साह्यानें त्यानें शास्त्रोक्त प्रयोग करून पाहिले. त्यांवरून शेंवटीं असें ठरलें कीं, शिशाच्या ऐवजीं ऑक्साइड किंवा जस्ताचें मिश्रणहि उपयोगी पडेल. हा नवीन शोध लागतांच त्यानें जस्ताच्या कांहीं खाणी भाड्यानें घेतल्या. मग **पारिस** शहरांत जस्ताच्या रंगाचा कारखाना सन १८४६ सालीं त्यानें काढिला; तेव्हां तेथें २४ तासांत ८०० रतल रंग तयार होऊं लागला. या नवीन शोधानें रंगाच्या धंद्याला अगदीं भिन्न प्रकारचें वळण लागलें. या धंद्यांत पडणाऱ्या मजुरांचीं निरनिराळीं दोन प्रकारचीं स्वरूपें दिसूं लागलीं. एक जुन्या पद्धतीचें आणि दुसरें नव्या पद्धतीचें. जुन्या पद्धती-ला जे चिकटून राहिले, ते अंगानें कृश, फिकट रंगाचे व दुखण्यानें झुर-णीस लागलेले असे दिसत; आणि नवीन शोधाच्या पद्धतीनें काम कर-णारे मजूर तजेलदार व शरीर प्रकृतीनें सदृढ असे दिसत. लीक्लेअरनें हा नवीनच शोध काढिला ह्मणून (Encouragement Society) **उत्ते-जक मंडळीनें** त्याला उत्तेजनार्थ बहुमानाचें एक सोन्याचें पदक बक्षीस दिलें. त्याचप्रमाणें सरकारानेंहि (Cross of the Legion of Honour) हा बिल्ला देऊन त्याचा मोठा मान केला. हा मोठा मान मिळण्यासाठीं **फ्रेंच** लोक नेहमीं लाळ घोटीत असतात. तो अनायासें

याला प्राप्त झाला. हल्लीं पारिस शहरांत शेंकडा पाऊणशे रंगाच्या कारखान्यांत शिशाच्या ऐवजीं जस्ताचा उपयोग करूं लागले आहेत.

इसवी सन १८३८ त मजुरांच्या उत्तेजनासाठीं अन्योन्यसाहाय्यकारिणी ( Mutual Aid Society ) या नांवाची सभा काढिली होती, ती पंधरा वर्षांच्या अंतीं ह्मणजे सन १८५३ त पाहिजे तर बंद करावी, असें नियमांत एक कलम घातलें होतें. त्याप्रमाणें त्या सालीं ती सभा मोडून टाकिली, आणि सभेचें भांडवल नफ्याच्या रकमेसुद्धां बाकी राहिलेल्या २९ सभासदांमध्यें वांटून दिलें.

पुढच्याच वर्षीं ह्मणजे सन १८५४ त पुनः पंधरा वर्षांच्याच मुदतीची आणखी एक नवीन सभा अगदीं निराळ्या नमुन्यावर स्थापिली. या सभेकडे मासिक वर्गणी भरण्याची शर्त ठेविली नाहीं. लीक्लेअरला रंगाच्या धंद्यांत जो नफा उरे तो लोकहितासाठीं वर्षांतून एकदां सभेकडे जमा करी. तोच पैसा त्या सभेचें मूळ भांडवल असें ठरलें. याप्रमाणें सन १८६० पर्यंत सहा वर्षांत या मंडळीचें १६ हजार रुपयांचें भांडवल जमलें. कलमबंदींत पुढें पंधरा वर्षांनीं मंडळी मोडून पैशाची वांटणी करून जाजम झाडावें, असें एक कलम घातलें होतें. ही मोठी चूक झाली असें सन १८६० सालीं लीक्लेअरच्या ध्यानांत आलें. कारखान्यांतले वृद्ध व पंगु पुरुष आणि विधवा बाया यांना पोटासाठीं कांहीं नियमित पेन्शन् बांधून देण्याच्या कामीं सदरचें कलम बाधक होऊं लागलें; पण पेन्शन्कडे पैसा खर्च होऊं लागला म्हणजे सभासदांचा तोटा होतो, म्हणन ते लीक्लेअरची पेन्शन्ची गोष्ट कांहीं केल्या कबूल करीनात. सहा वर्षांच्या थोड्या अवधींत मंडळीचें सोळा हजारांचें भांडवल जमलें. या हिशेबानें पंधरा वर्षांनीं निदान चाळीस हजारांचें भांडवल होईल अशी अटकळ दिसली. ही रक्कम ऐंशी सभासदांना वांटून दिली, तर दर एकाला ५०० पासून ६०० रुपयांपर्यंत मिळाले असतें.

एवढी मोठी रक्कम हाताची जाऊं देण्याला खुद्द **लीक्लेअर**चेहि नोकर लोक कबूल करतेना; पण नफ्याची रक्कम सालोसाल मंडळीकडे देण्याचा हक्क **लीक्लेअर**नें आपल्या हातीं ठेविला होता. ती रक्कम मी साफ भरीत नाहीं, असें तो एकाएकीं म्हणाला कीं, सर्व ऑफस झालें. मग सर्वच ग्रंथ आटप . तो म्हणाला "तुमची व तुमच्या मुलाबाळांची सोय निघावी म्हणून ही माझी खटपट आहे. इतक्या उपर नको म्हणाल तर माझें कांहीं जात नाहीं. पण पुढें मला हात आंखडून धरावा लागेल." हें अंजन पोहोंचल्याबरोबर त्यांचे डोळे उघडले. मग सर्वांनीं पेन्‌शन्‌ची गोष्ट लागलीच कबूल केली. आलेली अडचण पार पडली. यावर तो पुनः म्हणाला "तुमचा विचार फिरलेला पाहून मला आनंद झाला. मजवर तुम्हीं विश्वास टेविल्यानें मी तुमचा आभारी आहें. तुमची माझी ओळख झाल्यापासून तुमच्याबराबर बरेच वेळां मला वाद घालावा लागला. तुमचे माझे विचार भिन्न पडले, व पडावे हें साहजिक आहे. भिन्न विचार पडण्याचें कारण इतकेंच कीं, तुम्ही आपल्याच पायापुरते पहातां, आणि मला एकंदर समाजहिताचाहि विचार करावा लागतो. मंडळीच्या एकंदर भांडवलांतून पेन्‌शनासाठीं कांहीं रक्कम निराळी काढून ठेवावी हें बरें, कीं भांडवलाचा अंश गिळंकृत करून स्वस्थ बसणें हें बरें ? यांतून कोणतें कृत्य स्तुत्य याचा आपण खऱ्या दिलानें विचार करून सांगा. पेन्‌शनाची तरतूद केल्यानें धनीचाकरांत बेबनाव होत नाहीं, आणि कारखान्याला मजबुदी येऊन परस्परांत स्नेहभाव वृद्धिंगत होतो. तुह्मी आपापले अभिप्राय दर्शित केले त्यावरून मला वाटतें कीं, तुमच्यांतील कित्येकांच्या मनांत संशय असावा. तो असा कीं, माझ्या पाठीमागें हा कारखाना न चालतां बंद पडणार, माझ्या जोडीदार चालकांमध्यें फुटाफूट होईल, माझे मित्र एकोप्यानें राहणार नाहींत, दर एकजण आपापला भाग घेउन चालता होईल, आणि अखेरीस **म्यूच्युअल एड**

**सोसायटी** (Mutual Aid Society) नाहींशी होईल. पण अशी शंका माझ्या मनांत कधीं येत नाहीं. माझी जोडीदार मंडळी सचोटीनें वागणारी आहे. एवढी मोठी इमारत उभी करण्याला जिनें मला कम्मर बांधून मद्दत केली, ती चिरकाल कायम राखण्यासाठीं तिला मोठें भूषण वाटणार आहे. गृहस्थ हो! जर आपल्या हातून एकादें महत्कृत्य व्हावें अशी इच्छा असली, तर ती पार पाडण्याचेहि उपाय त्याचवेळेस शोधून काढिले पाहिजेत. ही मंडळी माझ्या पश्चात् अशीच निरंतर चालेल अशी जर लोकांची आतांच खात्री न झाली, तर या धंद्यांतून मला आपलें अंग काढून घेणें भाग आहे. कारण बुद्धि व शरीराची शाश्वती जर दिसेना, तर धैर्य तरी एकटें कितीसा टिकाव धरील? त्यालाहि कांहीं मर्यादा आहेच."

इसवी सन १८५४ सालीं पुनः नव्यानें (Mutual Aid Society) **अन्योन्यसाहाय्यकारिणी** स्थापन झाली. त्या मंडळीकडे दरसाल **लीक्लेअर**कडून त्याच्या धंद्याच्या फायद्यांतून दरसाल पैशाची मदत मिळत होती; आणि ती मदत चालू ठेवणें अगर बंद करणें, हें कवळ **लीक्लेअ-रच्या** इच्छेवर अवलंबून होतें. पंधरा वर्षांची मुदत संपल्यावर मंडळी मोडून टाकण्याचा आपला हेका सभासदांनीं सोडून दिल्याचें मागेंच कळविलें आहे. या कामांत त्यानें स्वहितबुद्धि अगदीं ठेविली नाहीं; व सभासदांनींहि मंडळी मोडून टाकण्याचा आपला हेका सोडून दिला हें उत्तम झालें, असें दर्शविण्यासाठीं इसवी सन १८६३ सालीं **लीक्लेअरनें** मंडळीचें भांडवल चाळीस हजारांपर्यंत वाढविलें, आणि तिचें नांव आपल्या भागीदारांमध्यें कायदेशीर रीतीनें नोंदून टाकिलें. ह्मणजे त्यानें आपल्या इतर भागीदारांप्रमाणें बरोबरच्या मंडळीलाहि भागीदारांचा हक्क दिला. पुढें इतर भागीदारांप्रमाणें या मंडळीच्या भांडवलापैकीं शेंकडा ५ टक्क्यांप्रमाणें या मंडळीला व्याज मिळूं लागलें; शिवाय दरसाल वर्षअखें-

रीस हिशेब झाल्यावर जो नफा उरेल त्यापैकीं शेंकडा २० टक्क्यांइतकी जास्ती रकम मंडळीच्या भांडवलांत टाकीन, म्हणून त्यानें कबुल केलें. बाकी राहिलेल्या नफ्याच्या रकमेंतून शेंकडा ३० टक्क्यांप्रमाणें दरेक मजुरास मिळावयाचे, त्याशिवाय मंडळीचे सभासद या नात्यानें एकंदरींत शेंकडा २० टक्क्यांप्रमाणें मिळावयाचें तें निराळेंच. बाकी ५० टके नफा राहिला तो त्यानें आपल्याकारितां व दुसरा एकादा नवीन भागीदार येऊन मिळाला तर त्याजकरितां ठेविला होता.

इसवी सन १८६४ त **लीक्लेअर** आपल्या कारखान्यांतील लोकांस म्हणाला "सभासद हो! तुम्ही आतां या कारखान्यांत 'रोज बुडाला आणि मजूर उडाला,' याप्रमाणें रोज मजुरी घेऊन काम करणारे नाहीं आहांत. सुटीची घांट वाजली कीं यंत्रें बंद, अशीं काम करणारीं मृत यंत्रें तुम्ही नाहीं आहांत. तुमच्याच हितासाठीं तुम्ही भागीदार या नात्यानें काम करणारे झाले आहांत. तेव्हां कारखान्याच्या कामांत तुम्ही याउपर उदासीन राहतां कामा नये. कारखान्यांतील यंत्रें, सामान व हत्यारें यांचे संरक्षक, मालक व वापरणारे तुम्हीच आहांत. सबब प्रत्येकानें त्यांजवर चांगली देखरेख अवश्य ठेविली पाहिजे."

सृष्टिनियमानुसारें **लीक्लेअरचें** जों जों उतार वय होत चाललें तों तों या कारखान्याची अशीच भरभराट कायम राहून आपल्यामागें तो कसा चालू राहील, याची त्याला रात्रंदिवस मोठी फिकीर लागली. त्यानें यापूर्वीं इ. स. १८६३ सालीं एका मित्राला लिहिलें होतें कीं, "जे मजबरोबर कामधंदा करून ज्ञातारे झाले आहेत, त्यांनीं माझ्या योजना बारीक नजरेनें लक्षांत आणिल्या तर असें दिसून येईल कीं, ही संस्था मी नाहींसा झाल्यावर माझ्या मागें अशीच सुयंत्र चालावी, म्हणून माझ्या मनांत एक सतत घोळत होतें."

इ. स. १८६९ च्या मार्च महिन्यांत **लीक्लेअरावर** दुर्दैवाचा एक मोठा घाला पडला. त्या सालीं त्याच्या प्रियकर भार्येचा व त्याचा निरंतरचा वियोग झाला. तिच्या सहवासांत त्यानें एक सतत ४२ वर्षें आनंदांत काढिलीं होतीं. त्याच्या मनांत जे जे हेतु होते त्यांना अनुसरून ती पडछायेप्रमाणें चालणारी बाई होती. **पारिस** शहराच्या मावळत्याला दोन तीन कोशांवर हरव्ले या नांवाचें एक खेडें आहे. तेथें या वृद्ध दंपत्यानें आपल्या मावळत्या वयांत एक लहानसा बंगला संपादन केला होता; पण अजून तीं त्या बंगल्यांत राहण्यास फारशीं गेलीं नव्हतीं. **पारिस** शहरांत ज्या घरांत त्यानें इतकीं वर्षें तिच्या सोबतींत सुखानें काढलीं, त्या घरांत पुढें एकट्यानें राहण्याचें त्याच्या मोठें जिवावर आलें. ह्मटलेंच आहे कीं, "**भोगाःके रमणीं विना क्षितितले**". ह्मणून आपल्या नवीन बंगल्यांत राहिलेले दिवस काढण्याचा त्यानें निश्चय केला. **पारिस** शहर सोडण्यांत दुसरा एक त्याचा हेतु तडीस जाण्यासारखा होता, तो असा कीं, कारखान्यापासून जरा दूर राहिल्यासारखें होईल, आणि दूर राहिल्यापासून आपल्यावांचून तो कसा चालतो हेंहि समजेल.

मग त्यानें कारखान्याचा सर्व कारभार **डिफोरनोसाहेबाला** सोंपिला. नंतर कांहीं दिवसांनीं त्याला त्यानें एकदां लिहिलें कीं, "मी ज्या ज्या वेळीं तुह्मांला **पारिस** येथें येऊन भेटेन, त्या त्या वेळीं मला तुह्मी विचारीत जा कीं, **लीक्लेअरा**, तूं इकडे कशाला आलास? **लीक्लेअरा** तूं आतां आपल्याच गांवीं राहून आनंदानें दिवस काढ. फावल्या वेळीं इकडे तिकडे बंगल्याभोंवती बागेंत फिर. बरेसें वाटल्यास थोडीशी दूरचीहि मुशाफरी कर. तूं आतां येथपर्यंत येण्याची तसदी घेतली नाहींस तरी चालेल. तुझें ७९ वर्षांचें उतारवय झालें आहे हें ध्यानांत धर. आतां स्वस्थ एकांत स्थळीं आराम घेऊन तुझें ईश्वरनाम जपण्याचे दिवस

मराठी ... ग्रंथालय
आं. १७

आहेत. दगदग करण्याचे दिवस मागेंच गेले. तूं नसतांना तुझ्याशिवाय हा कारखाना चालविण्याचें काम आह्मीं शिकलें पाहिजे." असो.

मे महिना ह्मणजे वसंत कालाचा महिना. त्या वळेस वसंत ऋतूचा ऐन बहार ! वृक्ष नूतन पल्लवानें फुलून गेले होते. अनेक प्रकारचीं फुलझाडें व फलझाडें फुलून टवटवीत दिसत होतीं. पुष्परसपानानें भ्रमरसमूह मत्त होऊन झाडांच्या सभोंवती गुंजारव करीत होता. त्या वनाला राजभवनाची भव्य शोभा आली होती. रात्रीच्या स्वच्छ चांदण्यानें उद्यानश्रीची मुखश्री अतिमनोहर दिसत होती. अशा बहरीच्या मे महिन्यांत ह्मणजे माधव मासांत "**उदारचरितानांतु वसुधैव कुटुंबकम्**" अशा या विभूतीचा जन्म झाला होता, ह्मणूनच जणू आमच्या चारित्रनायकाला शहरांत राहण्यापेक्षां खेडेगांवीं राहणें फार आवडे पण हरब्ले येथील बंगल्यांत राहून तें सुख शेंवटीं शेंवटीं भोगण्याचा त्याला योग आला. तिकडे जाऊन त्यानें आपली कायमची वस्ती केली, तेव्हां तो गांवकरी मंडळीस ह्मणे, "मोठ्या शहरांत जाऊन राहूं नका बरें. तेथें माणसांची गिचडी व गलबला फार असतो. आपल्या गांवीं आनंदांत राहून जमिनीची मेहनत मशागत करून सुधारणा करा. शेतकीची विद्या शास्त्रोक्त रीतीनें शिकून तयार व्हा."

याप्रमाणें लीक्लेअर तेथें आनंदसुखाचा उपभोग घेण्याकरितां राहिला खरा, पण त्याच्या कपाळीं ब्रह्मदेवानें विश्रांतिसुख लिहिलेलें नव्हतें. त्याच सालीं सप्टेंबरच्या २२ व्या तारखेस सरकारानें त्या गांवचा (Mayor) हा मुख्य अधिकाऱ्याचा हुद्दा तो नको नको ह्मणत असतां त्याच्या गळ्यांत बांधिला. तें काम त्यानें दोन वर्षें आणि आठ महिने फारच झटून केलें. त्या कामाची इतकी दगदग होती कीं, अशी दगदग त्याला तारुण्यांतहि पडली नसेल; तरी एकदा काम पतकरल्यावर मेहनत घेऊन तें करावयाचें, असा त्याचा

देह स्वभावच होता. गांवांत ज्या ज्या सुधारणांची गरज होती, त्या त्या करण्याचें त्यानें लागलेंच मनावर घेतलें. प्रथमतः तो गांवच्या सार्वजनिक सौख्याच्या पाठीस लागला. शेतकीचें मेहनतीचें काम तेथें बायकांच्या हातून घेत असत, तें लोकांना सांगून सांगून त्यानें बंद करविलें. अग्निशमनाचें बंबाचें यंत्र आणवून त्याजवर माणसें ठेविलीं. एक नवीन पुस्तकालय स्थापिलें, तें अद्यापि चांगल्या स्थितींत आहे. गांवांतील शाळेचा सुधारा केला. शालागृह पुरत नव्हतें, तें वाढवून मोठें केलें. शाळेला एक जास्त शिक्षक दिला. हिंवाळ्याच्या दिवसांत गरीब लोकांस अन्नाची भ्रांति असते, ह्मणून शाळेंतील गरीब विद्यार्थ्यांना धर्मार्थ दुपारचें एक वेळचें जेवण, पायांतला जोडा, व वस्त्र हीं मिळण्याकरितां गांवकरी लोकांच्या संमतीनें एक फंड उभारला. ह्मणच आहे कीं, 'गांव करी तें राव न करी.' गांवांत एक धर्मोपदेशक होता. तो जरा तुसडा हिरवट व मत्सरी होता, तरी त्याच्या तंत्रानें वागून त्याच्याशींहि त्यानें स्नेह जोडिला. लीक्केअर मनाचा थोर होता, यामुळें त्याचें कोणाशींहि वांकडें पडत नसे. धर्मोपदेशक गुणांनीं चांगला नव्हता, उथळ मनाचा होता; त्याच्या अंगीं भटुरक्या वृत्तीचीं सारीं लक्षणें होतीं. एकंदरीनें फ्रान्स देशांतील बहुतेक ग्रामोपाध्यायांची तऱ्हाच अशी असे. चांगलीं लोकहिताचीं कामें त्या बिचाऱ्यांच्या हातून होण्याचें दूरच, पण दुसऱ्यानें केलेलेंहि त्यांना खपत नसे. अशा मत्सरी स्वभावाचा तो उपाध्याय होता. लीक्केअरनें त्याच्याशीं इतका स्नेह ठेवला होता, तरी तो जीं जीं सुधारणेचीं कामें करी, त्यांजकडे मत्सरदृष्टीनें तो पहात असे. गांवाला सीन नांवाची नदी आहे. नदीकिनाऱ्याला गांवच्या कडेला उंच टेंकाड जमिनीवर प्रार्थनेकरितां एक ख्रिस्तमंदीर बांधलेलें आहे. त्याची पुढें लीक्केअरनें गांवखात्याकडून दुरस्ती करविली. माणसांनीं व अनेक व्यवसायांनीं गजबजलेलें पारिस शहर सोडून या गांवीं ज्या आरामबंग-

त्यांत तो रहात असे, तो हवाशीर बंगला ख्रिस्तमंदिरापासून जवळच पण जरा खोलगट जागेंत नदीच्या कांठाला बांधलेला होता. बंगल्या-सभोंवती लहानसा सुंदर बगीचा केला होता. त्या बागेंतून नजीकच्या टेंकडीवर जाण्याकरितां पायऱ्यांचा चढता नागमोडी रस्ता काढला होता. सहल करीत करीत टेंकडी चढून गेलें, ह्मणजे वरच्या सपाटीला बंगल्या-च्या हद्दींतच लीक्लेयरनें श्रमून भागून आलेल्या गरीब व वृद्ध माण-सांच्या विश्रांतीसाठीं एक बांक मांडून ठेविला होता. त्याजवर बसून चहूंकडे नजर फेंकली, ह्मणजे प्रेक्षकाला नदी व तिच्या आसमंतात् भागच्या प्रदेशांच्या देखाव्याची उत्तम मेजवानी मिळत असल्यामुळें वर सांगितलेल्या हेवेखोर उपाध्यायाशिवाय बाकी सर्व लहानथोर ग्रामस्थ अद्यापि लीक्लेअरची तारीफ करितात, व त्याचें स्मरण झालें ह्मणजे डोळ्यांतून अश्रु गाळून त्याच्या नांवाचा जयघोष करितात.

त्या गांवचा तो मुख्य अधिकारी ( मेयर ) झाल्यावर गांवची सुधारणा करण्याच्या संबंधानें जे बेत योजिले होते, ते बहुतेक शेंवटास गेले. एक बेत मात्र त्याच्या मनांतल्या मनांत राहिला. तो सिद्धीस गेला नाहीं. गांवच्या जमि-नीच्या लागवडीलाहि, माझें समाजतत्त्व लागूं करा, असें गांवच्या शेत-कऱ्यांस तो नेहमी कानीं कपाळीं सांगत होता. पण ती गोष्ट त्यांच्या मनांत बिंबली नाहीं. तीन हजार बिघे जमिनीचे तेविस हजार तुकडे करून सहाशें पंचवीस असामी शेतीचा धंदा करीत होते. एकएका शेतकऱ्याचे जमिनीचे लहानलहान तुकडे—येथें एक तर तेथें एक असे—चोहींकडे पसरले होते; यामुळें पुष्कळ जमिनीची लागवड न होतां पडतर पडली होती. दुसऱ्याच्या जमिनीला उपद्रव न होतां आपआपल्या फुटकळ नंबरा-पुरती शेती करण्याचें प्रत्येकास मोठें मुष्किलीचें झालें होतें. ही स्थिति पाहून लीक्लेअराला फार वाईट वाटलें, ह्मणून सर्वांनीं एकजुटीची शेतकी करण्यासाठीं त्यानें मेहेनत घेऊन एक मसुदाहि तयार केला होता. असो.

आतां तिकडे पारिसमध्यें डिफोरनो यांजकडे कारखान्याचा कारभार सोंपिल्यापासून त्याची दिवसेंदिवस कशी वृद्धि होत गेली, हें सांगण्यासाठीं लीक्लेअरला हरब्ले गांवींच शेतकरीमंडळीमध्यें सोडून पारिसच्या कारखान्याकडे वळूं..

सन १८६९ च्या जानेवारी महिन्यांत कारखान्याचें पहिलें स्वरूप अगदीं बदललें. त्या कारखान्यांत आपल्या नांवाशिवाय लीक्लेअरनें दुसरा कांहीं संबंध ठेविला नाहीं. त्या सालापर्यंत त्यानें कारखान्याची अनीन आपल्या हातीं ठेविली होती; पण पुढें त्यानें त्याला अगदीं मोकळें सोडून दिलें. त्या वेळेस कारखान्यांत एक लक्ष साठ हजारांचें भांडवल असून त्यापैकीं लीक्लेअरचे चाळीस हजार, डिफोरनोचे चाळीस हजार, आणि मजुरांच्या तर्फे (Mutual Aid Society) अन्योन्यसाहाय्यकारिणीच्या नांवें ऐंशी हजार, याप्रमाणें रकमा होत्या. नफ्यापैकीं शेंकडा १० टक्के रिझर्व फंड व मुद्दल भांडवलावर शेंकडा ५ टक्के व्याज येणेंप्रमाणें देऊन, बाकी राहिलेल्या नफ्यापैकीं २५ टक्के डिफोरनो याचा पगार व ७५ टक्के मजूर व मजुरांवरचे कामदार, यांप्रीत्यर्थ असत. या ७५ टक्क्यांपैकीं ५० टक्के त्यांना वांटून देण्याचे, आणि २५ टक्के ( Mutual Aid Society ) अन्योन्यसाहाय्यकारिणीकडे वार्षिक वर्गणीबद्दल जमा करावयाचे.

या हिशेबावरून दिसून येईल कीं, या नवीन व्यवस्थेंत लीक्लेअरनें नफ्याच्या आंकड्यांत आपला भाग मुळींच ठेविला नाहीं. मुद्दल रकमेंत त्याचा भाग होता, त्याजवर फक्त ५ टक्के व्याजावर त्यानें आपला हक्क ठेविला होता. पुढें हा कारखाना कोणत्या पद्धतीवर चालवावयाचा, याजबद्दल भागीदार व मजूर लोक यांजमध्यें पुष्कळ भवति न भवति होऊन जो ठराव झाला त्याप्रमाणें पुढें सुयंत्र काम चाललें. या कामाचे

सवाल काढून लोकांत प्रसिद्ध केले होते. त्यांपैकीं २०० असामींकडून जबाब आले ते पाहून अखेरचा निर्णय बहुमतानें ठरविला.

पुढें दुसरी एक त्यानें **नोयाँ*** या नांवाची जंगी सभा स्थापिली-जर्मनीचा **पारिस** शहराला वेढा पडला होता, त्या वेळेस **लीक्लेअर** 'हरब्ले' या गांवीं होता. पुढें **पारिस** शहरांत निरानिराळ्या पक्षांमध्यें लढा पडल्यावर तो तेथें गेला, व तेथून त्यानें आपल्या एका आप्ताला लिहिलें कीं, "**जर्मन** लोक **पारिस** शहर तोफा लावून उडवून टाकतील, तर आमचा कारखाना ढासळेल त्यांतच मीहि माझ्या मजुरांबरोबरच समाधि घेईन." आपल्या मरणाच्या आदल्या दिवशीं **लीक्लेअरनें डिफोरनो** याला लिहून पाठविलें होतें कीं, "कारखान्याची उलाढाल करितांना मजबरोबर जे लोक वृद्ध झाले आहेत, त्यांना फारच श्रम झाले आहेत. त्यांमध्येंहि विशेषेंकरून तुह्मांला मीं अतिशय त्रास दिला आहे, यामुळें माझ्या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत तर मी तुमचा ऋणी आहेंच; पण मेल्यावरहि तुमचें ऋण माझ्या हातून फिटण्यासारखें नाहीं. तुह्मी आपल्या आश्रितजनाला व आपल्याला संभाळून रहा, असें माझें हात जोडून सांगणें आहे. जोंपर्यंत खालच्या प्रतीच्या लोकांमध्यें खऱ्या ज्ञानाचा फैलाव होऊन अज्ञान नाहींसें झालें नाहीं, तोंपर्यंत त्यांना वर काढण्यासाठीं आम्हीं आपला हात दिलाच पाहिजे. असें केल्याशिवाय सुखांत रुळत असलेले श्रीमंत लोक आणि दुःखसागरांत लोळत असलेले गरीब लोक यांच्या मधला द्वेषभाव नाहींसा होणार नाहीं."

---

* हा शब्द **फ्रेंच** भाषेंतील असून त्याचा शब्दार्थ मगज किंवा गीर. ज्याप्रमाणें फळांतील मगज त्या फळाचा अत्युत्कृष्ट भाग असतो, त्याप्रमाणें ही **नोया** सभा असे; कारण ह्या सभेंत कारागीरमजुरांपैकीं उत्तम उत्तम निवडक कारागीर सभासद असत.

सन १८७२ च्या जुलईच्या १३ व्या तारखेस लीक्लेअर मरण पावला. त्या वेळेस त्याचें ७१ वर्षांचें वय होतें.

तारुण्यांत जीं सुखें स्वप्नवत् भासून होतीं, त्या सुखांचा त्यानें म्हातारपणीं यथेच्छ उपभोग घेतला. तो मेला त्या वेळेस त्याच्या शिलकेला चार लक्ष ऐंशी हजार रुपये होते. तो आपल्या मजुरांच्या कल्याणाकडे आपल्या पैशाचा विनियोग न करता, तर त्याजपाशीं याहूनहि पुष्कळच शिल्लक राहती. याहून शिल्लक अगदींच थोडी असती, तर लोककल्याणाच्या भरीं भरून त्यानें भारी उधळपट्टी केली असें म्हटल्यावांचून लोक राहतेना, आणि पुढें त्याचा कित्ता गिरविण्यास लोकांना इच्छाहि ना होती. कसेंहि वागा, जन नांव ठेविल्याशिवाय रहात नाहीं; म्हणून जन त्रिविध आहे, असें म्हटलें आहे.

लीक्लेअरच्या सुदैवानें त्याच्या हयातींतच लोकांना कांहीं वर्षांपासून पेन्शन् फंडांतून पेन्शन् मिळूं लागून ते आपले वृद्धापकालचे दिवस त्याचयाप्रमाणें एकाद्या खेड्यांत वास करून आनंदांत काढीत होते. त्यानें लाविलेल्या झाडाला त्याच्या देखत अशीं फळें आलेलीं पाहून त्याला किती आनंद वाटला असेल बरें ! !

त्यानें आपल्या उतार वयांत कारखान्याच्या मजबुतीसाठीं पक्का बंदोबस्त करून ठेविला होता, त्यामुळें त्याच्या मृत्यूनंतर त्याला बिलकुल धक्का पोहोंचला नाहीं; इतकेंच नव्हे, पण त्याची एकसारखी वृद्धिच होत चालली. इ. स. १८७७ सालीं ह्मणजे लीक्लेअरच्या मृत्यूनंतर पांच वर्षांनीं ९८४ मजुरांना नफ्याच्या रकमेंतून वांटा मिळूं लागला होता. त्याच सालीं सुमारें चार लाख रुपये पगाराबद्दल खर्च पडले.

इ. स. १८४२ सालापासूनचा हिशोब पहातां नफ्यांतून एकंदर ८ लाख रुपये खर्चीं पडले होते. सन १८७७ सालीं कारखान्याच्या भांड-

वळाची रक्कम चार लाखांवर झाली होती, आणि एकंदर देवघेव ८ लाख रुपयांची झाली होती. सन १८६८ सालीं (Mutual Aid Society) **अन्योन्यसाहाय्यकारिणी**चें भांडवल एक लाख तीस हजार होतें; पैकीं ८० हजार रुपये पेढीवर जमा केलेले होते. पुढें पेढीचें भांडवल बरेंच वाढून सन १८७७ सालीं २४ असामींना पेढींतून दरसाल रुपये ४०० व ११ विधवांना सालाचे २०० रुपये, ह्याप्रमाणें पेन्शन् मिळूं लागलें होतें.

**लीक्लेअर**च्या मागून तीन वर्षांनींच **डिफोरनो** मरण पावला. त्याच्या जाग्यावर सन १८७५ सालीं **मारकॉट** नांवाच्या गृहस्थाची नेमणूक झाली.

**लीक्लेअर** अगदीं मरावयास टेंकला, त्या वेळेस त्यानें कारखान्याच्या आपल्या लोकांस शेंवटचा निरोप पाठविला कीं, "तुह्मी कारखान्यांत मेहेनत घेऊन काम करीत आहां, यापासून तुमची स्वतःची स्थिति तर सुधरत चालली आहेच; शिवाय इतर लोकांपुढें तुह्मी आपला उत्तम नमुना ठेवीत आहां, तो पाहून आपलें काम याहून अधिक उमेदीनें करण्यास तो त्यांस उपयोगी पडेल. हा माझा अंतकालचा उपदेश सतत स्मरणांत ठेवा."

ज्यांना मोलमजुरीशिवाय पोट भरण्यास दुसरें साधन नव्हतें, त्यांना ह्या कारखान्यांतून मदत मिळूं लागली आहे. हेंच ह्या उद्योगवृक्षाचें सुफल होय. याहून आणखी दुसरें तें काय हवें आहे?

**फ्रान्स** देशांत समाजस्थिति बिघडून मोठी राज्यक्रांति झाल्या दिवसापासून जिकडे तिकडे निर्नायकी माजली होती. द्रव्यसंचय, देवधर्म लोकांना नकोसा झाला होता. बळी तो कान पिळी; कायदेबियदे घट

सारे गुंडाळून ठेवून लोक मनःपूत वागूं लागले होते. अनीतीचे मार्ग खुले झाले होते. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नव्हता. कोण कोणाची बायको व कोण कोणाचा नवरा. अशी सर्व देशभर स्वतंत्रता हातीं दिवटी घेऊन नाचूं लागली होती. मद्यपानाचा तर ताळच राहिला नव्हता. गृहस्थपणाची मर्यादा व रीत अगदीं सुटली होती. तरी पण लीक्लेअरच्या सतत परिश्रमानें, अचाट बुद्धीनें व कौशल्यानें मजूरवर्गाची स्थिति कांहींशी सुधारणेच्या मार्गाला लागली. मजूर लोक कायदेकानूंला मान देऊं लागले. ते पूर्वीची आपले पशुवृत्ति टाकून घरदार करून प्रपंच सुखाचा अनुभव घेऊं लागले. सारांश सुधारणेचा जसजसा प्रसार होत चालला, तसतसें समाजकल्याण होत चाललें. हा अमृतसिद्धियोग **फ्रान्स** देशाला लीक्लेअरच्या योगानें प्राप्त झाला.

पूर्वीं राजे व बादशहा होऊन गेले, त्यांनीं मोठमोठीं राज्यकारस्थानें केलीं, लाखों मनुष्यांचे बळी घेऊन रणांगणीं रक्ताच्या नद्या वाहावयास लाविल्या, व आपार संपत्ति भोगून अखेर काळाच्या जबड्यांत जाऊन पडले. त्यांचीं वर्णनें इतिहासांत वाचावीं, त्यापेक्षां अशा लोक कल्याणकारी पुरुषांचीं चरित्रें लिहिलीं, वाचलीं, व ध्यानांत ठेविलीं, तर लोकसमाजाचा किती बरें फायदा होईल ? ह्मणून हें **फ्रान्स** देशांतील एका **रोहीदास** चांभाराच्या सत्पुत्राचें अल्प चरित्र यथामति लिहून आपल्यापुढें सादर केलें आहे. यापासून आमच्या विपन्न देशांत समाजहिताचा अंकुर फुटून ईशकृपेनें थोडासा तरी फायदा होवो ह्मणजे झालें.

---

# राजा सर दिनकरराव.

## के. सी. एस. आय.

राजा सर दिनकरराव ह्यानीं हिंदुस्थानच्या राजकीय गोष्टींत लक्ष घालण्याचें अगदीं सोडून देऊन शांततासुखाचा उपभोग घेण्यास आज पुष्कळ वर्षांपासून सुरवात केली आहे. त्यांचीं महत् कृत्यें जणों मागच्या पिढी बरोबर गत झालीं आहेत कीं काय असें वाटण्याचा संभव आहे; परंतु तसा प्रकार मुळींच नाहीं. सन १८५७ च्या बंडापूर्वीं कांहीं वर्षें व तदनंतर या देशांतील राज्यकारभाराच्या संबंधांत त्यानीं चांगलें प्रमुख पद प्राप्त करून घेतलें आहे. एतद्देशीय व परदेशीय विद्वान लोकांपैकीं पुष्कळांना असा हा थोर महाराष्ट्र राज्यकार्य धुरंधर पुरुष अद्यापि इह लोकींच आहे, हें कदाचित् ठाऊक सुद्धां नसेल. सर दिनकरराव यानीं राजा व प्रजा यांचें कल्याण करून आपला कीर्तिचंद्र प्रकाशित करण्याकरितां एका प्रमुख मराठी संस्थानाचीं राज्यसूत्रें बरींच वर्षें हातीं धरलीं होतीं. त्यानीं जीं जीं कामें केलीं, त्यांत मराठे लोकांतील उत्तम उत्तम व्यक्तींच्या ठायीं दिसून येणारे व ज्यांच्यामुळें एका कालीं हिंदुस्थानच्या इतिहासांत मराठ्यांनीं मोठें नांव मिळविलें होतें असे, उत्तम बुद्धिचातुर्य, दृढनिश्चय आणि उदात्त स्वभाव वगैरे गुण त्यानीं स्पष्टपणें व्यक्त केले. पाश्चात्य पद्धतीनें सार्वजनिक काम करण्याचा त्यांना बिलकुल अनुभव किंवा शिक्षण नव्हतें, तरी त्यांची कुशाग्र बुद्धि त्याना प्रत्येक नाजुक व कठीण प्रसंगांत नेहमीं योग्य व उत्तम मार्ग दाखवीत असे. एतद्देशीय दरबारांतील बहुविध राजकारणांमुळें जेथें एकमेकांशीं मिळून नीटपणें काम क्वचितच चालतें, अशा स्थितींत व अशा दरबारांत, मानी राजाच्या हाताखालीं पुष्कळ वर्षेंपर्यंत वजनदारीनें राहण्यास दूरदृष्टि व पोक्त विचार, या गोष्टींची फारच आवश्यकता असते. ग्वाल्हेरीस दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या हल्लींच्या भरभराटीचा बराच अंश, तेथील खजिन्याची सुस्थिति व तेथील नव्या पद्धतीनें चालणारी राज्यव्यवस्था, हें सर्व सर दिनकररावांच्या त्या दर-

बाराशीं असलेल्या निकट संबंधाचेंच फल होय. त्यानीं बंडाच्या वेळीं केलेल्या उत्तम नौकरीमुळें त्यांच्याविषयीं व त्यांच्या यजमानाविषयीं सर्व इंग्रज लोकांच्या मनांत चांगला आदर उत्पन्न होऊन त्यांची नौकरी इतिहास प्रसिद्ध झाली आहे.

ग्वाल्हेर दरबारांत सर दिनकरराव हे प्रथम अगदीं हलक्याशा कारकुनीच्या कामावर नोकर होते. मुलकी कामाची पूर्ण माहिती व अश्रांत परिश्रम या योगानें त्यानीं लौकरच चांगला लौकिक संपादिला. त्यांच्या सुदैवानें महाराज जयाजीराव शिंदे यांच्या सारखा गुणग्राही व मनुष्याची पारख करणारा धनी मिळाला. सर दिनकरराव यानीं दुसऱ्या कांहीं कामावर असतांना राज्यकारभारसंबंधीं बराच अनुभव मिळविला होता, व त्यामुळें बंडाच्या सालापूर्वी कांहीं वर्षांपासून ग्वाल्हेरचे माजी महाराज कै० जयाजीराव यांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास बसला. बंड उपस्थित झाल्यावर निमच येथील बंडवाले ग्वाल्हेरीस आले. त्यांनीं महाराजांस कळविलें कीं, "आपली बहुतेक फौज आमच्या पक्षास अनुकूल आहे, तेव्हां आपण आपल्या फौजेनिशीं आह्मांस मिळून व सर्वांचें आधिपत्य स्वीकारून आग्र्यावर चाल करावी." हा सर्व प्रकार महाराजानीं आपले विश्वासू कारभारी दिनकरराव यांना कळवून पुढें काय करावें ह्मणून सल्ला विचारला. त्यावेळची स्थिति खरोखरच भयंकर होती. निमच येथील बंडवाल्यांची एक प्रचंड तुकडी त्यांच्या राजधानीच्या वेशीवर थडकली होती, व त्यांची स्वतःची फौज उघड उघड बिथरली होती. अशा वेळीं इंग्रज सरकाराशीं नेकीनें व इमानदारीनें वागण्याचा आपला निश्चय प्रगट केल्यास आपली फौज कुरकूर करील, व बंडवाले लोक एकदम हात घाईवर येतील, ही गोष्ट महाराजांच्या तेव्हांच लक्षांत आली. तरी ग्वाल्हेरच्या प्रचंड पहाडी किल्ल्याचा महाराजांना चांगला आश्रय असल्यामुळें त्यानीं एक क्षणभर मागें पुढें न पाहतां आपण इंग्रज सरकारच्या पक्षानें लढण्याचें ठरविलें; आणि इंग्रजसरकारावर आलेल्या या ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं त्यानीं आपली स्वामिभक्ति व इमानदारी उत्तम प्रकारें व्यक्त करून त्यांचाच पक्ष स्वीकारल्याचें एकदम जाहीर केलें.

हैद्राबाद येथील निजाम सरकारास ज्याप्रमाणें या प्रसंगीं पहिल्या सर सालरजंगांचा उपदेश कामीं आला, त्याचप्रमाणें या प्रसंगीं महाराजांना सर दिनकररावांचा उपदेश उपयोगीं पडला. कांहीं कारणामुळें इंग्रज सरकारच्या विरुद्ध होऊन स्वार्थ साधनाकरितां बंडवाल्यांस सामील झालेल्या पुढारी लोकांच्या हातून कांहीं कार्यभाग सिद्धीस जाणार नाहीं, व त्यांस लौकर अपयश येईल ही गोष्ट सर दिनकररावांच्या तेव्हांच लक्षांत येऊन चुकली होती; तथापि बंडवाल्यांच्या जमावामुळें ग्वाल्हेरच्या आसपासच्या प्रदेशांत या वेळीं इंग्रज सरकारच्या अमलाचा बहुतेक लोप झाला होता. ही वेळ इंग्रज सरकाराला खरोखर अतिशय संकटाची होती. अशा वेळीं आपण त्यांचाच पक्ष स्वीकारण्यांत खरें शहाणपण, चिरकालिक हित, व खरा देशाभिमान आहे, असें दिनकररावांस वाटत होतें. या वेळीं महाराज शिंदे उलट पक्षास मिळते तर मोठाच घोंटाळा होता. ह्यावेळीं महाराजांना आपल्या बचावाकरितां पळून जावें लागलें! परंतु दिवाणाच्या सल्ल्याप्रमाणें त्यानीं इंग्रज सरकाराशीं इमानदारी व सख्य कायम ठेविलें. या आणीबाणीच्या प्रसंगीं सर दिनकररावानीं केलेल्या नोकरीचें लार्ड क्यानिंग यानीं उत्तम तऱ्हेनें अभिनंदन केलें. तेव्हांपासून इंग्रज सरकार त्यांना होईल तेथवर सर्व तऱ्हेनें मदत करीत आहेत, व त्यानीं केलेल्या उपकार रूप ऋणाचा भार ते कधींही विसरणार नाहींत.

सन १८५९ सालीं आग्रा येथें दरबार झाला, त्यांत सर दिनकरराव यांना महाराणीसरकारच्या कृपेचीं द्योतक चिन्हें प्राप्त झालीं, व लार्ड क्यानिंग यानीं त्यांच्याविषयीं मोठें प्रेमळ व अगत्याचें भाषण केलें. ग्वाल्हेर संस्थानच्या राज्यकारभारामध्येंही त्यानीं चांगलें यश संपादिलें. यामुळें राज्यकार्यधुरंधर हें नांव त्यांना यथार्थ शोभतें. हिंदुस्थानी राजदरबारांतील घोंटाळे व कारस्थानें यांची ज्यांना चांगली माहिती असेल, त्यांनाच सर दिनकरराव यांच्या ग्वाहेरच्या कारभाराची खरी योग्यता कळणार आहे. त्यानीं तेथील मंत्री मंडळाची व दरबारची व्यवस्था सुरेख केली, व प्रत्येक खात्यावर एक जिम्मेदार कामगार मुक्रर केला. तो सर्व तऱ्हेनें सर्व गोष्टींत खास दिनकररावच्या आज्ञेप्रमाणें चालत असे. न्याय

खात्यांत बाहेरच्या प्रांतांतून चांगले हुषार, अनुभविक व योग्य असे कायदेकानु समजणारे लोक आणून त्यांची योजना केली. सर्व सरकारी कामाकाजांत लांच रुषपत चालत असे तिचा समूळ उच्छेद करण्याचा त्यांनीं यत्न केला. जेव्हां जेव्हां अशीं प्रकर्णें उघडकीस आलीं, तेव्हां तेव्हां त्यांनीं सक्त सजा दिली. त्याचप्रमाणें काटकसरीकडेही त्यांची बारीक नजर असे. राज्याचा खर्च होईल तितका बेतावार कमी करण्याचाही यांनीं यत्न केला. यांनीं सर्व राज्याच्या जमाखर्चाचा एक बेहडा बांधला, व त्यांत पुष्कळ बचत ठेविली. त्या बेहड्याप्रमाणें त्यांनीं एकसारखी व्यवस्था चालविली. ग्वाल्हेर संस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांचे त्यांनीं अनेक जिल्हे केले, व प्रत्येकावर एक एक सुभा किंवा मुख्य कामगार नेमिला. त्या सुभ्याकडे दिवाणी फौजदारी व मुलकीचे सर्व अधिकार दिले. सुभ्यांचा पगार ६०० रुपये दरमहा असे. ते फार चौकशीनें व कसोशीनें कामाची तपासणी करीत. अगदीं कच्च्या गोष्टी देखील स्वतः पहात व वेळोवेळीं प्रत्येक खात्यावर अवचित जाऊन कडक तपासणी करीत. यामुळें कोणालाही अव्यवस्था करण्याला सवड सांपडत नसे. त्यांची काम करण्याची पद्धति उत्तम प्रतीची होती. राज्यकारभाराच्या अतिगहन व महत्वाच्या कामीं ते नेहमीं अश्रांत परिश्रम करीत. प्रथम प्रथम कांहीं वर्षें त्यांच्या यजमानाचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. परंतु महाराज जयाजीराव शिंद्यांसारख्या धीर व उदात्त स्वभावाच्या राजावर देखील मर्जीतले हलकट लोक व कामदार यांचा फार पगडा बसला. त्यामुळें त्यांनीं आपल्या या योग्य दिवाणाला कामावरून काढून टाकण्याचा विचार अनेक वेळां मनांत आणिला. परंतु ती गोष्ट पुष्कळ वेळां रेसिडेंट साहेबांच्या मध्यस्तीनें टळली. दिनकरराव हे इंग्रज सरकारचे दोस्त व उत्तम राज्यकार्यधुरंधर असल्यामुळें त्यांच्या वतीनें रेसिडेंट साहेब वारंवार मध्यस्ती करीत असत. त्यांच्या प्रामाणिकपणाविषयीं कधींच कोणाला शंका आली नाहीं. तथापि महाराजांजवळच्या लुच्च्या लोकांनीं त्यांच्यावर असत्य आरोप आणिले. त्या आरोपांच्या निरसनार्थ यांना पुष्कळवेळां लांबलचक व निरर्थक जबाबही देणें भाग पडलें!

पण अखेर ग्वाल्हेर संस्थानाला राजा सर दिनकरराव यांच्या अत्युत्तम सेवाचाकरीचा एकसारखा फायदा मिळण्याच्या कामीं इंग्रज सरकारचें वजन देखील निरुपयोगी झालें. कारण महाराज जयाजीराव शिंदे यांनीं आपल्या एका सेवकास कारभाऱ्याची जागा देण्याचा निश्चय केला. त्यानीं ज्या दैवशाली पुरुषास या कामाकरितां पसंत केलें, तेच पुढें सर गणपतराव खडके या नांवानें प्रसिद्धीस आले. सर दिनकरराव व महाराज साहेब यांच्यांतील बेबनाव अगदीं निकरास गेल्याचें पाहून, त्यांची फुटाफूट करणें अगदीं अवश्य आहे असें रेसिडेंटास दिसून आलें. सर दिनकराव फार मग्रूर आहेत असें महाराजांस वाटलें! ते महाराजांना केवळ त्यांच्या मनाजोगें वागूं देईनात हेंच कायतें बेबनावाचें मूळ होतें. परंतु महाराजानीं सर दिनकररावांची सर्व राज्यव्यवस्था अगदीं पसंत केली, व राज्यकारभाराची सर्व जोखीम आपल्या शिरावर घेतली. प्रत्यहीं सकाळीं ते फार वेळ कचेरींत बसत. तेथें सर्वांना जाण्याची मोकळीक असे. सर्व कच्चें काम ते स्वतः पहात. सर दिनकरराव यांना दक्षिणी ब्राह्मण फार आवडत असत. त्यानीं पुष्कळांना आपल्या नजरेखालीं उत्तम तयार केलें होतें. ग्वाल्हेर संस्थानांतील जहागीरदार व जमीदार यांच्याशीं त्यांचें चांगलें सख्य असे. चतुर व शूर सरदार त्यांच्या विशिष्ट योग्यतेला व त्यांच्या निःसीम प्रामाणिकपणाला आनंदानें मान देत. राज्यांतील उत्पन्नाच्या बाबींची सुधारणा करण्याविषयीं सर दिनकररावांच्या मनांत अगदीं आधुनिक व सुधारलेले असे विचार होते, यामुळें त्यांनीं रस्ते, आगगाड्या, तलाव वगैरे कामांत चांगलें सहाय्य केलें. त्यांची योग्यता ध्यानांत घेऊन लार्ड क्यानिंग ह्यानीं त्यांस व्हाइसरीगल कौन्सिलचे सभासद नेमिलें होतें. परंतु तेथें सर्व वादविवाद इंग्रजींत चालत असल्यामुळें त्यांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं.

एका मुख्य व समृद्ध अशा संस्थानची बहुतेक कुलमुखत्यारी त्यांच्याकडे आली होती, व प्रत्येक गव्हरनर जनरलनें त्यांच्यावर चांगला विश्वास ठेविला होता, तरी त्यांनीं पूर्व स्थितींतील साधें व सरळ वर्तन सोडिलें नाहीं. उन्हाळ्यांत साध्या नैनक्काथचा

आंगरखा व हिंवाळ्यांत आंबव्याचा रुईदार आंगरखा हेच त्यांचे नेहमींचे पोषाख अद्यापि कायम आहेत. हल्लींपेक्षां कांहींशा अधिक साध्या व दंग्या धोप्याच्या काळांत, पेशव्यांना ज्या गुणामुळें राजकार्यधुरीणत्व प्राप्त झालें, ते सर्व गुण त्यानीं लहानशा राज्यांत प्रगट केले. हल्लींच्या काळांत देखील त्यांच्या प्रमाणें आपलें कर्तृत्व दाखविण्याची संधि पुष्कळांना येत असेल, परंतु तिचा फायदा त्यांच्याप्रमाणें थोड्यांसच करितां येईल! त्यानीं, जो जो प्रसंग आला, त्यमध्यें आपला फायदाच करून घेतला. बेतबात, सारासारविचार, व तात्विकपणा आणि धैर्य, हे त्यांच्या अंगीं मुख्य सद्गुण आहेत इंग्लंदांतील सर्व लोकांना त्यांचें नांव चांगलें महशूर झालें आहे. ते तेथें गेले असते तर तेथें त्यांचा माजी सर सालरजंग किंवा जंग बहादूर यांच्याप्रमाणेंच गौरव व बहुमान झाला असता ह्यांत कांहीं शंका नाहीं.

हल्लीं सर दिनकरराव हे आग्रा व अलाहाबाद येथें स्वस्थपणें आनंदांत काळ घालवीत असतात. ते बहुधा सध्यांच्या सार्वजनिक कामकाजांत फारसे दिसत नाहींत. त्यांची ती भव्य मुनीप्रमाणें दिसणारी मूर्ति त्यांच्या अलीकडच्या पिढीच्या देशबांधवांना लेफ्टनेंट गव्हरनर किंवा व्हाईसराय यांच्या दरबारांत मात्र आतां दृष्टीस पडते. हल्लीं ते फार वृद्ध दिसतात. त्यांच्या तोंडावर व कपाळावर वार्धक्यानें सुरकुत्या पडल्या आहेत, व त्यांच्यांत आतां ती पूर्वींची धमक व तरतरी राहिली नाहीं. आग्रा व अलाहाबाद जिल्ह्यांतील आपल्या जमीदारीच्या व ग्वाल्हेर दरबारांतून मिळालेल्या जहागिरीच्या उत्पनावर त्यांचा निर्वाह उत्तम रीतीनें चालत असतो. त्यांचे आश्रित पुष्कळ असून त्यांच्यावर त्यांची सदैव पूर्ण कृपा असते. त्यांच्या अलीकडच्या वर्तनांत फारच फेरफार झाला आहे. अलीकडे सूर पाहण्याचा त्यांना फार नाद लागला आहे. ते कोणतेही काम सूर पाहिल्यावांचून करीत नाहींत. मोठ्या मेहनतीनें व खर्चानें एखादें काम करण्याची त्यानीं तयारी केली असली तरी चांगला सूर लागला नाहीं तर तें सर्व काम रद्द होतें! कोणत्याही मोठ्या मनुष्याची गांठ घ्यावयाची असली तरी ते चांगला सूर आल्यावांचून

त्याची गांठ बहुतकरून घेत नाहींत. हल्लीं ते संभाषण करण्यांत व पुस्तकें वाचण्यांत आपला वेळ घालवितात. त्यांना पाश्चात्य विचारांचें मुळींच वळण लागलेलें नाहीं. ते व त्यांच्या कुटुंबांतील सर्व माणसें निवळ जुन्या तऱ्हेनें वागतात. ते केव्हां केव्हां दरबारच्या मोठमोठ्या लोकांना भेटावयास जातात. त्यांच्या अनुभविक, पोक्त व शहाणपणाच्या सल्लामसलतीचा सरकाराला व प्रजेला चांगला उपयोग होत असल्या-मुळें त्यांची फार चहा होते. अलीकडे ते ग्वाल्हेरीस क्वचितच जातात. त्यांची मित्र मंडळी त्यांच्याच बरोबरीची व कांहींशी त्यांची आश्रित अशां पैकीं आहेत. ती सकाळ संध्याकाळ त्याच्या जवळ येऊन बोलत बसलेली दृष्टीस पडते. हल्लींच्या काळच्या वादविषयक गोष्टी त्यांना आवडत नाहींत. ते आपल्या पूर्वीच्या कृत्यांच्या वैभवाचें चिंतन करीत आनंदांत राहतात. या पूर्व पिढीच्या राज्यकार्यधुरंधर गृहस्थाविषयीं हिंदुस्थानांतील प्रत्येक विद्वान मनुष्याच्या मनांत पूज्य व आदर बुद्धि वाटल्यावांचून राहत नाहीं!

सर दिनकरराव यांच्या संबंधानें मोठमोठ्या युरोपियन लोकांनीं फारच स्तुतिपर उद्गार काढिले आहेत. सुप्रसिद्ध सर रिचर्ड टेंपल मुंबईचे माजी गव्हरनर ह्यांनीं आपल्या कारकीर्दीतील 'थोर पुरुष व राजकीय गोष्टी' ह्मणून एक पुस्तक लिहिलें आहे, त्यांत त्यांनीं राजा सर दिनकर-राव ह्यांच्या संबंधानें फार चांगला लेख लिहिला आहे. त्याचा सारांश येणेप्रमाणें:—

"दिनकरराव हे महाराष्ट्र ब्राह्मण असून त्या जातीच्या अत्युत्तम-पणाचा मासला आहेत. ते शरीरानें किडकिडीत असून त्यांचा चेहरा नाजूक आहे. त्यांचें कपाळ विशाल आहे. त्यांची वर्तन पद्धति शिष्टाचार-संपन्न असून त्यांचें भाषण मृदु, सौम्य व चित्ताकर्षक आहे. त्यांच्या मुद्रेवर ब्राह्मणामध्यें वंशपरंपरा चालत आलेला, व त्यांचा केवळ स्वभाव-गुणच झालेला स्वाभिमान पूर्णपणें दृष्टीस पडतो, व त्यांत अधिकारप्रिय स्वभाव आणि निश्चल मनोगति व्यक्त होते. ते आंग्लभाषानभिज्ञ आहेत, व त्यांना सुधारलेल्या पाश्चिमात्य कल्पनांचा गंधही नाहीं. कित्येक सामा-

जिक सुधारणेच्या गोष्टींसंबंधानें – उदाहरणार्थ स्त्रीशिक्षण वगैरे संबंधानें – ते जुन्या मताचे अनुवादी आहेत, तरी राज्यकारभाराच्या सर्व गोष्टींमध्यें त्यांचे सर्व विचार अगदीं नवीन असून ते स्वतःची हुकमत चालविण्यास पूर्ण समर्थ असे आहेत. त्यांनीं थोडे दिवसपर्यंत राज्यकारभार चालविला, तरी तितक्या मुदतींमध्यें ह्या पिढींतील दुसऱ्या कोणत्याही गृहस्थास जी सत्कीर्ति मिळाली असती, तितकी त्यांनीं मिळविली आहे. त्यांचा प्रामाणिकपणा हा गुण सर्व प्रसिद्धच आहे. त्यांनीं आतां राज्यकारभारास रजा देऊन मोठ्या योग्यतेनें आपला कालक्रम चालविला आहे. ”

असो, राजा सर दिनकररावासारखे थोर पुरुष हिंदुस्थानास भूषणप्रद होत असें कोण ह्मणणार नाहीं? राजा सर दिनकररावानीं आपल्या आंगच्या अलौकिक गुणांनीं सर्वांकडून प्रियता संपादन केली आहे, व भर्तृहरीनें ह्मटल्याप्रमाणें:—

### श्लोक.

नरपति हितकर्ता द्वेषतांयाति लोके ।
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥
इति महति विरोधे विद्यमाने समाने ।
नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥१॥

राजा व प्रजा ह्यांचें एक समयावच्छेदें करून हित करण्याचें दुर्घट काम त्यांनीं चांगल्या प्रकारें केलें आहे, ह्यांत कांहीं शंका नाहीं! तेव्हां अशा चतुर व नृपतिजनपद हितकर्त्या पुरुषास परमेश्वर पुष्कळ कालपर्यंत सौख्यानंदामध्यें ठेवो असें ह्मणून, हा संक्षिप्त लेख आह्मी येथें समाप्त करितों.

# बौद्ध धर्माचा संस्थापक,

# साक्यमुनि, गौतम, ह्याचें चरित्र,

वासुदेव लक्ष्मण आठवले

ह्यांनीं तयार केलें.

तें.

पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत छापिलें.

सन १८८३.

किंमत साहा आणे.

ग्रंथाची सर्व प्रकारची मालकी ग्रंथकारानें आपणाकडे

ठेविली आहे.

# प्रस्तावना.

या हिंदुस्थान देशांत फार प्राचीन काळापासून आजपावेतों पुष्कळच धर्म प्रवर्तक पुरुष होऊन गेले. त्यांचे निरनिराळे पंथ आजच्या दिवसाला थोड्या बहुत तरी प्रमाणानें चालत आहेत. त्या पुरुषांमध्येंच गौतम बुद्धाची गणना आहे. या अचिंत्य पुरुषाचें मनोहारक चरित्र पाली, संस्कृत आणि हिंदुस्थान देशांतील मूळच्या भाषांत ओत प्रोत पाहिजे तितकें आहे. आणि यावरूनच इंग्रजींत त्या चरित्राचे तर्जुमे होऊन मोठें ग्रंथ भारूड झालेलें आहे. परंतु केवळ महाराष्ट्र भाषा वाचकांस याचा कांहीं उपयोग होत नाहीं हें मनांत आणून मी हें लहानसें पुस्तक रचलें आहे. यांत अमुक एका ग्रंथावरून माहिती मिळविली आहे असें अगदीं नाहीं. पुष्कळ ग्रंथांत कथानकाच्या संबंधानें अनेक प्रकारचीं वैपरित्यें आढळण्यांत आलीं, आणि त्यानेंच मेळ घालण्यांत फार अडचणी उद्भवल्या; तथापि अडीच हजार वर्षांपूर्वीं घडलेल्या गोष्टी कितपत तार्तम्यानें मानावयाच्या याचा सारासार विचार करून तें कथानक बसविलें आहे. या चरित्रांत आलेली माहिती निरनिराळ्या ग्रंथांच्या अधारावरून घेतलेली आहे.

हें **गौतम बुद्धाचें** चरित्र पुस्तक रचण्याचें माझ्या मनांत आलें, यास कारण असें झालें कीं, फार अलीकडील **तुकाराम रामदास ज्ञानोबा** इत्यादि साधु प्रभृति मंडळींचीं चरित्रें उपलब्ध असून त्यांनीं स्थापन केलेल्या भक्तिपंथाचे अंकूर अद्यापि जाज्वल्य रीतीनें प्रचारांत चालू आहेत ; परंतु प्राचीनकाळीं **मागध देशांत** फार प्रख्यातीस आलेला **गौतम बुद्ध**, वर सांगितलेल्या साधूंपेक्षां किंबहुना जास्ती योग्यतेचा पुरुष असतांही तो केवळ नास्तिक मताचा होता, या समजुतीवर त्याच्या उपदेशाकडे किंवा चरित्राकडे कोणी लक्ष देत नाहीं आणि हिकडच्या प्रांतीं त्यांचा विशेष ह्मणण्यासारखा प्रचारही नाहीं; ह्मणून लोकांची ती समजूत घालविण्यासाठीं मुद्दाम हा अल्पसा प्रयत्न केलेला आहे. **गौतम बुद्धाच्या** धर्माचा मी प्रसारेच्छु आहें ह्मणून ही खटपट केली आहे असें नाहीं; परंतु इतर साधुचरित्रें जशीं मनोवेधक आहेत

तसेंच हें मनोवेधक व उपदेश घेण्यायोग्य आहे असें वाटल्यावरून, त्याचा महाराष्ट्र भाषेंत संग्रह झाल्यास करून पाहवा या उद्देशानें हें पुस्तक रचलें आहे. हें पुस्तक कितपत साधलें आहे किंवा समाजास यापासून काय उपयोग होईल हें स्वतानें सांगतां येणार नाहीं; तथापि इतकें खास आहे कीं, **तुकाराम** किंवा **रामदास** यांच्या चरितास जो मान लोक देतात, त्यांपेक्षां या चरित्रास ते कमी मान देणार नाहींत. कारण जगावर उपकार करण्यासाठीं ज्या पुरुषानें आपल्या राज्य वैभवाचा त्याग केला आणि भिक्षान्नावर निर्वाह करून उपदेश केला तो पुरुष कमी योग्यतेचा होता असें कोणीहि मानणार नाहीं. **गौतम बुद्धाच्या** चरित्रांत इतर साधु चरित्रांपेक्षां विशेष आश्चर्य व आनंद मानण्यासारखें हें आहे कीं, जे जे साधु ह्मणून उत्पन्न होतात त्यांच्या वंश मालिकेंत बहुतेक साधूंचीच निष्पत्ति असते आणि त्यांस ऐह लोक सुख संबंधी सामग्रीची अनुकूलता ह्मणण्यासारखी नसते, अशा स्थितींत आशा व तृष्णा दमन करण्याचें त्यांना विशेष जड जात नाहीं; पण **गौतम बुद्ध** राजकुळांतला असून त्याच्या पाठीमागें परिवार मोठा होता आणि राज्यक्रांतीचा विषय त्यानें हातांत घेतला असता तर चक्रवर्ती राजा होण्याचीं साधनें त्याला होतीं, असें असून त्यानें वैराग्य धारण केलें हेंच नवल ह्मणावयाचें. राजकुळांतले पुरुष साधु झाले आणि त्यांनीं धर्म क्रांति केली अशीं उदाहरणें विरळ आढळतील. हें महत्व मनांत आणून मीं ही थोडीशी लोक सेवा केली आहे. ही मान्य अगर अमान्य करणें विद्वज्जनांचें काम आहे.

गेल्या पंचवीस वर्षांपासून हिंदुस्थान देशांत अशी ओरड ऐकूं येऊं लागली आहे कीं, आलीकडे धर्माची ग्लानि होत चालली आहे हें सुचिन्ह नव्हे. ही धर्म ग्लानि नाहींशी करण्याकरतां ठिकठिकाणीं लोक यथा शक्ति प्रयत्न करीत आहेत. कोठें ब्रह्मसमाज, कोठें प्रार्थनासमाज कोठें एकेश्वरी सभा आणि कोठें सामाजिक भजन मंडळ्या इत्यादि स्थापन होऊन त्यांचा क्रम यथास्थित चालू आहे. अशा वेळीं असलीं पुस्तकें बाहेर पडल्यास त्यांपासून लोकांचें हित बरेंच होईल असें मला पुष्कळ दिवस वाटत होतें परंतु लोक स्थिति मनांत येऊन पुस्तक प्रसिद्ध करण्यास माझा हिय्या होईना. अखेरीस कोणी कांहीं हीं सर्वी

करोत अपण आपलें कर्तव्य बनावून सत्कृत्य लोकांपुढें ठेवावें असा मनाचा धडा करून मीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकावर टीकाच करावयाची असें बंधुजनांनीं मनावर घेतलें तर यांत असें एकही स्थळ नाहीं कीं, ज्यावर टीका करणें अयोग्य होईल. तथापि या पुस्तकापासून कांहीं उपयोग करून घ्यावयाचा, असें ज्या आस्तिक लोकांस अंतःकरणपूर्वक वाटत असेल, त्यांना आत्मिक विचार करण्यांत गौतम बुद्धाचा उपदेश नामी साह्य करील असें मला वाटतें. कोणी जिज्ञासु असें ह्मणतील कीं, धर्माचें राज्य आजपर्यंत ज्या सुकाणूवर चाललें आहे त्याच धोरणानें तें सतत चालवणें इष्ट व हितावह आहे; तर याविषयीं माझा कांहीं आग्रह नाहीं. प्रत्येक व्यक्तीस स्वातंत्र्य व ज्ञान आहे त्याप्रमाणें तो धर्माचरण करील; पण गौतम बुद्धाच्या चरित्राचें वाचन करून जर त्याचा बुद्धिभ्रम नाहींसा झाला नाहीं तर त्याच्या उपदेशांत कांहीं रहस्य नाहीं असें मी ह्मणेन. अस्तु, ज्या विद्वज्जनांस आपल्या हिंदुस्थान देशांत धर्मग्लानि झाली आहे असें खरोखर वाटत असेल त्यांनीं व दोषदृष्टीनें इतर बंधुवर्गांनीं, एकवार हें पुस्तक वाचून पाहिलें तर माझ्या श्रमाचा योग्य मोबदला मला मिळाला असें मानणाऱ्यांमधील मी आहें. यापरती या पुस्तकापासून मला प्राप्तीची इच्छा नाहीं.

पुणें ता० १९ माहे सप्तेंबर सन १८९३ इ.

ग्रंथकर्ता.

# गौतम बुद्धाचें चरित्र.

## पूर्व इतिहास.

ख्रिस्ती शकास आरंभ होण्यापूर्वी सुमारें सहावे शतकाच्या अखेरीस आर्य नांवाच्या लोकांनीं पंजाबांतील पांच नद्यांच्या खालीं उतरून गंगेच्या कांठच्या सर्व सपाट मैदानभर वस्ती केली. प्रस्तुत काळीं युरोप खंडांत जीं सुधारलेलीं राष्ट्रें आहेत त्यांतील माणसें देखील या आर्य नांवाच्या लोकांचींच वंशज आहेत असें ह्मणतात. आर्य लोकांच्या वेळीं निर्माण झालेल्या वेदांवरून प्राचीन काळच्या रीतीभाती व विचार यांविषयीं साधारण प्रतीची कल्पना करतां येण्यासारखी आहे. पुढें दिवसानुदिवस या आर्य लोकांचा फैलाव त्या प्रांतीं फार वाढत गेला. यामुळें पूर्वीं तेथें द्रविड लोकांची जी मूळची मोठी वसाहत होती ती अगदीं समूळ नाहींशी झाली आणि दुसऱ्या कित्येक जातीचे लोक आर्यांमध्यें इतके मिसळून गेले कीं, त्यांचें पूर्वस्वरूप फार बदललें. मिसळून गेलेल्या दुसऱ्या जातीच्या लोकांस आर्य गुलामांप्रमाणें वागवीत. आर्य लोक शहरें व गांवें बांधून त्यांत वस्ती करावयास लागले. त्यांची मुख्य संपत्ति म्हटली ह्मणजे जमीन जुमला, धान्याचीं कोठारें आणि गुरेंढोरें हीच कायती असे. कांहीं दिवसांनीं या लोकांमध्यें निरनिराळे तट झाले. त्यांची परस्परें भांडणें असत, या कारणानें त्या लोकांत पूर्वींच्या रीतीभाती जाऊन नव्या नव्या उत्पन्न झाल्या. त्या इतक्या सक्तीच्या असत कीं, प्रत्येक व्यक्तीस दुःख व पराधीनता झाल्यावांचून राहिलींच नाहींत. आर्य लोकांस स्वभावतां जात्याभिमान आल्यानें त्या प्रांतांतील मूळच्या लोकांत व त्यांत उत्तरोत्तर वैर वाढत चाललें. इतकेंच होऊन राहिलें नाहीं; तर आर्यांतील राजे रजवाडे, सरदार व आर्य लोकांचा इतर समुदाय यांतही दुही माजली. धर्माधिकाऱ्यांचें वजन वाढून त्यांचा जुलूम सुरू झाला. शिवाय व्यवहार व धंदे यांतील

भेदानें मनुष्यांतील परस्पर एकत्वपणाची वहिवाट नाहींशी होऊन सगळ्या आर्य राष्ट्रांत जातीच जाती झाल्या. वेदविद्येचें महत्व कमी होऊन मूर्ति पूजेची सुरवात झाली. त्या प्रांताचे विभाग होऊन त्यांवर निरनिराळ्या राजांनीं लहान लहान राज्यें स्थापिली. आर्य लोकांच्या देवतांवरील इतरांचा विश्वास उडाल्यानें त्या प्रांतीं एकच घोटाळा होऊन युद्ध संग्राम वारंवार होऊं लागले. सूर्याचा उदय व अस्त, समुद्रांवरील वादळें, धर्म संबंधीं कर्ममार्ग, ग्रह, स्वप्नें, शकून आणि प्रारब्ध यांवर लोकांचा पराकाष्टेचा विश्वास वसत चालला. पुनर्जन्म आहे यावर भरंवसा उत्पन्न झाला, एका जन्मांतील दुःखें पूर्व जन्मींच्या दुष्कृत्यांचीं फलें होत अशी समजूत सर्वत्र पसरली- दान केल्यानें दुःखांचें परिमार्जन होतें असें लोकांस वाटूं लागलें. ब्राह्मण लोकांचे राजांवर देखील अधिपत्य बसलें. त्यांशिवाय इतरांस यज्ञ करण्याचा अधिकार नव्हता. योगी पुरुष शरिरास कष्ट देऊन योगसाधन करीत, क्षत्रिय व वैश्य यांनीं युद्ध व व्यापार या साधनांनीं ब्राम्हणांचें पालन करावें हाच कायतो त्यांचा धर्म असें लोक मानीत. ब्राह्मणांचा आश्रय धरून इतर वर्णांनीं कर्म करून मुक्ति संपादन करावी हेंच कायतें त्यांचें ज्ञान असा समज झालेला होता. ज्या प्रांतांत आर्य लोकांनीं आपलीं निरनिराळीं राज्यें स्थापिलीं, त्या प्रांतांत त्या काळीं एका मागून एक अजरामर कीर्तीचे कवी होऊन गेले. तेथें सर्व प्रकारची सुबत्ता असे, दरिद्र स्वप्नांत देखील आलें नाहीं. खेडेगांवांतील जमिनी राष्ट्रांतील लोकांच्या उपयोगाकरितां राजांनीं मुद्दाम कराशिवाय ठेवलेल्या असत. शेतकरी लोकांची स्थिति फार सुखी असे, आणि राजांचा प्रसंग विशेषीं त्यांवर जुलूम होई, पण त्याचें त्यांना कांहीं वाटलें नाहीं.

अशा वेळीं आर्यांतील **साख्य** नांवाचे लोक रोहिणी नदीच्या कांठीं **कपिलवस्तु** ह्मणून एक शहर होतें तेथें येऊन राहिले. **कपिलवस्तु** काशीच्या ईशान्य दिशेस सुमारें पन्नास साठ कोसांवर आहे त्यास आतां कोहाना असें ह्मणतात. रोहिणी नदीचा उगम हिमालय पर्वतांत आहे, ती पुष्कळ दऱ्या खोऱ्यांतून वाहत जाते. हे **साख्य** लोक फार धाडस असत. त्यांनीं शौर्यानें मागध देश जिंकून आपल्या हस्तगत करून घेतला आणि तेथें एक बलाढ्य राज्य स्थापिलें. मागध देशाच्या आ-

समंत **प्रदेशीं** **श्रवस्ती** या नांवाचा एक राजा होता त्यानें **साख्यांस** पुष्काळ दिवस त्रास दिला पण **साख्यांपुढें** त्याचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं त्याचेंही राज्य त्यांनीं पादाक्रांत केलें. **साख्य** लोकही आर्यांप्रमाणेंच शेतकीवर आपली उपजीविका करीत. रोहिणी नदीच्या दुसऱ्या तीरावर आर्य लोकांमधलेच **कौलिण्य** या नांवाचें राजे राहात असत. त्यांचें आणि **साख्यांचें** रोहिणी नदीच्या पाण्यावरून मोठें वैमनस्य पडलें होतें. परंतु **साख्य** लोकांचा **सुद्दोधन** म्हणून जो राजा होऊन गेला त्याला **कौलिण्य** लोकांच्या एका राजानें आपल्या दोन्ही मुली दिल्या यास्तव त्या उभयतांमध्यें मोठा समेट होऊन गेला.

## गौतमाच्या मातापितरांचा विवाह.

**कपिलवस्तु** येथें **साख्य** लोकांचा एक **सिंहानु** या नांवाचा महापराक्रमी राजा होऊन गेला. त्याला तीन पुत्र होते, पैकीं ज्येष्ट पुत्राचें नांव **सुद्दोधन** असें होतें. **सुद्दोधनाचें** सोळा वर्षांचें वय झाल्यावर **सिंहानु** राज्यास असें वाटलें कीं, आतां आपण वृद्ध झालों आहोंत, तेव्हां ज्येष्ट पुत्रास गुणलक्षण संपन्न अशी बायको करून देऊन सर्व राज्यकारभार त्याजकडे सोंपवून मग आपण सार्थका करितां तपश्चर्येसाठीं जावें. वधु शोधून आणण्याचें काम त्यानें वेदविद्या पारंगत अशा आठ ब्राह्मणांकडे दिलें. या ब्राह्मणांस सामुद्रिक लक्षण विद्या उत्तम प्रकारें समजत होती. त्यांस पाहिजे तितकें द्रव्य खर्च करण्याचा अधिकार मिळाला होता. या ब्राम्हणांनीं फार लांब पावेतों शोध केला, पण **सुद्दोधनास** शोभे अशी वधु त्यांच्या आढळांत आली नाहीं. शेवटीं अघटित योगानें **कौलिण्य** लोकांचा **देवदाहा** येथला राजा **पांथुमावद्दी** याची कन्या सद्गुण मंडित रूपवती **माया** ही आपल्या सख्यांसहवर्तमान बागेंत हिंडत असतां या ब्राम्हणांच्या दृष्टीस पडली. ब्राह्मणांस पाहतांच **मायेनें** त्यांचें आतिथ्य करून कुशल प्रश्न केले. त्यावरून ब्राह्मणांनीं आपला उद्देश **मायेस** कळविला. **माया** मंदहास्य करून, **सुद्दोधन** प्राप्तीविषयीं उत्सुक असतांही लज्जेनें असें ह्मणाली कीं, माझ्या पित्याकडे आपण जावें ह्मणजे तो आपणांस कायतें सांगेल.

**पांथुमावदी** राजाकडे ब्राम्हण गेले. तेथें ही त्यांचें आतिथ्य झालें. ब्राम्हणांनीं आपला आगमनाचा वृत्तांत सांगितल्यावर राजानें **सुदोधना**विषयीं पुष्कळ प्रश्न केले. त्या सर्वांचीं समर्पक उत्तरें मिळून राजा मनांत संतोष पावला. नंतर मंत्र्यांचा सल्ला घेऊन, **मायेस सुदोधन** राजपुत्रास देतों असें अभिवचन देऊन **पांथुमावदी** राजानें ब्राम्हणांचा योग्य सत्कार केला. ब्राम्हण मार्गस्थ झाल्यावर इकडे **सिंहानु** राजास एके रात्रीं असें स्वप्न पडलें कीं, भूगर्भांतून एक रत्नजडित सिंहासन उत्पन्न झालें व त्याच्या आष्टही बाजू सर्व आकाश व पृथ्वी यांजवर पसरल्या. त्यावर कोणी एक अत्यंत शक्तिमंत व सद्गुणी पुरुष बसलेला असून त्याच्या चरणाशीं विश्वांतले लोक लोळत आहेत व आम्हांस भवसागर तरणोपायाचा उपाय सांगा अशी त्याची विनवणी करीत आहेत. दुसरे दिवशीं **सिंहानूनें** हें स्वप्न सभेंत ब्राम्हणांस निवेदन केलें तेंव्हां त्यांनीं असें कळविलें कीं, **सुदोधन** राजपुत्रास योग्य वधु मिळाल्याचें हें सूचक स्वप्न आहे. इतकें होत आहे तोंच हे आठ ब्राह्मण आले आणि त्यांनीं सविस्तर हकीकत सांगितली. हें आनंददायक वर्तमान ऐकून **सिंहानु** राजानें आपल्या **सूतधिय** प्रधानाबरोबर **साख्य** लोकांतले आपले तीन राजे देऊन **पांथुमावदी** राजाकडे **देवदाहा** येथें **माया** आपल्या पुत्रास मागण्याकरितां पाठविलें. **पांथुमावदीनें** त्यांचा सत्कार करून **सिंहानु** राजाचें मागणें कबूल केलें. **माया** व **सुदोधन** यांच्या विवाह संबंधीं राजे लोकांस योग्य अशी सर्व प्रकारची तयारी उभयतांनींही केली. या प्रसंगाकरितां **पांथुमावदीनें** तीन टोलेजंग राजवाडे व एक देवालय हीं करविलीं. देवालयांत एक रत्नजडीत सिंहासन तयार केलें. विवाह मुहूर्त संधी जवळ जवळ आल्यावर **सिंहानु** राजा आपल्या पुत्रासहवर्तमान, बरोबर मोठा परिवार घेऊन **देवदाहाकडे** गेला. तेथें **पांथुमावदीनें** त्याचा चांगला बंदोबस्त ठेवून त्यास एक राजवाडा जानोशाकरितां दिला. विवाह समारंभाच्या दिवशीं **मायेस** करवल्यांनीं सुवासिक तेलांनीं अभ्यंग घालून सालंकार व सुशोभित केलें. रथांत घालून मोठ्या थाटमाटानें तिला देवालयांत नेली. इकडे **सुदोधनही** त्याचप्रमाणें देवालयांत आला. हा विवाह चमत्कार पाहण्याकरितां स्वर्गलोकचे इंद्रादि देव गंधर्वही आले

होते. मुहूर्त संधी आल्याबरोबर **सदोधन** राजपुत्रास ब्राम्हणांनीं सिंहासनावर बसविलें. **मायेसही** त्याच सिंहासनावर बसविलें. हें जोडपें सुरेख व सारखें दिसत आहेसें पाहून देवांस व मानवांस संतोष वाटला. ब्राम्हणांनीं मंत्रोच्चार करून विवाह लाविला. वधुवरांनीं एकमेकांस आलिंगन दिलें त्याक्षणीं पृथ्वी थरथरली, समुद्रास लाटा आल्या व देव गंधर्व मानव यांनीं त्या जोडप्यावर पुष्पवृष्टि करून स्तुतिपर स्तोत्रें उंच स्वरानें म्हटलीं. कांहीं दिवस विवाहाचा सोहळा चालला होता, तो संपल्यावर **पांथुमावद्दीच्या** आग्रहास्तव **सिंहानूनें** तेथेंच मुक्काम केला. त्या अवधींत **कपिलवस्तु** शहरांत त्यानें एक सात मजली चंदनाच्या लांकडाचा दुसरा नऊ मजली नकशीचा व तिसरा सुवर्ण व रत्नाचा असे तीन राजवाडे तयार करविले. नेमलेल्या दिवशीं तो तेथून निघून आपल्या राजधानीस आला. तेच दिवशीं **सुदोधनास** राज्याभिषेक करून त्यानें सर्व संग परित्याग केला. तेव्हांपासून **कपिलवस्तूचा सुदोधन** राजा झाला. याप्रमाणें **सुदोधन** व **माया** यांच्या विवाहासंबंधी बौद्ध धर्माच्या ग्रंथांत वर्णन सांपडतें.

## गौतमाचा जन्म.

**सुदोधन** राजानें **मायेखेरीज** **पांथुमावद्दी** राजाची दुसरी कन्या आपल्यास बायको केली ; कारण कीं, **मायेचें** आणि त्याचें वय मोठें झालें, तथापि त्यांस पुत्र होईना. दुसरी बायको केल्यावर देखील त्याजला पुत्र झाला नाहीं. यामुळें **सुदोधनाची** वृत्ति अगदीं उदासीन होऊन गेली. त्यावेळीं अशी समजूत होती कीं, मनुष्याची मृत्यूनंतरची स्थिति पुत्रानें करावयाच्या उत्तर कार्यावर अवलंबून आहे. अद्यापि देखील हीच समजूत या देशांत प्रघातामध्यें आहे. तेव्हां आपल्यास पुत्र नाहीं हें **सुदोधन** राजास अति दुःसह झालें, यांत कांहीं नवल नाहीं.

स्वर्गलोकीं असा चमत्कार घडून आला कीं, ब्रह्मादिक देवांस मृत्युलोकचीं दुःखें व संकटें पाहून फार कळकळ वाटली. धर्माची ग्लानि होऊन मनुष्य प्राणी आपणांस कधीं मृत्यु येईल याचा विचार देखील

करीत नाहींत. सर्वकाळ संसार सागरांत गटंगळ्या खात आहेत. जगामध्यें जेवढें दिसत आहे तेवढेंच कायतें शाश्वत आहे असें मानून त्यांतच त्यांची वृत्ति वाहत चालली आहे. सन्मार्ग आचरण केल्यानें परिणामीं चिरकाल सुखाची प्राप्ति होणार आहे हें कोणाच्या लक्षांत सुद्धां येत नाही. अशी स्थिति जगांत होणें चांगलें नाहीं; याकरितां त्यांच्या अंतःकरणास पीळ पडला. ह्मणून ब्रह्मादिक देव यांनीं पूर्ण लोक नाथाची एकत्र जमून प्रार्थना केली ती येणेंप्रमाणें:—"हे जगदाधार प्रभु पृथ्वीवरील भवचक्रांत गुंतलेल्या मानवांस तूं सोडीव आणि निर्वाण स्थिती प्रत ने. त्यांस कोणीच त्राता नाहींसा झाला आहे. ते रात्रंदिवस दुःख व शोक यांत बुडत आहेत हें त्यांस कळत नाहीं. तूंच त्यांच्या दुःखांचा शेवट कर आणि त्यांस चांगल्या गतीला लाव. तूंच भूतलावर बुद्धाचा अवतार घेतल्यास त्यांच्या वाईट अवस्थेचा निरास होईल, नाहींपेक्षां त्यांचें हें अज्ञान अनंतकाळ पावेतों राहील." ही प्रार्थना ऐकून लोकनाथानें आकाश वाणीच्या रूपानें उत्तर दिलें कीं, ब्रह्मादिक देवहो तुह्मी आपापल्या लोकांस स्वस्थ जावें. मी आतां मायेच्या उदरीं बुद्धाचा अवतार घेऊन जगती तलावरची सर्व धर्मग्लानि काढून टाकतों आणि भवसागर तरण्यास मनुष्यांना एक मजबूद नवका तयार करून देतों. तुह्मी अगदीं शांत अंतःकरणानें असा, कांहीं काळजी करूं नका.

मागें सांगितल्याप्रमाणें **सुदोधनास** आपणाला पुत्र नाहीं म्हणून फार खंती वाटून त्यानें राज्य कारभाराकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. तितक्या अवसरांत एक मोठा सण आला. त्यादिवसांत **कपिलवस्तु** शहरांत जिकडे तिकडे मिष्टान्न भोजनें, गाणीं, तमाशे आणि मौज यांची एकच गर्दी होऊन गेली होती. परंतु **सुदोधनास** त्या योगें मुळींच सुख झालें नाहीं. तो फारच चिंताग्रस्त होऊन गेला होता; कारण त्यांस असें वाटे कीं, मजला एवढें राज्यपद प्राप्त झालें तरी मरणानंतर, जर पुत्र नाहीं तर, याचा कांहीं उपयोग नाहीं. तस्मात् पुत्रावांचून हें राज्यपद, ही संपत्ति आणि हें वैभव सर्व व्यर्थ होत, यांत कांहीं हांसल नाहीं. ते सणाचे दिवस निघून गेल्यावर एके दिवशीं सुदोधनाची पट्टराणी माया प्रातःकाळीं उठून आंगधुणें वगैरे आट-

पल्यावर निराश्रित, बहिरे आंधळे आणि लंगडे अशा पंगु लोकांस द्रव्य दान करावयास लागली. तें आटोपल्यावर तिनें उत्तम प्रकारचीं वस्त्रें परिधान करून ताजें व रसभरित असें भोजन केलें. नंतर ईश्वराची अराधना करून ती बारा वाजण्याच्या सुमारास आपल्या रंगमहालांत विश्रांति घेण्याकरितां गेली. **सुदोधन**ही त्याच प्रसंगीं आपलीं कामकाजें आटपून महालांत सहज गेला. तेथें कांहीं वेळ राहून **सुदोधन** दरबारीं गेल्यावर **माये**स गाढ निद्रा लागली. तेव्हां तिला स्वप्नांत असें दिसलें कीं, ज्या मंचकावर आपण निजलों आहों तो मंचक चार राजांनीं आपल्या खांद्यांवर घेऊन हिमालय पर्वताच्या रानांत नेऊन टाकला. नंतर स्वर्ग लोकच्या अप्सरांनीं तिला न्हाऊं घालून स्वर्गलोकचींच वस्त्रें नेसावयास दिलीं व तिच्या गळ्यांत सुगंधिक पुष्पांच्या माळा घातल्या. त्यांनीं तिला एका अप्रतिम शोभादायक मंचकावर बसविलें. इतक्यांत शुभ्रवर्ण हस्ती आपल्या शुंडेंत शुभ्रवर्णं कमल पुष्प घेऊन गर्भाशयांत शिरला असें **माये**स वाटलें. **माया** जागृत होऊन पाहते तों कांहींच कोठें दिसेना. मग ती समजली कीं, हें स्वप्न आहे यांत कांहींच खरें नाहीं.

त्याच रात्रीं **माये**ची व **सुदोधना**ची एकांतीं गांठ पडली तेव्हां तिनें त्यापाशीं हें स्वप्न सांगितलें. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं, जोशीबोवा आल्यावर त्यास आदले दिवशीं झालेला प्रकार सविस्तर सांगितला. आणि विचारलें कीं, हें स्वप्न दुष्ट किंवा सुष्ट आहे हें कृपाकरून सांगावें. विचार करून जोशी बोवांनीं उत्तर दिलें कीं, महाराज भीति बाळगण्याचें कारण नाहीं. हें स्वप्न फार चांगलें पडलें आहे. यावरून असें वाटतें कीं, राणी साहेबांस ज्ञानी, विचारशील, प्रसादी आणि योग्य असा एक पुत्र होईल. त्यानें आपलें मन व्यवहाराकडे वळवलें तर तो मोठा चक्रवर्ती राजा होईल किंवा धर्माकडे वळवलें तर सर्व जगद्गुरूंचा जगद्गुरु होईल असा या स्वप्नाचा भाव दिसतो. हें ऐकून **सुदोधनास** परम संतोष वाटला. त्या दिवसापासून **माया** गर्भवती झाली. इतर प्राण्यांस गर्भवासामध्यें जसें दुःख होत असतें तसें तिच्या गर्भांतील प्राण्यास दुःख झालें नाहीं. उलटें त्याच्या पुण्यप्रतापानें **सुदोधन** राजास राजेरजवाडे व इतर करभार आणून द्यावयास लागले. **माये**स असे डोहळे

होऊं लागले कीं, आपण धर्माचरणानें वागावें, इतरांस उपदेश करावा आणि होईल तितकें जगाचें संकट निवारावें. जों जों गर्भ मोठा होत चालला तों तों तिची धर्मवृद्धीची बुद्धि वाढत चालली, परोपकाराविषयीं मन अधिक उद्युक्त झालें व संसार समुद्राचा कंटाळा येत चालला. याप्रमाणें नवमास पूर्ण झाल्यानंतर तिनें आपल्या पतीची माहेरी जाण्याविषयीं आज्ञा मागितली. राजानें चाकर माणसें बरोबर देऊन तिची देवदाहाकडे रवानगी केली.

तिच्या माहेराची वाट एका सुंदर झाडींतून गेलेली होती. वाहानांत बसून कंटाळा आल्यावर तिनें पायानेंच चालावें. चालतांना तिला ऊन्ह लागूं नये ह्मणून वनस्पती आपल्या पानांनीं तिजवर छत्र करीत, वायु तिला आनंद देई आणि पुष्पें आपला सुगंध तिच्या नासिकेंत नेत. अमुक एक पुष्प सुरेख आहे तें आपण तोडून घ्यावें असें तिच्या मनांत आलें म्हणजे उंच पाय करून तोडण्याचे श्रमानें तेवढीच तिला अस्वस्थता वाटेल या भीतीनें त्या वृक्षांनीं आपल्या फांद्या खालीं कराव्या आणि तिला व्हावें तें पुष्प तोडूं द्यावें. वाटेंत तिला क्षुधेनें किंवा तृषेनें उपद्रव दिला नाहीं. याप्रमाणें सरासरी अर्ध मार्ग क्रमण केल्यावर एके दिवशीं वृक्षछायेंतून चालत असतां पोटांत कळ निघालीसें तिला वाटलें. हें तिनें आपल्या एका दासीजवळ सांगितलें. त्याक्षणींच कनाती वगैरे लावून चाकरांनीं जाग्याची सिद्धता केली. कांहीं वेळानें, इतर स्त्रियांस प्रसूति वेदना होऊन जशा आपेष्टा होतात तशा न होतां, माया प्रसूत झाली आणि तिला पुत्र रत्न झालें. तो दिवस भाद्रपद शुद्ध पौर्णिमा विशाखा नक्षत्राचा होता. माया पुत्ररत्नास प्रसवतां क्षणींच ब्रह्म, देव, यम, यक्ष, असुर, सुपर्ण, गरुड, मानव, गंधर्व यांहीं उभयतांवर पुष्पवृष्टि केली. खगोलांत लक्षावधि नक्षत्रें प्रकाशलीं, विश्वांत तेज फांकलें, सूर्य तेजमंद झाला, सृष्टीभर पर्जन्यवृष्टि झाली, गान वाद्यें आपोआप वाजूं लागलीं आणि जिकडे तिकडे आनंदच आनंद झाला. मूल जन्मास आल्यावर इतर मुलांप्रमाणें त्याची व्यवस्था झालेली दिसली नाहीं. उपजतांच तो मुलगा तरुण सोळा वर्षांचा आंगांत कफणी व पायांत खडावा घातलेला असा दिसला. बुद्धाच्या जन्माबरोबरच आनंद (त्याचा शिष्य) कंठक

(त्याचा घोडा) आणि **पवित्र बुद्धिवृक्ष** इतक्यांचा जन्म झाला. **देवदाहा** आणि **कपिलवस्तु** येथील **साख्य** लोकांनीं बाळबाळंतिणीस मोठ्या गौरवानें सासरीं नेलें. तेथेंही सर्व प्रकारें पुत्रोत्सवच झाला. बाळंतीण सातवे दिवशीं वारली. पुढें तिच्या सावत्र आईनें मुलाचें पोषण केलें.

## गौतमाचें बाळपण आणि तारुण्य.

पृथ्वीवरील मुलें क्रमशः जशीं मोठीं होत जातात तसाच **गौतमही** मोठा होत चालला; परंतु इतरांत व त्यांत इतकाच फरक दिसतो कीं, **गौतमाची** शक्ति व पराक्रम हीं उत्तरोत्तर विलक्षण वाढलीं तसें इतरांचें होत नाहीं. त्याच्या पराक्रमावरूनच पुढें त्याला निरनिराळीं नांवें पडलीं. **साख्यसिंह, साख्यमुनी, सर्वज्ञ, लोकनाथ, धर्मराज** आणि अशींच दुसरीं पुष्कळ नांवें यांनीं तो पुढें प्रसिद्धीस आला, भूतलावर बुद्धाचा जन्म झाला येणेंकरून स्वर्ग लोकांमध्यें महोत्सव चालला होता. तेथें देव गंधर्वादिकांस असें वाटत होतें कीं, बुद्धाच्या पुण्यशालीपणामुळें धर्माचें खरें तत्व अज्ञ जनांस कळेल व येणेंकरून धर्माची झालेली ग्लानि नाहींशी होईल. **सुदोधन** राजाचा **कालदेविल** या नांवाचा महातत्ववेत्ता भूत, भविष्य आणि वर्तमान जाणणारा असा **गुरू** होता. त्याचें स्वर्गलोकीं गमन झालें होतें. तेव्हां त्यास बुद्धाच्या जन्माचें सुवर्तमान तेथें समजलें. तो तात्काळ **सुदोधनाच्या** दरबारीं आला. **सुदोधनानें कालदेविल** गुरूची चरणसेवा करून बसावयास आसन दिलें आणि नवीन झालेल्या मुलास **गुरू**जींच्या पायीं लावण्याकरितां दायांस **गौतमाला** आणण्यास सांगितलें. दायांनीं **गौतमाच्या** आंगावर जडितजडावाचें बाळलेणें व उत्कृष्ट प्रकारच्या भरजरीचा आंगरखा टोपी घालून कचेरींत नेलें. **सुदोधनानें** पुत्रास गुरूजींच्या पायां पडण्यास आज्ञा केली. **गौतमानें** तसें केलें नाहीं. त्यानें हवेंत उड्डाण केलें व **कालदेविलाच्या** डोक्यावर आपले दोन्ही पाय ठेवले. हें पाहून **कालदेविलास** आश्चर्य वाटलें आणि आनंदानें त्याच्या शरिरावर रोमांच उभे राहिले. तो म्हणाला कीं, हा मूल केवळ ऐश्वर्यराज दिसत आहे.

याच्या आंगाची कांति फारच तेजोमय दिसते व हा महान् ज्ञानी होईल असें याचें लक्षण भासत आहे. याच्या मुखचर्येवर ज्या खुणा आहेत त्यांवरून तर असें खास वाटतें कीं, हा एक धर्म नियंता व संसारपाशस्थांस मुक्तिधामदर्शक होईल. त्याचवेळेस त्याच्या नेत्रांतून दुःख झाल्याप्रमाणें टपटप आश्रु आले. याचें कारण कीं, तशी उत्तम संधी अवलोकन करण्यास आपणाला सांपडणार नाहीं, आपण कदाचित् मृत्यूच्या तडाख्यांत सांपडूं असें त्यास वाटलें. इतकें झाल्यावर कालदेविल चालता झाला.

सुदोधनराजानें यथाकालीं चांगल्या मुहुर्तावर नामकर्णाचा समारंभ करून मुलाची तेंव्हांच पत्रिका करविली होती ; तींत ब्राह्मणांनीं असें भाविष्य केलें होतें कीं, हा मुलगा सद्गुणी, सदाचारी व ईह्यलोक वैभवावर अश्रद्धावंत होईल. पुष्कळ ब्राह्मणांनीं अनेक प्रकारांनीं या मुलाच्या मोठेपणाबद्दल भाकीत केलें होतें ; परंतु कौंडिण्य ह्मणून जो ब्राह्मण होता त्यानें सुदोधनराजास निःशंकपणें असें सांगितलें कीं, तुझ्या या मुलग्यास जगांतील सुखें परम तुच्छ वाटून कांहीं कारणांनीं उपरती होईल आणि तो चक्रवर्तिपदाची सगळी आशा सोडून आपल्या वयाच्या एकुणतिसावे वर्षीं योगसाधनाकरितां निघून जाईल. हें ऐकून सुदोधनास दुःख वाटलें. तो आपल्या मंत्रीस ह्मणाला कीं, हें राज्य वैभव अनुभवण्यासाठीं मजला एकच पुत्र आहे आणि त्यास उपरती होणार मग हें सर्व व्यर्थ होय. तथापि ज्या कारणांनीं त्यास उपरती होणार तीं कारणें न घडण्याविषयीं बंदोबस्त ठेवला ह्मणजे तो चक्रवार्ति राजपदाप्रत येईल

गौतमाचें सात आठ वर्षांचें वय झालें तेंव्हांच तो मोठा बुद्धिमान व विचारशील आहे असें दिसलें. त्याच्या गुरूनें त्याला जी विद्या शिकवावी ती इतकी त्यास चांगली येई कीं, त्या विद्येतील मार्मिकांनीं सुद्धां माना डोलवाव्या. त्या काळांत त्यानें त्यावेळीं ज्या विद्या किंवा कला शिकणें अवश्यक व योग्यतेचें मानलें होतें त्या सर्व करतलामलवत् करून सोडल्या. लहानपणापासूनच, मृत्यूच्या पाशांत सांपडणाऱ्या लोक सुखाचा त्याला तिरस्कार असे. घोड्यावर बसून आपल्या सौंगड्यांसहवर्तमान तो खेळावयास किंवा शिकारीस गेला तर, त्याच्या

शांगांत करामत असतांही त्याचें मन तिकडे कधींच रमत नसे. तो नेहमी आपल्या सोबत्यांबरोबर आत्म्याच्या सुखाविषयीं संवाद करी. त्याच्या बुद्धीची चलाखी पाहून सभोंवारचे व लांबलांबच्या देशचे राजपुत्र त्याचा स्नेह संपादन करण्याकरितां त्याजकडे जात. तो सर्वांशीं साम्यतेनें वागे. आपणांत जो गुण किंवा विचार नव्हता तो त्यानें दुसऱ्यापासून घेण्याचा प्रसंग आला असतां तो कधीं व्यर्थ दबडला नाहीं. पुढें पुढें **गौतमास** असें वाटूं लागलें कीं, शिकारीस जाणें हें काम शरिराच्या व्यायामाचें आहे, पण त्यांत मानसिक व्यायाम होत नाहीं. ह्मणून तो आपल्या महालांतच त्या दिवसांपासून विचार करीत बसूं लागला. हें त्याच्या सोंगड्यांस व तैनाती माणसांस रुचलें नाहीं. त्याबद्दल सर्वांनीं **सुद्दोधन**राजाजवळ गाऱ्हाणें केलें कीं, राजपुत्र **गौतम** नेहमी घरांत बसून राहतात हें बरें नव्हे. त्यांस शिकार करणें, हिंसा करणें किंवा शूरत्वाचीं कृत्यें करणें आतां आवडणार नाहीं तर मग त्यांजकडे मोठेपणीं राज्यकारभार सोंपविल्यावर एकादा लढाईचा प्रसंग आल्यास काय वाट होईल ? हें **गौतमास** समजलें. तेव्हां त्यानें सर्व राज्यभर दौंडी पिटविली कीं, तिरंदाजी करणें, घोड्यावर बसणें, निशाण मारणें आणि असेच दुसरे शूरत्वाचे खेळ ज्या कोणांस चांगले येत असतील त्यांनीं राजवाड्याच्या पुढच्या थोरल्या पटांगणांत अमुक दिवशीं हजर असावें. त्यावरून शेंकडों शूरत्वाच्या खेळांत पटाईत तेथें गेले. **सुद्दोधन**राजा, दरबारी सर्व मंडळी, व मांडलिक संस्थानिक ही मौज पाहण्याकरितां हजर होते. त्या सर्वांदेखतां इतरांनीं पहिल्यानें आपलें कसब दाखविलें. नंतर **गौतमानें** आपलें कसब दाखविण्यास आरंभ केला. शूरत्वाच्या खेळांत त्यानें सर्वांच्या तोंडून असें ह्मणवून घेतलें कीं, मोठे वीर किंवा पटाईत लोक यांच्यांत जें कसब नाहीं तें या दहा बारा वर्षांच्या मुलानें दाखविलें ; तेव्हां हा कोणी तरी अद्भुत कर्तृत्वाचा प्राणी आहे. खेळ आटोपल्यावर ज्याच्या त्याच्या दर्ज्याप्रमाणें सर्वांस **सुद्दोधनानें** पोषाख देऊन आनंदी केलें. **गौतमाची** शूरत्वाबद्दल तारीफ करीत सर्व लोक आपापल्या घरीं निघून गेले. त्या दिवसांपासून **गौतमाची** सगळ्या राज्यांत छाप बसली.

**गौतमाचें** तेरा वर्षांचें वय झालें तेव्हां **कपिलवस्तु** शहरांत एके

वेळीं असें घडून आलें कीं, पावसाळा लागण्याचे सुमारास राजानें स्वत: नांगर धरून जमीन नांगरावी व तींत बीं पेरावें ह्या परंपरागत चाललेल्या वहिवाटीप्रमाणें, **सुदोधन**राजा ब्राह्मणांसहवर्तमान रानांत जमीन नांगरण्यास गेला होता. त्या प्रसंगाकरितां सोन्या रुप्याच्या मुलाम्याचे सातशें एकुणऐंशी नांगर तयार करविले होते. **कपिलवस्तु** शहरांतील त्या दिवशीं शेट सावकार, वाणी उदमी, मानमानकरी, सरदार व वडे वडे सरकारी अधिकारी यच्चावत् रानांत गेले होते. यामुळें तेथें एक मोठा यात्रेचाच प्रसंग झाला होता. **गौतमा**सही रानांत बरोबर नेलें होतें. वाटेच्या श्रमानें त्यास तान्ह फार लागली ह्मणून तो कांहीं चाकरमाणसांस बरोबर घेऊन पलीकडच्या बाजूस एक सरोवर होतें त्यावर पाणी पिण्यास गेला. पाणी प्यायल्यावर त्यास झोंप यावयास लागली ह्मणून तो शेजारीं वृक्षछायेखालीं स्वस्थ निजला. राजपुत्र झोंपीं गेलासें पाहून जवळचीं चाकरमाणसें जमीन नांगरण्याचा विधी जेथें चालला होता तेथें निघून गेलीं. **गौतम** जागा होऊन पाहतो तों आपल्याजवळ कोणी नाहीं असें त्यास दिसलें. हा एकांतवास बरा आहे, येथें कोणाचासुद्धां उपसर्ग लागावयाचा नाहीं असें त्याच्या मनांत येऊन त्यानें त्याच वृक्षछायेखालीं आत्मानात्म विचार करण्याकरितां समाधी लावली. संध्याकाळ होऊन लोक घरीं जावयास परतूं लागले तेव्हां **गौतमा**च्या चाकरमाणसांना त्याची आठवण होऊन ते त्या वृक्षाखालीं गेले, तों त्यांच्या दृष्टीस **गौतम** विचारांत गढून गेल्याप्रमाणें बसलेला दिसला. तेवढ्याच भागांत सूर्यासारखे अनेक सूर्य तपत आहेत व त्यांच्या तेजांपासून **गौतमास** त्रास होऊं नये ह्मणून **इंद्रादि** देव त्याच्या डोक्यावर छत्र्या धरून उभे आहेत, कोणी वारा घालीत आहेत, कोणी त्याच्या आंगास चंदनाच्या उट्या लावीत आहेत आणि कोणी अनेक प्रकारें त्याची सेवा करीत आहेत असाच प्रकार त्यांच्या दृष्टीस पडला. त्यांनीं **सुदोधना**जवळ हें जाऊन सांगितलें. **सुदोधन** प्रधानांस घेऊन तेथें गेला. चाकरमाणसांनीं सांगितल्याप्रमाणें तेथें त्यांस चमत्कार दिसला खराच. आपला पिता आपल्यास न्यावयास आला आहे असें समजून **गौतमा**नें समाधि उतरली. त्या क्षणींच तेथले ते सूर्य आणि इंद्रादि देव आपोआप नाहींसे झाले.

**सुदोधनास** आपणाला इतका योग्य व अलौकिक पुत्र झालासें पाहून फार धन्यता वाटली. तो आश्चर्य व आनंद करीतच **गौतमास** घेऊन घरीं गेला.

दुसरे दिवशीं **सुदोधनास**, आपल्या पुत्राच्या मनरंजनार्थ एक उत्तम बाग तयार करवावी, असें वाटलें. हें तो प्रधानाजवळ बोलला. त्यानें लागलेच राज्यांतले चांगले कारागीर आणवून बागेचें काम कोणत्या तऱ्हेचें असावें व त्यांत क्रीडाभुवनें व सरोवरें कशीं असावीं याजबद्दल त्यांस समज देऊन कामाचे मक्ते दिले. एक दोन दिवसांनीं कामास सुरुवात होणार तोंच इंद्र आपल्या **वेत्सुकाम** या नांवाच्या हुषार माळ्यास ह्मणाला कीं, **गौतमबुद्धाच्या** उपयोगासाठीं तूं आपल्या अगाध शक्तीनें एका रात्रींत नंदनवनाप्रमाणें बाग तयार कर. **वेत्सुकाम** लागलाच भूतलावर उतरला आणि त्यानें राजवाड्यापासून अर्ध कोशाच्या अंतरावर अति शोभायमान व रम्य बाग एका रात्रींत तयार करून ठेविली. त्या बागेंत एक सरोवर केलें होतें तें फारच अवर्णनीय झालें होतें. त्याच्या किनाऱ्यास पोंवळीं व माणकें बसविलेलीं होतीं. पाणी स्वच्छ व मधूर असून त्यांत अनेक प्रकारचीं व रंगाचीं कमलपुष्पें होतीं. त्यांत हवा खाण्यास फिरण्याकरितां चित्र विचित्र आकाराच्या होड्या केलेल्या होत्या. एका होडीवर खुद्द **गौतमासाठीं** नकशीचें सिंहासन केलेलें होतें. ज्या जागेंत बागेच्या कामास सुरुवात होणार होती तेथेंच ही बाग तयार झाली असें पाहून सर्वांस **गौतमाच्या** प्रसादिक जन्माविषयीं हर्ष झाला.

**गौतमाचें** सोळा वर्षांचें वय झालें, तेव्हां त्याच्या विहारासाठीं एक नवा राजवाडा करण्याचें काम त्याच्या बापानें लाविलें. तीन प्रकारच्या सोई त्या राजवाड्यांत केलेल्या होत्या. हिंवाळ्यासाठीं नऊ मजली इमारत, उन्हाळ्याकरितां पांच मजली इमारत, आणि पावसाळ्याकरितां सात मजली इमारत अशा सोई त्यांत केलेल्या होत्या. राजवाडा तयार झाल्यावर त्यांत चोहोंकडे हांड्या आणि झाडें टांगलीं व भिंतींस आरसे लावले. प्रत्येक इमारतीवर एकेक फार सुशोभित मंडप तयार करविला. तें सर्व काम बिलोरी होतें. त्यांपैकीं सात मजली इमारतीवर जो मंडप बांधला होता त्याचें नांव **चंद्रलोक** असें ठेवलें. **चंद्रलोकांत**

उन्हाळे दिवशीं हवा घेऊन जीवास अराम व्हावा ह्मणून ही मुद्दाम व्यवस्था केलेली होती. याप्रमाणें नव्या राजवाड्याचें काम अगदीं संपल्यावर **सुद्दोधन**राजानें **गौतमास** राज्याभिषेक करण्याचा आपला मानस दरबारी मंडळीस कळवून आपण त्याचें लग्न आतांच करणार आहों अशी चोहोंकडे द्वाही फिरविली. त्यावरून कित्येक राजांनीं **सुद्दोधना**जवळ बोलणें लाविलें कीं, आपलें कूळशीळ मोठें आहे, आपला मुलगा दिसण्यांतही विलक्षण व गंभीर दिसत आहे आणि त्याचें वयही बेताचेंच आहे; परंतु भर सभेंत त्याच्या विद्येची परीक्षा झाल्यावांचून आह्मांस आपल्या मुली देतां येत नाहींत. ही हकीकत **सुद्दोधनानें** आपल्या पुत्रास कळविली. तो ह्मणाला बाबा कांहीं चिंता नाहीं. आपण सभा भरवा ह्मणजे मी पाहिजे त्या विषयांत परीक्षा देण्यास तयार आहें. आपण त्याविषयीं कांहीं काळजी करूं नये. पुत्राच्या हुशारीच्या भाषणावरून **सुद्दोधन**राजानें एक सभा भरविली. मोठमोठाले शास्त्री भिक्षुक, राजे आणि इतर संभावित लोकांस ते दिवशीं निमंत्रणें केलीं होतीं.. नेमलेल्या दिवशीं सभेचा मोठा समारंभ झाला. आठरा विद्या चौसष्ट कला यामध्यें **गौतमानें** आपली परीक्षा दिली. त्यांत तो कोठेंही थोडासुद्धां चुकला नाहीं. ही त्याची विद्वत्ता पाहून **साख्य**राजांनीं आपल्या मुली देण्याचें कबूल केलें. **माहानामा** राजानें आपली कन्या **यशोधरी**, **दंडपाणी** राजानें आपली कन्या **गौतमी** आणि तिसऱ्या एका राजानें आपली कन्या **मनोहरी** याप्रमाणें देण्याचें तिघांनीं कबूल केलें. त्यांत **माहानामा**राजकन्या **यशोधरी गौतमाच्या** पसंतीस उतरली. कारण ती फार रूपवान, सद्गुणी, मोहक आणि कमलपुष्पाप्रमाणें दिसे. **सुद्दोधनानें**ही तिला पसंत केलें. पुढें चालीप्रमाणें मोठ्या डामडौलाचा व थाटमाटाचा त्या उभयतांचा विवाह झाला. **माहानामा** राजास तेवढीच एकुलती एक मुलगी व **सुद्दोधनास**ही वृद्धापकाळीं तेवढाच झालेला मुलगा ह्मणून उभयपक्षांनीं ब्राम्हणांस दान धर्म व अन्नसंतर्पणें यांची अति गर्दी केली. **यशोधरीच्या** रूपा योग्य व गुणा योग्य नवरा मिळाला ह्मणून **महानामा** राजानें आपल्या राज्यापैकीं कांहीं भाग **गौतमास** आंदण दिला. विवाह झाल्यावर जिकडे तिकडे शांत झालें. **गौतमी** आणि

**मनोहरी** यांचीं मन कायतें **गौतमाच्या** पायीं गुंतलीं होतीं. त्यांनीं दुसऱ्या राज पुत्रांस वरलें नाहीं. त्यांस ही **गौतमानें सुदोधनाच्या** आज्ञेनें आपल्या जनानखान्यांत आश्रय दिला. परंतु त्यांच्याशीं त्यानें धर्मांप्रमाणें विवाह लावला नाहीं. **सुदोधनानें गौतमास** त्याचवेळीं राज्याभिषेक करून ठेवला, पण त्याच्या हातांत त्यानें राज्यसूत्रें दिलीं नाहींत. त्यास ब्राम्हणांनीं अगोदरच सांगून ठेविलें होतें कीं, **गौतम** हा, संसार सोडून योग व धर्म साधनाकरितां निघून जाईल ; ही आठवण झाल्यानें त्याच्या हातांत राज्यकारभार देण्यास त्याचें मन कचरलें. यासाठींच त्यानें त्याला नुसता राज्याभिषेक करून ठेवला.

सोळा वर्षांपासून तो तहत एकुणतीस वर्षांचें वय होईपर्यंत **गौतमानें** चैनबाजी व सुख यांत काळ घालविला. त्याला कशाची काळजी नव्हती आणि **यशोधरी** पट्टराणीसारखी सुरूप स्त्री मिळाली होती व तशाच त्याच्या राजवाड्यांत जनान्यामध्यें शेंकडों रूपवान गायनादि कलेंत निपुण स्त्रिया होत्या म्हणून विषय सुखावांचून त्यास दुसरें कसलेंच चित्तव्यग्रतेचें व्यसन नव्हतें. एखादे वेळेस बापानें कधीं दरबारीं कामकाज पाहण्यास बोलाविलें तर मात्र तो तेथें फार थोडा कालपर्यंत जात असे. बाकी त्याचा सगळा काल सुखांत व ऐषआरामींत जाई. हा वेळ त्याचा ऐन तारुण्याच्या भराचा असल्यामुळें दोन तीन वर्षेंपर्यंत तो विषय सुखांत मदांध होऊन गेला होता. पण ती तार उतरल्यावर त्यास विचार होऊं लागला. मध्यें कधीं **यशोधरी, गौतमी व मनोहरी** यांनीं **गौतमास** सुख होण्याकरितां गानादि प्रकार केले म्हणजे त्याचें मन रमे. कालानुक्रमानें **गौतमापासून यशोधरीस** एक पुत्ररत्न झालें. त्याचें **राहुल** असें नांव ठेविलें. यावेळीं त्याची विषय सुखाकडील निवृत्ति होऊन योग साधनाविषयीं तंद्री लागली होती. पुत्ररत्न झालें असें समजण्याबरोबर त्यानें बाह्यात्कारी आनंद दाखविला, पण त्याचें अंतर्याम अगदीं करपून गेलें. तो आपल्या मनाशीं बोलला कीं, माझें एवढें वय झालें तरी मजकडून आधमपणानें आत्मबोध करून घेण्याविषयीं कांहींच झालें नाहीं. मी इतके दिवस मदांध होऊन व्यर्थ विषय सुखांत बुडून गेलों. याचा मजला पश्चात्ताप होत आहे इतक्यांतच हा पुत्र झाला हें एक नवें संकटच उत्पन्न झालें आहे. आतां या

पुत्राचा मायापाश तोडणें मला किती जाचेल तें सांगवत नाहीं. लहानपणीं माझी जी वृत्ति होती ती मी तारुण्यांत विसरून गेलों. मदांधपणांत जितका माझा काळ गेला तितका समार्गीत गेला असता तर त्यापासून केवढें कार्य झालें असतें? परंतु झालेल्या गोष्टीस उपाय नाहीं ह्मणून त्यानें आपलें मन स्वस्थ केलें. त्यादिवसापासून तो संसाराविषयीं अगदीं उदासीन झाला. **सुद्दोधनानें** आपल्यास नातू झाला म्हणून मोठा उत्सव केला. लोकांनींही **राहुलाच्या** नांवानें जयजयकार मांडला. परंतु त्यास त्याचें कांहीं वाटलें नाहीं.

**गौतमास** आपल्या राजवाड्यांत चैन पडेना ह्मणून त्याच्या मनांत आलें कीं, विश्रांति घेण्याकरितां अंमळ बागेमध्यें जावें आणि सरोवरामध्यें होडींत बसून फिरून मग परत यावें. त्यानें सारथ्यास रथ सिद्ध करून आणण्याची आज्ञा केली. तयार करून आणलेल्या रथांत बसावयास वाघ आणि सिंह यांच्या कातड्याच्या गाद्या पसरल्या होत्या आणि त्यास मौल्यवान् रत्नें जडलेलीं होतीं ह्मणून त्याची प्रभा फांकलेली दिसे. त्या रथांत युद्धांचीं शस्त्रास्त्रें भरलेलीं होतीं, त्यामुळें जणूं काय तो वीराच्या रथाप्रमाणें शोभत होता. त्या रथांस तांबड्या रंगाचे घोडे जुंपलेले होते. याप्रमाणें रथाची सिद्धता करून सारथ्यांनीं आज्ञेप्रमाणें तयारी आहे ह्मणून **गौतमास** हात जोडून कळविलें. **गौतमानें** सुंदर पोषाख केला आणि जनानांतल्या कांहीं स्त्रिया बरोबर घेऊन तो रथारूढ झाला व थेट बागेंत गेला. तेथें त्यानें कांहींवेळ सख्यांसहवर्तमान क्रीडा केली; परंतु त्याच्या चित्तास व्यग्रता आली होती ती नाहींशी झाली नाहीं. बरोबरच्या स्त्रियांनीं त्याचें मन सुप्रसन्न करण्याविषयीं पुष्कळ रीतीनें संवाद केले, पण त्याचें मुख प्रफुल्लित होईना रोजची त्याची टवटवी अगदीं नाहींशी झालेली त्यांस दिसली. बागेंत कांहीं काळ क्रमून तो आपल्या राजवाड्याकडे परत येण्यास तेथून निघाला.

## गौतमास झालेली उपरती.

ब्राह्मणांनीं व जोशांनीं नाम करणाच्या प्रसंगीं, **गौतम** हा संसा-

राज्या सुखांचा त्याग करून योगाभ्यास, आत्मज्ञान, काया दंडण, उपोषणें आणि एकांतवास यांचा अनुभव पाहून त्यांजपासून आत्मिकलाभ करून घेण्याकरितां वनांतरीं निघून जाईल असें भविष्य केलें होतें हें पूर्वीं एका प्रसंगीं सांगितलेंच आहे. त्यावर सुदोधन राजानें कौंडिण्य ब्राह्मणास पुसलें कीं, आपण माझा मुलगा योगी होईल असें भाकीत केलें आहे, तर त्यास कोणता व कसा साक्षात्कार झाला ह्मणजे तो हा संसार सोडून योगज्ञान संपादन करण्याकरितां संसारास विरक्त होईल हें कृपाकरून सांगितल्यास मजवर तर काय परंतु आह्मा सर्व साख्य राजांवर आपले महत् उपकार होतील. त्यांतून आपण त्रिकाल ज्ञानी आहांत, तेव्हां आपले बोल कदापिही मिथ्या होणार नाहींत अशी माझी खातरजमा आहे. तर दयाकरून याविषयीं माझें अज्ञान आहे तें आपण निरसन करून टाकावें. कौंडिण्यानें उत्तर दिलें कीं, राजा, तुझ्या मनाचा बेतालपणा होईल ह्मणून माझ्या अंतःकरणांतून हें तुला सांगावयाचें नव्हतें; तशांतुनही तुला हा एकुलता एकच पुत्र आहे, तेव्हां कदाचित् भलताच प्रसंग आल्यास सर्व राज्यभर आकांत होईल अशी शंका आल्यावरून मीं हें तुला कळविलें नाहीं, परंतु ज्याअर्थीं तूं इतकी चिकित्सा करून विचारीत आहेस त्याअर्थीं मी ही तुला कांहीं मुलाजा न धरितां जें खरें खरें आहे तें समग्र जशाचें तसेंच सांगतों. मात्र त्या योगें तुझ्या मनास दुःख होऊं नये व झुरणी लागूं नये ह्मणजे झालें. हें विषेशेंकरून कळविण्याचें प्रयोजन हेंच कीं, आपणावर पुढें कांहीं संकट ओढवणार आहे असें मनुष्यास समजल्यावर त्याविषयीं झुरणी लागणें हें स्वाभाविक आहे. तर तसें होऊं नये हें माझें तुजपाशीं मागणें आहे, याचा विचार कर. कौंडिण्य ह्मणाला कीं, तुझ्या या मुलग्यास चार साक्षात्कार दृष्टीस पडतील त्यामुळें त्याची चित्तवृत्ति संसारावर अगदीं उदासीन होईल. पहिला साक्षात्कार जराग्रस्त मनुष्य त्याच्या दृष्टीस पडेल. दुसरा साक्षात्कार व्याधिग्रस्त मनुष्य त्याच्या पाहण्यांत येईल. तिसरा साक्षात्कार तो एक प्रेत पाहील आणि चवथा व शेवटचा साक्षात्कार एक सिद्ध योगी पुरुष त्याच्या दृष्टीस पडेल. या चार साक्षात्कारांनीं तुझ्या पुत्रास उपरति होईल हें ऐकून सुदोधनास कांहीवेळ बरें वाटलें नाहीं, पण विचार करून पा-

हिल्यावर त्यास आपल्या पोटीं असा भावी सिद्ध पुरुष पुत्राच्या रूपानें जन्मास आला आहे याबद्दल अत्यानंद झाला. हे चारी साक्षात्कार आपल्या पुत्राच्या दृष्टीस पडूं नयेत अशी त्याची उत्कट इच्छा होती; कारण आपल्या पुत्रानें चक्रवर्ति पदारूढ व्हावें असें त्यास वाटत होतें, ह्मणून सुद्दोधनानें चोहोंकडे कडेकोट बंदोबस्त ठेवला. ठिकठिकाणीं शहरांत व राजवाड्यांत याच कामावर नोकरांची योजना त्यानें केली. गौतम रथांत बसून फिरावयास जाई तेव्हां, वर सांगितलेल्या चारी गोष्टी आजू बाजूस रस्त्यांत नाहींत अशी दोन दोन कोसांवरची वर्दी आल्याशिवाय दारुकास रथ हांकण्याची परवानगीच नव्हती.

इतका कडेकोट बंदोबस्त असतांही एके दिवशीं गौतम आपल्या रथांत बसून घराकडे बागेतून परत येत असतां एकाएकी वाटेंत एक जराग्रस्त मनुष्य त्यानें पाहिला. त्या जराग्रस्त मनुष्याच्या तोंडाचें बोळके झालेलें होतें, त्यास ऐकूं येत नव्हतें, त्याचे डोळे गारगोटीसारखे झालेले होते, त्याच्या कातडीवर सुरकुत्या पडलेल्या होत्या, त्याचें कंबरडें वांकलेलें होतें आणि आपला झोकांडा जाऊं नये ह्मणून हातांत काठी घेऊन तो हळू हळू ती टेंकीत चालला होता. त्या जराग्रस्त मनुष्यास पाहतांच गौतम असा विचार करूं लागला कीं, याप्रमाणेंच आपणासही जरा येणार आहे, तस्मात् या मायिक पसाऱ्यांत कांहीं तथ्य नाहीं. मी उगीच यांत भ्रमण करीत आहें. ही दुरत्यय जरावस्था आल्यावर मानवांच्यानें कांहीं सुद्धां योग साधन करवत नाहीं. त्यावेळीं जन्माची व्यर्थता ज्याची त्यास दिसूं लागते. अशी जरावस्थेत दुर्गती आहे. दुसऱ्या एका वेळीं, घराकडून बागेमध्यें घोड्यावर बसून जात असतां एक व्याधिग्रस्त मनुष्य जमीनीवर दुःखानें लोळत पडलेला गौतमाच्या दृष्टीस पडला. तो व्याधिग्रस्त मनुष्य वेदनांनीं व्याकूळ झालेला असून फारच कण्हत व कुंथत होता. त्याच्या शरिरावर रक्ताचे व पुवाचे ओघळ आलेले होते, जखमांतून बाहेर मासुरडें पडलेलें होतें, त्याजवर माशा बसून त्याला तडातड तोडीत डीत होत्या. या साक्षात्कारानें त्याच्या "जिवाची आंतल्या आंत तळमळ झाली. देहास अशाच अनेक व्याधि होतात हें पक्केपणीं त्याच्या

मनावर बिंबलें आणि ज्या देहाच्या पोषणाविषयीं तो इतके दिवस उद्युक्त होता त्याच देहाचा त्याला वीट आला. तिसऱ्या खेपेस **गौतम** रानांत शिकार करण्याकरितां रथांतून चालला असतां त्याच्या दृष्टीस एक प्रेत पडलें. त्या प्रेताची दुर्गंधी सुटलेली होती, नवद्वारांत मांसांचा भणभणाट चालला होता, कोल्हीं व कुत्रीं आंतील आंतडीं उसपून खात होतीं आणि त्यांतील जीव निघून गेल्यामुळें तें तेजहीन दिसत होतें. हें पाहून **गौतम** मनांतल्या मनांत खचून गेला. प्राणिमात्राच्या मागें ही प्रेतावस्था लागलीच आहे असें त्यास विचाराअंतीं समजलें तेव्हां त्याचा अभिमान नष्ट झाला आणि त्याच्या ठिकाणीं अस्वस्थता उत्पन्न झाली. पूर्वींच्या दोन साक्षात्कारांनीं त्याचें मन संसारापासून बरेंच परावृत्त झालेलें होतें; तशांत हा प्रेतावस्थेचा सात्कार पाहिल्यानें, शरीर इतकें निंद्य, अशौच आणि घाणेरें आहे असें तो मानावयास लागला. त्याला कांहीं केल्यानें चैन पडेना. बागेंत तो हिकडे तिकडे हिंडला, पुष्पांचे हार गळयांत घालून त्यानें शरिरेंद्रियांस सुख होण्याकारितां पुष्कळ उपाय केले. गोड गोड फळें खाल्लीं आणि भोग्य वस्तूंचा उपभोग केला; परंतु कांहीं केल्यानें त्याच्या चित्तास समाधान वाटेना म्हणून तो घराकडे परत आला. **कौंडिण्य** ब्राम्हणानें सांगितलेल्या चार साक्षात्कारांपैकीं, तीन साक्षात्कार **गौतमा**च्या दृष्टीस पडले असें **सुद्दोधनास** जेव्हां समजलें तेव्हां त्यानें चौथा साक्षात्कार **गौतमा**च्या नजरेस पडूं नये म्हणून विशेष बंदोबस्त केला. तथापि **गौतम** बागेकडे रथांत बसून जात असतां आकाश मार्गानें उतरून एक योगी त्यापुढें उभा राहिला. त्या योगानें अंगांत भगव्या रंगाची कफणी घातलेली होती, पायांत खडावा घातल्या होत्या आणि दाढी मिशा व डोईवरचे केंस बोडिलें होते. त्याच्या खाकेंत एक झोळी व तींत भिक्षापात्र इतकें कायतें त्यापाशीं चरितार्थाचें सामान होतें. त्याचें दिव्यरूप पाहून **गौतमास** मोह उत्पन्न झाला. त्यानें दारूकास विचारलें कीं, इतरांपेक्षां भिन्न वस्त्रे परिधान केलेला हा कोण प्राणी आहे? दारूकानें हात जोडून म्हटलें कीं, धनी साहेब, हा सिद्ध पुरुष आहे. याच्या इतका सुखी व ज्ञानी प्राणी दुसरा कोणी नाहीं. हा साक्षात्कार पाहण्याबरोबर **गौतमा**ची पर्णपणें समजूत पडली कीं, जितके यच्चावत् प्राणी म्हणून जन्मास

आले आहेत त्यांस जरावस्था, व्याधिग्रस्तावस्था आणि प्रेतावस्था या तिन्हीही स्थिति आहेत. यांतून कोणीही सुटका पावलेला नाहीं. यासाठीं योग साधनाची स्थिति सर्वांत उत्तम होय, का कीं, त्या ठिकाणीं कुटुंब, स्त्रिया, मुलेंबाळें वगैरे यांचा अगदीं उपसर्ग नाहीं. या विचारांनीं त्याचें मन आनंदभरित झालें. बागेंत जाऊन त्यानें महासुखानुभव घेतला. त्यानें सरोवरांत त्यावेळीं मोठ्या उत्साहानें स्नान केलें. स्नान केल्यानंतर, चाकर माणसें वस्त्रें आणणार इतक्यांत देव लोकाहून उत्तम उत्तम वस्त्रें खालीं पडलीं तीं त्यानें आंगावर घातलीं. सूर्य अस्तास जाईपर्यंत त्यानें तेथें काळक्रमण केला. अगदीं संध्याकाळ झाली तेंव्हां तो रथांत बसून आपल्या राजवाड्याकडे चालता झाला. **गौतमी** ( **गौतमाच्या** जनानखान्यांतील अत्यंत सुंदर अविवाहित मुलरीण ) आपल्या रंगमहालांत बसली होती, तिनें पतिराजाची स्वारी आलीसें पाहून आपल्याकडे **गौतमाचें** चित्त ओढून घेण्याकरितां स्तुतिपर एक पद्य करून तें दीपकल्याण रागांत गायिलें. तें ऐकून **गौतम** म्हणाला कीं, ही प्रीति तोडणें मात्र परम कठीण आहे. या प्रीतिपाशामुळेंच मी इतका मंद व सुखेच्छु झालों आहें. **गौतमीच्या** गाण्यापासून त्यानें एक उपदेशच घेतला कीं, स्त्रियांच्या प्रीति चरित्रांत गुंतलें ह्मणजे मनुष्य दुःख समुद्रांत बुडतो, याकरितां त्यांपासून दूर राहणें हितावह आहे. हें राजकीय वैभव व सुख यांचा संग त्यागून भवभीति नाहींशीं करावी, एतदर्थ पारत्रिक सुखाच्या मार्गास लागण्याला **गौतमीचा** उपदेश आपल्या कामीं पडला ह्मणून त्यानें तिजकडे एक मौक्तिकाचा हार नजराणा पाठविला. तिला असें वाटलें कीं, **गौतमाची** मर्जी आपणावर फिदा झाली ; परंतु पुढें तसा कांहीं योग जमला नाहीं.

**गौतम** रात्रीचें भोजन आटोपल्यावर करमणुकीकरितां चंद्रलोक मंडपांत जाऊन बसला. तेथें सर्व प्रकारचीं सुगंधिक द्रव्यें होतीं त्यामुळें त्यांचा त्या जागेंत परिमळ कोंदून गेला होता. नानाप्रकारचे दीप पाजळलेले होते त्या योगें चोहोंकडे प्रकाशमय दिसत होतें. सुवासिक फुलांचे हार पठईस व भिंतीस लटकावल्यामुळें विलक्षण शोभा दिसत होती आणि रूपवंत स्त्रिया नृत्य गायन करीत होत्या, तरी त्यांत त्यास

समाधान वाटलें नाहीं. विचार करितां करितां त्यास शय्येवर निद्रा लागली. **गौतमास** झोंप लागलीसें पाहून स्त्रियाही त्याच ठिकाणीं निरनिराळे मंचक होते त्यांवर जाऊन निजल्या. कांहीं वेळानें **गौतम** जागृत झाला आणि पाहतो तों, स्त्रिया सुशिक्षित व मोठ्या घराण्यांतील असतांही, अव्यवस्थित रीतीनें निजलेल्या आहेत, कित्येकांचीं वस्त्रें विगलित झालेलीं आहेत, कित्येक आपलीं तोंडें उघडीं ठेवून घोरत आहेत, कित्येक दांत करकर खात आहेत, कित्येकांच्या तोंडांतून लाळेचे ओघळ गालांवर आल्यानें दुर्गंधी सुटत आहे आणि कित्येक लोळत असल्यामुळें त्यांचे शरिरावयव दिसत आहेत असें त्यानें पाहिलें. यानें त्याच्या अंतःकरणास चटका लागला. त्याच्या मनांत असें पक्कें ठरलें कीं, माझा हा राजवाडा केवळ मृतवत् आहे तेव्हां याप्रमाणें यांत आयुष्य क्रमण करणें फार दुःसह आहे. जों जों तो अधिक न्याहाळून पाहावयास लागला तों तों त्यास अतिशयच दुःख होत चाललें. तो आपणाशींच बोलला कीं, " **गौतमा** सावध हो, या भवचक्रांत गुंतूं नकोस. तुझें अज्ञानच दुःखमूलक आहे. आणि यामुळेंच जें वस्तुतः शोकदायक आहे तेंच तुला हर्ष कारक वाटतें. ज्यांत अविनाशी सुख नाहीं अशा जगांत तूं धन्यता मानीत आहेस, हें अंतीं तुला बाधक होईल याचा विचार कर आणि सावध हो." या विचारांनीं **गौतमाचें** चित्त संसारापासून परावृत्त होऊं लागलें आणि याक्षणींच आपण योगसाधनाकरितां रानांत निघून जावें असें त्याच्या मनांत येऊं लागलें. आतां यापुढें मनाची उपेक्षा करण्यांत आपण सार्वकालिक सुखास अंतर पावूं हा विचार त्याच्या ठायीं बाणला, आणि बाहेरच्या बाजूस **चान** या नांवाचा कोणी द्वारपाळ सेवक होता त्यास **गौतमानें कंठक** शामकर्णास सिद्ध करून आणावयास सांगितलें. सेवक सिद्धता करण्याकरितां गेला, आपल्या पुत्राकडे एकवार अवलोकन करावें असा त्याला व्यामोह उत्पन्न झाला. पुत्रास आलिंगन द्यावें या हेतूनें तो **यशोधरेच्या** रंगमाहालाच्या दाराजवळ जाऊन आंत डोकावून पाहूं लागला; तों त्याला दिव्याच्या मंद उजेडांत **यशोधरेनें** आपल्या पुढें मूल घेतलेलें दिसलें. पुत्रास प्रेमानें आलिंगन देण्याविषयीं त्यास अत्यंत मोह झाला, तथापि तसें केल्यानें कदाचित् **यशोधरी**

जागृत होईल आणि मग आपण पुनः पाशांत सांपडूं या भीतीनें त्यानें तो मोह तसाच दाबला. पुत्राकडे प्रेमभरानें तो तसाच पाहत दारापाशीं उभा राहिला. पुत्र कलत्र इत्यादिकांच्या समागमांत राहिल्यानें भवपाश तुटणें नाहीं असा त्यानें आपल्या मनास बोध केल्यावर त्याचें त्यासच समजलें कीं, पुत्रास आलिंगन देण्याचें आपल्या मनांत आलें आहे, तेंच काय तें योग साधनास आडवें येणार आहे ; आतां याच्या ठिकाणीं रत न होतां, योग व ज्ञान यांची प्राप्ति झाल्यावर यांची भेट घेण्यास परत येणें बरें दिसतें. असा विचार करून राजवाड्याबाहेर पडण्याचा त्यानें विचार केला. हा त्याचा निश्चय स्थिरावण्याबरोबर तात्काळ मोठी संपत्ति, मोठें राज्य, मोठा अधिकार, पित्याचें वैभव, इंद्रभुवनासारखा अप्रतिम राजवाडा, एकुलताएक पुत्र, स्वर्गलोकच्या वारांगनांप्रमाणें सुंदर स्त्रिया, आणि प्रेमाच्या कलिजाप्रमाणें **यशोधरा** या सर्वांचा त्याग करून वाड्याबाहेर **कंठक** वारूस ज्या ठिकाणीं तयार करून ठेवलें होतें तेथें गेला. पुनः एकवार त्यानें प्रेमभरें राजवाड्याकडे अवलोकन केलें. तो स्मशान भूमीप्रमाणें आहे असें समजून वैरागी होण्याचा निश्चय त्यानें फिरविला नाहीं. **कंठक** शामकर्णाची पाठ थापटून तो ह्मणाला कीं, छबेल्या मी आजच्या रात्रींच वैरागी होणार आहे तर तूं मला आपलें साहाय्य दे. यजमानाचीही वाणी ऐकून **कंठकास** आल्हाद झाला आणि त्यानें मोठी खिंकाळी मारली, तरी त्या गडबडीनें शहरांत किंवा राजवाड्यांत कोणी जागे झालें नाहीं. **गौतम कंठकावर** स्वार होऊन बसला. मागच्या बाजूस चान सेवकानें **कंठकाचें** पुच्छ धरलें याप्रमाणें **गौतम** आपल्या वाड्यांतून निघाला.

**कंठक** शामकर्णही तसाच योग्य व उमदा होता. त्याची लांबी सुमारें तीन फूट असून त्याचा रंग अगदीं सफेत होता. त्याचें आयाळ फार मृदु होतें, त्याची शक्ति मोठी होती, आणि चालण्याची ढबही सुरेख असे. या गुणांमुळें **गौतमा**सारख्या भूपतीला तें वाहान चांगलें शोभे. असा **कंठक** शामकर्ण असल्यामुळें तो एके क्षणांत शहराच्या वेशीजवळ गेला. **सुद्धोधनराजानें गौतम** बाहेर जाऊं नये ह्मणून बंदोबस्ताकरितां वेशीच्या दरवाज्यांना सांखळदंडांत घातलेलीं

मोठीं मोठीं कुलपें लाविलीं होतीं. दरवाज्यांना लोखंडाच्या फळ्या बसविलेल्या होत्या. यामुळें वेशींचे दरवाजे इतके आवजड झाले होते कीं, त्यांस लावणें आणि उघडणें ह्मटलें ह्मणजे शंभर दोनशें माणसांच्या मदतीशिवाय होत नव्हतें. इतका बंदोबस्त केलेला होता, तरी **कंठकाच्या** आंगीं वेशी उडून जाण्याचें सामर्थ्य होतें. स्वर्गलोकच्या देवकृत्यानें द्वाराच्या वेशी आपोआप उघड्या झाल्या. वेशी उघड्या होण्याबरोबर **गौतम कपिलवस्तु** शहराच्या बाहेर चालता झाला.

**गौतम** आतां मात्र खचीत संसार सुखाकडे वळत नाहीं असें पाहून **मारराज*** अगदीं खवळून गेला. त्यास आपल्या लोकीं चैन पडेनासें झालें. त्यानें दिव्य देह धारण केला आणि आकाश मंडळांतून मोठ्या स्वरानें ध्वनि केला कीं, "हे **गौतमा** तूं योग साधनास जाऊं नको तेथें कांहीं सुख नाहीं. तूं आपल्या राज्यपदावर माघारा जा ह्मणजे मी तुला आजपासून सात दिवसांनीं वलयांकित पृथ्वीचें राज्य देऊन सार्वभौम पदास चढवीन. हें ऐकून **गौतम, मारराजाचा** धिःकार करून बोलला कीं, महाराज मला सात दिवसांनीं सार्वभौमपद पाहिजे आहे, पण आपण सांगतां तसलें मात्र नको. ज्ञानप्राप्ति करून घेऊन, भवाब्धींत बुडणाऱ्या जनांस उपदेशरूप नवका दाखवावी अशी माझी उमेद आहे. आपण मजला भूल पाडूं पाहत अहांत, परंतु आतां मी किमपिही तसल्या तावडींत सांपडणार नाहीं. इतका संवाद झाल्यावर **मारराज** पलीकडच्या मैदानांत जाऊन **गौतमाच्या** टपणीवर बसला. **गौतमानें कंठकास** एक टाप दिली त्या सरसा **कंठक भर.** धांव निघाला. ती रात्र पौर्णिमेची असल्या कारणानें रानांत शुभ्र चांदणें पडलेलें होतें. जिकडे तिकडे शांत व शुद्ध दशदिशा दिसत

---

* कोणेकाच्या मनांत साधुत्व मिळवावयाचें असल्यास त्याला कित्येक अडचणी येतात किंवा कामक्रोधादिकेंकरून त्याचें अंतःकरण दूषित होतें या व्यापारास माया कारण होते असें मानलें आहे. तसेंच या मारराजाचें आहे. तेव्हां माया आणि मार हीं सत्कर्मापासून भ्रष्ट करणारीं एकसारखींच होत या मायेस बुद्ध धर्मांत मार अशी संज्ञा दिली आहे. तो पुरुष आहे ह्मणून त्यास कधीं कधीं मारराज ह्मणतात.

होत्या. मध्यें मध्यें मात्र वाऱ्याची झुळूक येई तेव्हां, वृक्षाचे शेंडे अम्मळ हलल्यासारखे दिसत. काजवे झाडांवरून हिकडे तिकडे हिंडत होते. आणि भोंवतालच्या प्रांतांतील नद्यांच्या झुळझुळ वाहणाऱ्या पाण्याचा ध्वनि ऐकूं येई. अशा रमणीय पण भीति दायक देखाव्याच्या रानां तून **कंठक** वायु वेगानें चालला असतां **कपिलवस्तु** शहराविषयीं **गौ-तमाच्या** मनांत एका मागून एक कल्पना यावयास लागल्या. त्यानें तेव्हां प्रतिज्ञा केली कीं, जावत्कालपर्यंत मजमध्यें अज्ञान, क्रोध मत्सरादि विकार व विषय वांच्छा हीं वास करतील तावत्कालपर्यंत व ज्ञान संपा-दन होईपर्यंत मी पुनः या शहरीं येणार नाहीं. यांची सिद्धि झाली ह्मणजे मात्र पुनः एकवार येथें येईन. ही प्रतिज्ञा करून तो पुढें चालता झाला. सिद्धीवर त्याची सगळी दृष्टि होती ह्मणून राज्य, मुलेंबाळें, स्त्रिया, माता पितरें, अधिकार आणि संपत्ति यांस आपण सोडलें याबद्दल त्याला तिळप्राय देखील दुःख झालें नाहीं.

सुप्रभात होण्याच्या सुमारास **गौतम कौलिण्य** देशापलीकडे **आ-नोमा नदी**च्या तिरीं जाऊन उतरला. वाळवंटावर उभा राहून त्यानें आपल्या हातानें आपले लांब केस कातरले, आणि आपलीं राजकीय वस्त्रें **चाना**च्या स्वाधीन करून आपण कोणी एक पलीकडच्या तीरा-वरून वाटसरू जात होता त्याचीं फाटकी वस्त्रें विनंती करून मागून घेतलीं व त्यांनींच आपलें राजबिंडें शरीर आच्छादित केलें. **गौतम चाना**स ह्मणला कीं, बाबारे तूं आतां **कपिलवस्तूं**त जाऊन माझीं माता पितरें, स्त्रिया, गणगोत आणि सोयरे धायरे यांस माझा निरोप जाऊन कळीव कीं, मी वैरागी झालों ह्मणून तुह्मी दुःख करूं नका. कारण कीं, माझी इच्छा तृप्त व्हावी म्हणून मीं हें वैराग्य धारण केलें नाहीं, तर मनुष्याच्या मागें जरा, व्याधि आणि मृत्यु हीं तिन्ही लागलीं आहेत आणि या संसारांत दुःखच आहे ह्मणून त्यांस सत्पथ दाखविण्याकरितां मी ही वृत्ति धारण केली आहे. ही माझी इच्छा परिपूर्ण झाल्यावर व मजला ज्ञान व नीति समजल्यावर मी तुम्हांला भेटावयास येईन. **गौ-तमाच्या** तोंडचे हे शब्द ऐकतां क्षणींच **चान** दुःखानें यजमानाच्या पायांवर गडबडां लोळूं लागला. त्यानें विनंती केली कीं, महाराज मीही आपल्या सेवेकरतां आपणांबरोबर येतों. **गौतमानें** तें नाकबूल

केलें. तो त्यास बोलला कीं, बाबा तूं मजबरोबर येशील तर माझें काय झालें हें माझ्या कुटुंबांतील माणसांस समजणार नाहीं; व तेणें-करून रात्रंदिवस त्यांच्या जिवाला झुरणी लागेल. कदाचित् माझ्या वियोगाचें त्यांस दुःख झालें आणि त्यांनीं ही मजप्रमाणेंच सर्व संगपरित्याग केला तर, माझ्या **राहुल** पुत्राचें कसें होईल? ह्मणून तूं परत जा आणि त्या सर्वांचें शांतवन कर. **चानास** गहिंवर दाटून त्याच्यानें पुढें बोलवेनासें झालें. तो यजमानाची आज्ञा घेऊन निघाला. हा सगळा संवाद **कंठक शामकर्णानें** अगोदर ऐकिलाच होता. शामकर्ण मनुष्याची भाषा बोलण्यास जरी असमर्थ होता तरी त्यानें आपल्या नेत्रांत अश्रुधारा आणून दुःख प्रदर्शन केलें. अशा यजमानापासून निराळें होण्याचें **कंठकाला** फार वाईट वाटलें. **गौतमानें** **कंठकाच्या** पाठीवर हात ठेवून त्यास ह्मटलें कीं, शामकर्णा तूं माझी इमानें इतबारें चाकरी केलीस आणि मला एका रात्रींत इतक्या अंतरावर आणलेंस. शाबास तुझी. जा आतां शोक करूं नको. कांहीं दिवसांनीं तुझी व माझी भेट होईल. माझा पिताही वृद्ध झाला आहे तर त्यासही तूं असाच उपयोगीं पड. मी तुजवर आरोहण करण्यास नाहीं ह्मणून तूं मनांत खंती बाळगूं नकोस. **गौतमानें चानास** पुन्हा हांका मारून त्याच्या स्वाधीन कंठकास केलें. **चान कंठकास** घेऊन चालला. दुःखानें **कंठक** व **चान** हे उभयतां मार्गांतून स्फुंदत चालले. **गौतम** दिसत होता तों पर्यंत **कंठकास** कांहीं वाटलें नाहीं; परंतु तो दृष्टिआड होण्याबरोबर कंठकाच्या आंगास कंप सुटला व त्यानें जमीनीवर लोळण मारली. त्यानें आपलें आंगास इतकें आळेपिळे दिले कीं, त्यामुळें तत्क्षणीं त्याचें प्राणोत्क्रमण झालें. **चानानें** त्याचें मृत शरिरावर पडून शोक केला. कांहीं वेळानें **चान** सावध झाला आणि त्यानें रानांतील पुष्पें गोळा करून शामकर्णास अर्पण केलीं, आणि आपण मार्गस्थ झाला. कपिलवस्तूंत येऊन पोहोंचल्यावर लोकांनीं **गौतमा**विषयीं त्याला पुष्कळ विचारलें पण तो कोणाजवळही उलगडला नाहीं. दुसरे दिवशीं **सुद्दोधना**पुढें त्यानें **गौतमाचे** व **कंठकाचे** वस्त्रालंकार ठेवले व तो हात जोडून पुढें उभा राहिला. दुःखाचा गहिंवर येऊन त्याच्या तोंडांतून कांहीं शब्द

निघेना. **चान** आल्याचें वर्तमान ऐकून **यशोधरी** आदिकरून स्त्रिया व कुटुंबांतील सर्व लहान थोर माणसें तेथें धांवत गेलीं. **चानानें** मन घट्ट करून झालेला वृत्तांत इत्थंभूत सांगितला. तेव्हां एकच आक्रोश होऊन राजवाड्या भर चोहोंकडे दुःखाची गर्दी झाली. **सुदोधनास** तर शोकाग्निनें या काळीं दग्ध करण्यास आरंभ केला. पुष्कळ वेळ आक्रोश झाल्या नंतर **सुदोधनास** विचार झाला आणि त्यास **कौंडि-ण्यानें** केलेल्या भविष्याची आठवण झाली. तेव्हां त्यानें **यशोधरीस** पोटाशीं धरून तिची समजूत केली. **कौंडिण्याचें** भविष्य कळल्या-वर त्यांचें दुःख कांहींसें शमलें.

**गौतमानें** सभोंवार लक्षपूर्वक अवलोकन केलें तेव्हां मनुष्याच्या स्थित्यंतराविषयीं त्याला पराकाष्ठेचा पश्चाताप झाला. तो आपल्याशींच बोलावयास लागला कीं, **कपिलवस्तु** शहरांत जेव्हां माझें राजपुत्र या नात्यानें वास्तव्य होतें तेव्हां मज समागमें केवढा परिवार, केवढें सैन्य, किती दास दासी, किती तैनाती स्त्रिया आणि केवढा अवाढव्य खटा-टोप होता. त्या स्थितीचा कंटाळा येऊन संसार सोडावा असें माझ्या मनांत आलें तेव्हां मज समवेत **चान कंठक** आणि देव लोकचे प्राणी होते या **आनोमा** नदी तटाकीं मी पोहोंचण्याबरोबर देव लोकच्या प्राण्यांनीं माझा त्याग केला. कांहीं वेळ **चान** व **कंठक** हे माझे सोंगडे माझ्या बरोबर होते. आतां त्यांनीं ही मजला सोडलें तस्मात् या मानव जन्मांत किती स्थित्यंतरें होतात व किती दुःखाचे प्रसंग येतात हें सांगवत नाहीं. व्यर्थ व्यर्थ हें जीवित आहे. यापासून कांहीं सुद्धां मनुष्याच्या पारलौकिक सुखास सहाय्य होत नाहीं. हा देह किती निंद्य ह्मणून सांगावा. मलमूत्र, नाडी मज्ज्या, श्लेष्मा, मांस इत्यादि दुर्गंध पदार्थांनीं तो भरलेला आहे. त्यांत जों पर्यंत जीव आहे तों पर्यंत त्याची कायती प्रशंसा व योग्यता मानली जाते. त्यांतून जीव निघून गेला ह्मणजे त्याला कोणी सुद्धां स्पर्श करीत नाहीं. त्याचें रूपांतर क्रिमी, विष्टा किंवा भस्म यांत होतें. याचा उपयोग मृत्यु लोका खेरीज इतर ठिकाणीं अगदीं होत नाहीं. याचा संसर्ग दुःख बीज होय. याची जोपासना ठेवण्याकरतां मनुष्यांच्या ठिकाणीं आपो-आप पराधीनता येते. या पराधीनतेपासून मोचन होणें ह्मणजे केवळ

अशक्य व अत्यंत कष्ट साध्य आहे. याच्या उपसर्गानें आत्म्यास व्याधि मात्र निरर्थक लागतात. असा विचार करीत **गौतम** त्या रानांत संचार करीत चालता झाला. त्यानें थेट **राजगृह** या नांवाच्या शहराकडची वाट धरली.

# गौतमाचा योगाभ्यास.

वाटेनें जातांनां अनुप्य या नांवाची मोठी रमणीय आंबराई लागली तेथें **गौतम** कांहीं दिवस राहिला. तें स्थल एकांत होतें. ह्मणून **गौतम** सात दिवसपर्यंत सतत एका आंब्याच्या वृक्षाखालीं स्वस्थ बसून राहिला. अन्न किंवा पाणी यांस तो त्या साता दिवसांत कसा तो शिवला नाहीं. आत्मतत्वसंबंधीं विचारांत निमग्न असल्यामुळें त्यास जो आनंद झाला त्यानें त्याला क्षुधेची अथवा तृषेची पीडा झाली नाहीं. दिवसास सूर्याचें प्रखर तेज व रात्रीस कडक थंडी वारा यांजपासून त्याच्या शरिरास उपद्रव होई, पण ज्या **माहानंदाच्या** तो मागें लागला होता त्यास त्या उपद्रवाचें कांहीं वाटलें नाहीं. याप्रमाणें सात दिवसपर्यंत बसल्यानंतर **गौतम** आठवे दिवशीं संध्याकाळपर्यंत कोमल पायांनींच पांच योजनांची मजल करून **राजगृह** शहरास जाऊन पोहोंचला. **राजगृह** ही **मागध** देशाची राजधानी होती. व तेथला राजा **बिंबीसार** या नांवाचा होता. हा **बिंबिसारराजा** त्या वेळेस **गंगा नदीजवळच्या** दऱ्यांतून जितके राजे होते त्या सर्वांत बलाढ्य होता. या **राजगृह** शहराभोंवतीं पांच टेंकड्या होत्या ह्मणून शत्रूंस तेथें स्वारी करण्याचें कठीण पडे. हें स्थल असें एकांत व शुद्ध असल्यामुळें कित्येक योगी पुरुष त्याचा आश्रय करून तेथें राहत. हें स्थल योग्य आहे असें पाहून **गौतमानें** त्या ठिकाणीं **उद्रक** नांवाच्या ब्राह्मणाजवळ वस्ती केली. त्या ठिकाणीं आपला चरितार्थ त्यानें **राजगृह** शहरांत केवळ घरोघर भीक मागून केला. जेव्हां तो भिक्षेस जाई तेव्हां लोकांचे थवेचे थवे त्यास पाहाण्यास येत. कित्येक ह्मणत कीं, हा राहु असुरापासून मुक्त झालेला चंद्रच येथें आला आहे. कारण चंद्रावांचून इतका आनंददायक व तेजस्वी कोण आहे ! कोणी

दुसऱ्याच कल्पना करीत. पण हा कोण व कोठील याबद्दल कोणाचाच निश्चय होईना. लोकांनीं हें **बिंबिसारराजास** जाऊन सांगितलें. तेव्हां राजानें आपल्या खिडकींतून या तेजमय पुरुषाकडे अवलोकन केलें त्या बरोबर तो आश्चर्य भरित झाला. त्यानें आपल्या चाकरांस असा हुकूम केला कीं, हा जेव्हां शहराबाहेर जाईल तेव्हां याच्या टपणीवर असा. तो जर स्वर्ग लोकचा असला तर तो हवेंतून उडून आकाशांत जाईल, सुपर्ण असला तर पृथ्वीच्या पोटांत जाईल पण जर मानवी प्राणी असेल तर भू पृठावर वास करील व आपलें भक्ष्य भक्षण करील. **गौतमानें** एके दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें **शहरांत** भिक्षान्न गोळा केलें आणि **राजगृहा**जवळील **रत्नागिरी** नांवाच्या टेंकडीवर तो जाऊन बसला. या **राजबिंड्या** पुरुषास नेहमी मिष्टान्न भक्षण करण्याची संवय असल्यामुळें हें भिकेचें अठरा ठिकाणचें मचमचलेलें अन्न पाहून शिशारी आली. त्याच्यानें तें खाववलें नाहीं. तथापि घट्ट मन करून त्यानें तें भक्षिलें. भोजनोत्तर त्यानें आपलें मुख हस्तादि प्रक्षालन करून कटोरा धुतला आणि तो आपल्या झोळींत ठेवला तो त्या गिरीवरच तसा विचार करीत बसला. हें पाहून **बिंबीसार** राजाच्या माणसांनीं राजाला असें कळविलें कीं, तो खरोखरच मानव आहे. त्यावरून **बिंबीसार** राजानें बरोबर पालखी व सरदार घेतले आणि **गौतमास** आणण्याकरतां त्या टेंकडीवर तो गेला. **गौतमाची** कांति अवलोकन करून **बिंबीसार** राजा अगदीं चकित होऊन गेला त्यानें **गौतमास** प्रश्न केला कीं, हे मदनपुतळ्या तूं कोणच्या देशाचा रहिवाशी आहेस? **गौतमानें** उत्तर दिलें कीं महाराज मी **साख्य** लोकांपैकीं आहे. तुझें राहण्याचें ठिकाण कोणतें? त्यावर **गौतम** बोलला कीं, मी **कपिलवस्तु** येथील राहणारा आहे. पुढें **बिंबिसार** राजानें त्याचें नांव गणगोत याची चौकशी केली. **गौतम** ह्मणाला मी **साख्य** राजकुळांतील असून माझ्या बापाचें नांव **सुदोधन** असें आहे. हें ऐकून त्याची खात्री झाली कीं, आपला परम मित्र जो **सुदोधन** त्याचाच हा पुत्र असावा. हा कदाचित् घरांत कांहीं कलह झाल्यामुळें पळून आला असेल अशा संशयावर तो **गौतमास** ह्मणाला कीं; **मागध** देशाच्या अर्ध राज्याचा मी तुला **स्वामी** करतो. त्यावर

**गौतमानें** प्रत्युत्तर दिलें कीं, महाराज मीं जो सर्व संग परित्याग केला तो आपलें अर्ध राज्य संपादन करण्याकरतां नव्हे. तर मजला चार साक्षात्कार झाले व त्यामुळेंच निर्वाण सुख प्राप्त करून घेण्याची इच्छा माझ्या ठिकाणीं वाणली. याकरतां मी आपलें राज्य, संपत्ति, अधिकार, सुंदर स्त्रिया आणि सर्व ऐहिक सुख सोडून या एकांत ठिकाणीं आलों आहें. असे त्याचे निश्चयाचे व विरक्तीचे बोल ऐकून **बिंबीसार** राजा ह्मणाला कीं, बरें तर तुझी सिद्धी झाली ह्मणजे प्रथमतः या राजगृहांत उपदेश करून मग तूं पाहिजे तेथें जा. इतका संवाद झाल्यावर बिंबीसार राजा आपल्या शहरीं निघून गेला.

**गौतमानें** भिक्षान्नावर निर्वाह करण्याचा तसाच क्रम सुरू ठेवला. त्यानें **अलर** व **कुद्रक** या योग्यांची सेवा करून त्यांजपासून ध्यानधारणा विद्या संपादन केली. सात प्रकाच्या ध्यानधारणेंत पारंगता आल्यावर त्यानें आठव्या ध्यानधारणेचा धडा देण्याविषयीं त्यांची विनवणी केली; पण त्यांस देखील तें साधलें नव्हतें. याकरतां तो तेथून जो निघाला तो हल्लीं बुद्ध गयेजवळ जें देवालय आहे तेथें योगाभ्यासासाठीं गेला. योगाभ्यासासाठीं त्यास हें स्थल फारच योग्य वाटलें कारण तेथें झाडी दाट होती, शेजारील तलावांत पाणी पुष्कळ होतें आणि जवळच्या प्रदेशांतून **नैरंजन** नदी वाहत होती. इतकें असून भिक्षाटन करण्याकरतां गांव जवळ होता पण त्याचा त्या जागेस उपसर्ग नसे. या ठिकाणीं पांच शिष्य * त्यास मिळाले. त्यानें तेथें सतत सहा वर्षे पर्यंत उपोषणांचा अभ्यास चालविला. आहार कमी करतां करतां त्यानें आपलें निर्वाहाचें परिमाण एका अन्न कणावर आणून ठेवलें. तेव्हां पासून त्यानें भिक्षाटन करण्याचें सोडलें. तो एका झाडाखालीं बसला व वरून जेवढीं फळें पडतील तेवढ्यांवर मात्र तो आपलें रक्षण करूं लागला. तथापि उठून त्यानें फळ घेतलें नाहीं. बसल्या बसल्या जेवढीं सांपडत तेवढींच त्यास पुरे होत. पुढें कांहीं दिवसांनीं तो अगदींच खाईनासा झाला. येथपर्यंत मजल येऊन ठेपली तरी सुद्धां आपणांत मानसिक शांति आहे असें त्यास वाटेना.

---

* या पांच शिष्यपैकीं ज्या कौंडिण्यानें गौतमाविषयीं भविष्यकेलें होतें तो स्वतां गौतमाची सेवा करण्याकरतां शिष्यरूपानें त्याजजवळ राहिला होता.

जों जों तो ध्यानधारणा करी तों तों त्यास असें वाटे कीं; शारिरिक दुःखापेक्षां मानसिक दुःख आपणास फार होत आहे. असें होत असतां एके दिवशीं तो ध्यानांत निमग्न होत्साता देहातीत झाला व त्याचें कलेवर जमीनीवर पडलें. हें पाहून त्याच्या शिष्यवर्गास असें वाटलें कीं तो मृत झाला. पुढें कांहीं वेळानें तो सावध झाला. नंतर शिष्यांचा व त्याचा ध्यानधारणेवर पुष्कळ संवाद होऊन शिष्यांची खातरी होईना ह्मणून ते काशीवास करण्यास निघून गेले.

याप्रमाणें **बुद्धगयेच्या** आरण्यांत **गौतम** एकटाच तपश्चर्या करीत बसला. उपोषणांनीं केवळ शरीर मात्र काष्टवत् होतें पण त्या योगें ध्यानधारणा होत नाहीं यावद्दल त्यानें आपली समजूत करून घेतली, व वायु मस्तकांत कोंडून धरून आत्मा ब्रम्हांडीं न्यावा आणि त्या आनंदांत निमग्न असावें असाही त्यानें निश्चय केला. आपल्या निश्चयाप्रमाणें त्यानें लागलेंच करण्यास आरंभिलें. नासिक व मुख बंद केल्यावर वायु आंतल्या आंत गडवडून त्याला अमर्यादित वेदना झाल्या; पण एका निश्चयाला त्यानें आपल्या गांठीं बांधलें होतें ह्मणून त्या वेदना भावी अकल्पित सुखाच्या सूचक आहेत असें त्यास वाटलें. मस्तकांत व इतर शरीर भागांत वायु स्थिरावून तो अगदीं प्रेमानें घनानंदांत डोलूं लागला. अशा स्थितींत ज्या **माराराजानें** त्यास रानांत भूल पाडण्याचा प्रयत्न केला होता त्यानें त्यावर पुनरपि आपलें मायाजाल पसरलें. **माराराज** ह्मणाला **गौतमा** सावध हो. पहा हें जें तुझें शरीर नाजूक व सुवर्णमय कांतीचें होतें तें आतां कसें तेजहीन दिसत आहे !! व्यर्थ हा तूं योग करीत आहेस. यापासून तुला कशाची ही प्राप्ति होणार नाहीं. आपल्या संसारांत जा ह्मणजे तुला सर्व सुखें मिळतील. **गौतम** ह्मणाला **माराराज** मी असल्या तुमच्या गोड शब्दांवर कधींही फसावयाचा नाहीं. बुद्धि, साहस, सद्गुण आणि ज्ञान यांचा मजमध्यें वास आहे ह्मणून मला पक्कें समजलें आहे कीं, शब्द, स्पर्श, रस, रूप व गंध यांजमध्यें सुख आहे पण तें अविनाशी नाहीं याकरतां त्यांचा तिटकारा असणें हेंच चांगलें. जगांतील मानापमान व संपत्ति यांच्या पाठीमागें लागलेल्यांस काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, मोह इत्यादि रिपूंनीं सोडलें नाहीं, ही स्थिति मला अत्यंत

अनिष्ट वाटते. याकरतां ही योग सिद्धी करून अक्षय्य सुखाप्रत पावावें ही माझी उत्कट इच्छा आहे. या इच्छेकरतां प्राणोत्क्रमण झालें तरी कांहीं चिंता नाहीं. याप्रमाणें उत्तर देऊन गौतम पुन्हा ध्यानस्थ झाला. मारराजानें गौतमास भ्रष्ट करण्याकरतां अनेक उपाय करून पाहिले, पण त्याच्या दृढ निश्चयापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. गौतम व मार यांजमध्यें युद्ध सुरू झालें तेव्हां आकाशांतून तारे तुटून भू पृष्ठावर पडावयास लागले, नभ मंडळ अभ्रांनीं आच्छादित होऊन चोहोंकडे अंधःकार पडला, महासागर व डोंगर यांनीं आपलें स्थलांतर केलें, नद्या पुन्हा उगमांकडे वाहूं लागल्या, मोठमोठे वृक्ष जमीनीवर उपळून पडले, वावदळें सुटलीं, सूर्य प्रकाश मंद झाला आणि अंतराळीं अगणित शीररहित पिशाच्य धडें नाचावयास लागलीं. इतका जरी चमत्कार झाला तरी गौतमानें आपलें शुद्ध तत्व सोडलें नाहीं. तो तसाच त्या बुद्धि वृक्षाखालीं निश्चल अंतःकरणानें बसला. आणि शेवटीं महत प्रयासानें निर्वाण संपादन केलें मारराजा पराजय पावून आपल्या लोकीं गेला. ज्या बुद्धि वृक्षाखालीं गौतमानें निर्वाण संपादिलें तो बुद्ध धर्मी लोकांत अद्यापि अत्यंत पवित्र मानला आहे. अस्तु या प्रमाणें योगाभ्यास करून गौतमानें अखेरची सिद्धी मिळविली.

## [illegible] व अंतराद.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें गौतमानें मानासिक वांच्छा व मिथ्या सुख यांजवर जय मिळविल्यावर तो त्याच रात्रीं विचार तत्वांत गढला. विचार करतां करतां मागील अनंत जन्मांची त्याला आठवण झाली. त्या वेळची सर्व सुख दुःखें त्याच्या पुढें येऊन उभीं राहिलीं. हें ज्ञान त्यास रात्रीच्या पहिल्या प्रहरांत झालें. दुसऱ्या प्रहरांत त्यानें आपली दिव्य दृष्टि करून पुढील अनिष्टाविषयीं विचार केला. तिसऱ्या प्रहरांत कार्य व कारण आणि आयुर्दाय यांच्या परस्पर संबंधाचा त्यानें विचार केला. तेव्हां त्यास असें कळलें कीं, अज्ञान, दुःख व्याधि आणि मृत्यु यांनीं मानव देहास अत्यंत अपेष्टा होतात. आयुर्दायास पुष्कळ स्थितींचे अवरण घातलेलें आहे. पहिली स्थिति

अज्ञाची होय. या अज्ञानें नाशिवंत वस्तूंवर प्रेम राहून अनंत कालिक विश्रांतीचें स्थान मानवांना मिळत नाहीं. दुसरी स्थिति संसाराचा व्याप. यानें शांती व एकाग्रता हीं नष्ट होतात. तिसरी स्थिति बुद्धि होय. ही मनुष्यांत अभिमान उत्पन्न करते. आणि अभिमान सहा रिपु जागृत करतो. जगांतील सुखांचा निजध्यास भ्रमवितो. तृष्णा ही एक मोठी दुरत्यय स्थिति आहे हिच्या योगानें तृप्ति होत नाहीं. आणि शेवटची स्थिति व्याधि व मृत्यु यांनीं आयुर्दायाचा लय होतो. या प्रमाणें जगतांतील मनुष्यें भव पाशांत सांपडलीं आहेत. तस्मात् त्यांच्या तरणोपायाची योजना केली पाहिजे. चवथ्या प्रहरांत त्यास असें कळलें कीं, मी आयुर्दायाच्या स्थितींत नाहीं असेंच मानतों आहें म्हणून क्रोध तृष्णा इत्यादि मजला पीडा देत नाहींत. सर्व संशयांचा निरास झाला आहे आणि खोट्या मतांचा त्याग केला यामुळें माझी दिव्य दृष्टि झाली आहे. सगळ्या कुवांच्छा व दुष्ट हेतु यांपासून पराङ्मुख झाल्यामुळें आतां मात्र कांहीं उरलें नाहीं असें तेव्हां त्यास वाटूं लागलें. याप्रमाणें गंधर्व, यक्ष, राक्षस, सुपर्ण, नाग आणि मानव यांना पूजनीय व संभजनीय असा तो गौतम प्रभु झाला.

सूर्योदय होण्याच्या सुमारास त्याची अशी खातरी झाली कीं, मानवी स्वभाव आणि भोंवतालच्या जगाची स्थिति अतिशय दुःख मूलक झाली आहे, याला केवळ धर्माची ग्लानीच कारण होय. उपोषणें व देह झिजविणें यांनीं शरिरास कष्ट मात्र होतात पण आत्म्यास शांति व सत्गुणांचा वारा सुद्धां लागत नाहीं. मनाचें अकलन व आत्म्याची प्रीती यांनीं पाप व दुःख यांपासून मोचन होऊन अंतीं मुक्ती मिळते, मग कोणतें ही कर्म केलें नाहीं, कोणताही विधि केला नाहीं, कोणत्याही देवताप्रतिमेवर भाव ठेवला नाहीं किंवा दुसरें धर्म संबंधी कृत्य केलें नाहीं तरी कांहीं चिंता नाहीं. परंतु जन समूह अज्ञानाच्या अंधःकारांत भडक्या मारीत आहे यामुळें त्यास मुक्ती मिळत नाहीं आणि भव चक्रापासून त्याची सुटका होत नाहीं. याजबद्दल त्याजला करुणा येऊन त्यानें आपलें मत जगास, कोणताही प्रसंग आला असतां निवेदन करण्याची प्रतिज्ञा केली. कारण त्याचा अवतार जगाच्या कल्याणाकरतां होता. तो स्वतां जीवनमुक्त होता पण मनुष्य जाती-

ण्या प्रेमास्तव या जगतीतलावर अवतीर्ण होऊन मानव आयुर्दीया-संगतीं अनेक संकटें व दुःखें सोसण्याची त्याला इच्छा झाली. या इच्छे-नेंच त्यास खास वाटूं लागलें कीं, लोकांस आपली मतें मानवोत किंवा न मानवोत त्यांस खऱ्या व शुद्ध धर्माचें रहस्य सांगणें हेंच आपलें या अवताराचें इति कर्तव्य आहे.

याप्रमाणें नवीन धर्मदीक्षा स्वानुभवानें व स्वपराक्रमानें निश्चित करून, त्याचे जे योगाभ्यासाच्या वेळचे परम योग्य व ज्ञानी गुरु **अलर व उद्रक** यांजबरोबर संवाद करण्याच्या उद्देशानें तो त्या स्थला-पासून निघाला. परंतु वाटेनें जातांना ते मृत्यूच्या मुखांत सांपडले असें त्यास समजल्यावर त्यानें थेट काशी क्षेत्राची वाट धरली. तेथें त्याचे पूर्वींचे शिष्य वस्ती करून होते. काशीस जात असतां वाटेंत त्याला त्याच्या ओळखीचा **उपक** या नांवाचा एक ब्राह्मण भेटला. त्यानें त्यास विचारलें कीं **गौतमा** तुझी मुद्रा इतकी प्रेमयुक्त, तुझें रूप इतकें शांत आणि तुझ्या हृदयस्थ इतकी आनंदमयता हें कोणत्या धर्माचरणानें घडलें हें कृपा करून सांग. तेव्हां **गौतमानें** विनम्रपणें उत्तर दिलें कीं पातक अज्ञान, तृष्णा आणि मायिक सर्व पसारा यांज-पासून मी भिन्न राहिलों आहें, यास्तव मी आनंद व शांति यांच्या महा सागरांत हेलावत आहें. पुन्हा ब्राह्मणानें विचारलें कीं तूं कोठें व कशाकरतां जातोस? तो ह्मणाला मी काशीक्षेत्रीं जात आहें आणि तेथें जाण्याचा माझा हाच उद्देश आहे कीं, अंधःकार व अज्ञान यांत बुचकळ्या मारीत असलेल्या पतीत जीवांस दिव्य ज्ञान दृष्टि देऊन ता-रावें आणि मृत्युभयापासून त्यांची सोडवण करावी. पुढें ही त्या दोघांचीं प्रश्नोत्तरें झालीं त्यांत **गौतमानें** इतकेंच ह्मटलें कीं, दुष्ट वांच्छा मर्दन केल्यांवाचून ज्ञान होत नाहीं व ज्ञानावांचून निर्वाण प्राप्ति होत नाहीं. हें ऐकून ब्राह्मण कुंठित झाला आणि **गौतमास** सामोपचारें पलीकडचा रस्ता दाखवून आपण मार्गस्थ झाला. दुसरे दिवशीं सं-ध्याकाळीं तो जाऊन काशी क्षेत्रीं पोहोंचला. त्या वेळीं थंडीचा क-डाका फार पडला होता. त्याचे पूर्वींचे शिष्य काशी क्षेत्रापासून सुमारें दोन कोशांच्या अंतरावर रानांत पर्णकुटिका करून राहत होते तेथें तो गेला. **गौतम** येत आहे असें पाहून, त्यास आपला गुरु

असें मानावयाचें नाहीं असा त्यांनी संकल्प केला. तो पर्णकुटिकेंत प्रवेश करतांच त्यांनीं त्यास उंचवर्ण जन्म ह्मणून दर्भासन बसावयास दिलें. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यानंतर त्यांचा संवाद सुरू झाला. त्याचें तात्पर्य असें होतें कीं, मानवांनीं मध्यमावस्था धारण केली पाहिजे. ह्मणजे निःसत्व व्यर्थ आणि भ्रष्ट करणाऱ्या अशा सुखेच्छा यांच्या पाठीमागें या संसारांत फार लागून उपयोगी नाहीं किंवा चिरस्थाई सुखा करतां योगी लोकांप्रमाणें अत्यंतिक काया कष्टाच्या पाठीमागें लागतां उपयोगी नाहीं. मध्यमावस्था आठ प्रकारांनीं प्राप्त होते. खरा निश्चय, सत्य उदर पोषण, खरें वचन, खरें कार्य, खरी भावना खरा व्यासंग आणि प्रयत्न इत्यादि या अवस्थेची अंगें होत. या स्थितीच्या अवलंबनानें दुःख नाहींसें होतें, सत्गुण वांच्छा निपजते आणि प्रेम कारक वस्तु विरह योगें होणाऱ्या आपेष्टा नाहींशा होतात. हें जें मनला समजलें तें वेदाध्यायनानें किंवा गुरुमुखापासून समजलें असें नाहीं तर स्वानुभवानें समजलें आहे. हा संवाद चालला असतां देवगणांची आकाशांत अगदीं ठेल होऊन गेली होती. गौतमाचें भाषण त्यांना इतकें मनोहर वाटलें कीं, सर्वजण तटस्थ होत्साते श्रवण करीत बसले होते. त्यावर उभयतांची वादविवादाची सीमा झाली. ज्या कौंडिण्य मुनीनें गौतमाच्या जन्मकाळीं भविष्य केलें होतें त्यास हा त्याचा उपदेश मानवून तो अत्यानंदानें डोलूं लागला. त्याला गौतमाची मोठी धन्यता वाटली. कारण गौतम जगद्गुरु होईल तेव्हां आपण मृत्युपंथास जाऊं अशी भीति वाटून त्याला दुःख झालें होतें. तें दैवयोगें खोटें होऊन हा संधी त्याच्या नजरेस पडला. त्यास असें वाटलें कीं, आज मी पुनित झालों. त्यानें गौतमाचा उपदेश उघडपणें गृहण करून त्याप्रमाणें धर्माचार करण्याचें कबूल केलें. परंतु दुसरे जे कित्येक हटवादी होते त्यांची संशय निवृत्ति होईना ह्मणून पुष्कळ वादविवाद होऊन अंतीं तेही कौंडिण्याप्रमाणें हीं नवीं मतें मानण्यास कबूल झाले. व गौतमाची धर्मदीक्षा त्यांनीं स्वीकारली.

# गौतमाचा सामाजिक उपदेश.

काशी क्षेत्र सोडल्यावर गौतम मागध देशाच्या आरंण्यांत हिंडून जे लोक त्याजकडे जात त्यांना तो उपदेश करूं लागला. उपदेश करीत असतां तो सौम्य व गंभीर दिसे. धंदेवाईक उपदेशकाप्रमाणें त्याची वृत्ति कधींच झाली नाहीं. त्यानें शोधन केलेल्या धर्माचें तत्व गूढ नव्हतें आणि हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून जो धर्म चालत आला आहे त्यापासून तें तत्व विशेष भिन्नही नव्हतें; फक्त त्यांत कांहीं सुधारणा केलेल्या होत्या. पुरुष, स्त्रिया, उंच, नीच, विद्वान व अविद्वान या सर्वांस त्यानें अंतःकरण पूर्वक उपदेश करावा. यामुळें लोकांची त्यावर श्रद्धा बसत चालली. त्याचा पंथ मोठा होत चालला. कित्येक श्रीमान ग्रहस्थांनीं मातापितर स्त्रिया पुत्रादिकांसहवर्तमान त्याचा उपदेश गृहण केला. तो आपले नेहमी असें मत प्रतिपादन करी कीं, साधकानें संसारांत न राहतां आरंण्यांत जाऊन तप साधन करावें हें खरें आहे तथापि स्त्रिया पुत्रांत राहून संसाराचा अनुभव घेत असतांही नवीन मतांप्रमाणें आचरण करणें हाही सत्मार्ग आहे. इच्छादमन व सत्वांच्छा तत्परता यांच्या आवलंबनानें संसरांत मनुष्याची योग्यता सर्व संगपरित्याग केलेल्या मनुष्यांपेक्षां अधिक होते. नीतीच्या आचरणानें व स्वकष्टार्जित विचारानें मनुष्य अंतीं सुख पावतो व त्यास मुक्ती मिळते.

मागध देशाच्या आरंण्यांत जाऊन चार पांच महिने झाल्यावर त्यानें एके दिवशीं आपल्या शिष्य मंडळास तेथें बोलाविलें. धर्म प्रसार कोणत्या रीतीनें होईल याविषयीं विचार होत असतां गौतमानें त्यास अशी आज्ञा केली कीं, तुह्मी आतां प्रांतोप्रांतीं हिंडून लोकांस उपदेश करा. कारण जें धर्मरहस्य आपणांस समजलें आहे तें मूढ जनांस सांगणें हें आपलें कर्तव्य आहे. मजप्रमाणें तुम्हीही सदा रिपूंपासून दूर आहांत; तस्मात् हें आतां करण्यास तुम्ही पात्र झाला आहां. सुधारलेल्या धर्माचा आदि, मध्य व अंत हीं लोकांस सर्वत्र समजून सांगा. कोणी हलक्या कुलांतील आहे या सबबीवर त्यास वगळूं नका.

षड्रिपूंच्या तडाक्यांतून दुरावलीं नाहींत अशींच माणसें तुम्हांस फार आढळतील त्यांस आत्म बोध होईल असा उपदेश तुह्मीं त्यांना केला पाहिजे. हा संकेत ठरल्यावर **गौतमाचे** साठ शिष्य उपदेश करण्याकरतां बाहेर पडले. स्वतां **गौतम** मात्र **अरवली** प्रांताच्या आसमंतभागीं उपदेश करण्याकरतां ह्मणून मुद्दाम राहिला. तो बहुतेक सगळ्या वर्षभर उपदेश करीत हिंडे. मात्र पर्जन्य काळीं तो आपल्या अनुयायांस शिकविण्या करतां एका स्थलीं राहत असे. **अरवली** प्रांतांत **काश्यप** या नांवांचे तीन अग्निहोत्री ब्राम्हण राहत होते. यांची त्या ठिकाणीं वेदांत विषयांत फार ख्याति होती यास्तव त्यांजबरोबर बोलण्याकरतां पुष्कळ लोक तेथें जात असत. **गौतमानें** तेथें कधीं कधीं जावें आणि **काश्यपांबरोबर** वेदांत विषयावर वाद करावा. तीन **काश्यपांपैकीं** थोरल्यानें **गौतमाची** धर्मदीक्षा घेतली. कांहीं दिवसानीं दोघांही बंधूंनीं आपल्या शिष्यवर्गासमवेत तीच दीक्षा धारण केली. नंतर कोणे एके दिवशीं हे तिघे अग्निहोत्री **काश्यप** बंधु व **गौतम** **गयेजवळील** एका पर्वतावर बसले होते त्या वेळीं दुसऱ्या टेंकडीवर वणवा लागलेला त्यांच्या दृष्टीस पडला. त्या विषयावर त्यांचें बोलणें चाललें. **गौतम** ह्मणाला, जावत्काल पर्यंत मनुष्यें अज्ञानांत असतात तावत्काल पर्यंत त्यांना असाच वणव्याप्रमाणें उपद्रव होतो आणि ज्ञानेंद्रिय व अंतःकरण यांवर परिणाम होतो. नेत्रानें पदार्थ दिसतात व त्यायोगें अंतर्यामीं सुख किंवा दुःख होतें. यांनीं पुनरपि क्लेश किंवा आनंद उत्पन्न होतो. आणि क्रोध, जनन, व मृत्यु यांनीं अंतरंग शरीर वणव्याप्रमाणें दहन व्हावयास लागतें. पण ज्यांस आत्मज्ञान झालें आहे त्यांस हा वणवा चंदनाप्रमाणें शीतलसा भासतो.

**गौतम** या **काश्यप** बंधूंस बरोबर घेऊन **राजगृह** शहराकडे गेला. यांची **राजगृह** शहरांत चांगली माहिती होती. **बिंबीसार** राजानें त्यांचा चांगला सत्कार केला. लोकांच्या व राजाच्या देखतां **गौतमानें** **काश्यपांस** प्रश्न केला कीं, तुह्मीं अग्निहोत्र कां सोडलें? या प्रश्नाचा उद्देश समजून **काश्यपांनीं** उत्तर दिलें कीं, दर्शन, नाद, रुचि आणि वैषयिक सुख यांजमध्यें जसें कित्येकांना सुख वाटतें तसेंच देह कष्टविण्यांत कित्येकांना सुख वाटतें परंतु यांपैकीं कोणत्याही गोष्टीपासून

उपयोग नाहीं. निर्वाण स्थिति केवळ ज्ञानानें मिळण्यासारखी आहे तस्मात् अग्निहोत्र या कामीं उपयोगी पडावयाचें नाहीं असें आम्हांस अनुभवावरून समजलें आहे या करतां आम्हीं तें सोडून दिलें. नंतर सर्वांसमक्ष **गौतमानें काश्यपांचे** गुणवर्णन केलें. हें संभाषण झाल्यावर **बिंबीसार** राजानें **गौतम** धर्मदीक्षा घेतली. **काश्यप** व **बिंबीसार** यांनीं हें धर्मतत्व स्वीकारण्याबरोबर शहरांत मोठी हालचाल होऊन गेली. **यष्टिवनांत** ज्या ठिकाणीं त्याला बिऱ्हाडाकरतां राजानें गुंफा दिली होती तेथें **राजगृह** शहरांतून हजारो लोक गेले आणि त्याच्या गुंफेभोंवती त्यांनीं वेढा घातला. असें करण्यांत त्यांचा इतकाच हेतु होता कीं, **गौतम** आणखी नवें काय बोलतो आहे तें ऐकावें. त्याच दिवशीं दुपारीं **गौतम** राजवाड्यांत भोजन करण्यास गेला. राजानें त्याचा सन्मान करून आदरानें त्यास भोजन घातलें. **यष्टिवन** लांब, जाण्यायेण्यास त्रास पडेल ह्मणून **बिंबीसार** राजानें **वेणु** वनांत त्याकरतां नवी गुंफा तयार करविली. तेथें तो पुष्कळ दिवस राहून ओत प्रोत उपदेश अज्ञ जनांना करता झाला. तितक्या अवसरांत **सारीपुत्र** . या नांवाचा कोणी एक योगी **गौतमाच्या** संघांत येऊन मिसळला. याचें त्यानें फारच महत्व वाढविलें ह्मणून कित्येक जुन्या शिष्यांस त्याचें वैषम्य झालें. हें त्यास कळलें तेव्हां त्यानें शिष्यांस पापाचारणापासून दूर राहणें, सुगुण मिळविणें, व अंतःकरणाची शुद्धि करणें हीं धर्मतत्वें आहेत हें ध्यानांत वागवा असा उपदेश केला. त्याच वेळेस त्यानें संघाचें आचरण कसें असावें याविषयीं नियमन केलें. लोकांत झालेली चळवळ अंमळ स्थिरावली. **गौतमाची** शिष्य मंडळी शहरांत भिक्षा मागण्यास जात तेव्हां लोक त्यांना नाना प्रकारचे अपशद्ब बोलून त्यांचा तिरस्कारही करीत. आणि त्यास ह्मणत कीं या नव्या उपदेशानें असें सर्व लोक विरागी झाले तर सगळा देश उध्वस्त होईल व घरादारांचा नाश होऊन संसार ह्मणजे काय वस्तु आहे याचें बीज सुद्धां जगांतून नाहींसें होईल. आणि वस्तुतः पाहिलें असतां हा लोकापवाद खरा ही होता. याकरतांच **गौतमानें** संसारांत राहून सिद्धी साधावी असा उपदेश करण्याचा क्रम राखला होता. शिष्यांनीं हा लोकांचा अपवाद त्याजजवळ सां-

गितला तेव्हां त्यानें त्यास असें प्रतिपादन करावयास सांगितलें कीं, नीतीचा व सद्गुणांचा प्रसार होऊन सामाजिक स्थिति सुधारण्याकरतां आमचे सगळे प्रयत्न आहेत; लोकांनीं घरें सोडून आमच्या नादीं लागावें असें आमच्या मनांत अगदीं नाहीं. ज्यांनीं आमचा पंथ मानला आहे त्यांजवर आम्हीं शस्त्रांचा उपयोग केलेला नाहीं. केवळ सत्य सांगून त्यांचें मन वळविलें आहे.

याप्रमाणें **गौतम** खऱ्या धर्मतत्वाचा प्रसार करीत पर्यटन करीत असतां त्याजवर लोकांनीं अनेक प्रकारचीं कुभांडें उत्पन्न केलीं. कित्येक वेळां असे ही प्रसंग आले कीं, जे लोक त्याचे अनुयायी झाले तेच ब्राह्मण लोकांच्या चिथावणी वरून अद्वा तद्वा त्यास बोलत पण तें नजुमानतां त्यानें आपला क्रम शांत रीतीनें चालविला होता. या संबंधी सर्व हाकीकत **कपिलवस्तू**मध्यें त्याच्या नातेवाइकांस माहीत होती. **सुदोधनानें** त्यांजकडे असा निरोप पाठविला कीं, माझा वृद्धापकाळ झाला आहे व आतां मी केव्हां यमसदनास जाईन याचा नियम नाहीं, म्हणून मरणापूर्वीं तुला एकवार अवलोकन करावें अशी मला इच्छा झाली आहे. याकरतां एकदां तूं कसेंही करून जन्मभूमीच्या ठिकाणीं येण्याचें कर. त्या निरोपावरून बरोबर शिष्यांचा परिवार घेऊन तो **कपिलवस्तूस** जावयास निघाला. तेथें पोहोंचल्यावर चालीप्रमाणें तो शहरांत न उतरतां बाहेर एका राईंत उतरला. **गौतम** आला ही खबर समजण्याबरोबर त्याचा बाप, चुलते वगैरे सर्व माणसें त्यास पाहवयास गेलीं. त्याचा तो वेष व ती वृत्ति पाहून सर्वांच्या डोळ्यांतून आश्रुधारा वाहूं लागल्या शेवटीं निराश होऊन तीं मनुष्यें राजवाड्यांत परत गेलीं. दुसरे दिवशीं **गौतम** कटोरा घेऊन आपल्या शिष्यांसहवर्तमान शहरांत भिक्षाटन करावयास निघाला. तो रस्तोरस्तीं भिक्षा मागत आहे असें राजास समजलें तेव्हां तो धांवत धांवत ज्या ठिकाणीं **गौतम** भिक्षा मागत चालला होता तेथें गेला. व **गौतमा**कडे अत्यंत दीन मुद्रेनें अवलोकन करून म्हणाला कीं, बाळा तूं भीक कां मागतोस? तुझा इतक्या साधूंस आमच्यानें अन्न पुरवावयाचें नाहीं असें तुला वाटतें काय? त्यानें बापाच्या पायांवर मस्तक ठेवून म्हटलें कीं महाराज आमची हीच दीक्षा आहे. तूं म्हणतोस हें कदाचित खरें असेल, पण आपण वीरांच्या कुळांत जन्म

घेतलेला आहे व आपणांपैकीं एकानें ही आजपावेतों भिक्षेवर निर्वाह केलेला नाहीं आणि तूंच असा कसा कुलांगार झालास कोण जाणे! यावर गौतम म्हणाला कीं, आपण व आपलें कूळ शूर राजांपासून उत्पन्न झालें असेल, पण माझा जन्म बुद्धांपासून झालेला आहे व त्याप्रमाणें त्यांनीं भिक्षा मागितली त्या प्रमाणें मीही मागत आहें. महाराज दुसरें असें आहे कीं, एखादा पुत्र देशाटनास गेल्यावर त्याला द्रव्य सांपडल्यास त्यांतील अमोलिक रत्नें त्यानें आपल्या पित्यास नजर करावीं या न्यायानें मी आपणास नजराणा करीत आहें याजकडे आपलें अवधान असावें. तो नजराणा हाच कीं, सदाचरणानें वागा, पापातीत व्हा, जगांतील इतिकर्तव्यता उमजा म्हणजे परमार्थ साधेल व इहलोकीं आणि परलोकीं अनिर्वाच्य सुखातें पावाल. सुद्दोधनानें यावर उत्तर न देतां त्याच्या हातचा कटोरा हिसकून त्याला राजवाड्यांत नेलें. वाड्यांत जाण्याबरोबर चाकर माणसें, मुलें बाळें, आप्तवर्ग, इष्टमित्र इत्यादिकांची त्याच्याभोंवतीं एकच गर्दी झाली. पण यशोधरी मात्र गेली नाहीं. ती आली नाहीं हें त्याच्या लक्षांत होतें. त्याजभोंवती जमलेल्या मंडळीबरोबर कांहीं वेळ बोलून तो यशोधरीच्या माहालांत गेला. त्याच्या बरोबर दोन शिष्य होतेच त्यांस त्यानें असें सांगून ठेवलें होतें कीं, तिनें प्रेमानें माझ्या गळ्यास मिठी मारल्यास तुम्ही कांहीं आडवे येऊं नका. यशोधरीनें आपला पति पीत वस्त्रें परिधान केलेला व दाढी मिशा डोई बोडलेला पाहून जमीनीवर त्याच्या पायांशीं लोळण मारली आणि स्फुंद स्फुंदून ती शोक करूं लागली. परंतु संसार सुखांस आतां मी अंतरल्यें असा विचार करून ती उठून उभी राहिली आणि लाजून एकीकडे सरली. तूं गेल्यापासून यशोधरी अगदीं झुरणीस लागत चालली, व ती एक वेळ जेऊन मृदु शय्येवर न निजतां केवळ पांढऱ्या घोंगडीवर निजते असें सुद्दोधनानें गौतमास कळविलें. त्यानें आपली कामवांच्छा जिंकली होती म्हणून त्यास या मोहाचें भय वाटलें नाहीं. त्यानें तिला उलटा उपदेश करून पूर्व जन्मीं तूं अशीच योगी होतीस असें कथन केलें. तेव्हां तिला ही उपरती होऊन तिनें वैराग्य घेतलें. असें झाल्यावर गौतम पुन्हा आपल्या ठिकाणीं गेला. या गोष्टीस महिना पंधरा दिवस

लोटल्यावर **यशोधरीनें** **राहुलास** सांगितलें कीं, तूं आपल्या पित्याजवळ जाऊन त्याजपाशीं आपल्यास राज्यपद माग. **राहुल** **सुदोधनासच** आपला पिता असें मानी व आपला खरा पिता कोणता हें त्यास माहीत नव्हतें. **राहुल** चकित होऊन आपल्या मातेस म्हणूं लागला कीं, माझा पिता कोण हें तूं मला सांग. तेव्हां **यशोधरीनें** खिडकींतून आपल्यापतीकडे बोट दाखवून म्हटलें कीं, हा वैरागी तुझा पिता होय; तूं त्याजजवळ जाऊन हट्ट घे म्हणजे तो तुझे कोडें पुरवील. मातोश्रीच्या आज्ञेप्रमाणें **राहुल** त्याकडे गेला व त्यानें मागणें केलें. तो नुकताच भोजन करून उठला होता व निग्रोध अरण्यांत जावयास निघाला होता. या मागणीवर कांहीं न बोलतां तो पुढें चालता झाला. **राहुल** ही तसाच त्याच्या मागें ती मागणी करीत चालला. निग्रोध अरण्यांत पोहोंल्यावर त्याजकडे वळून सद्गदित अंतः करणानें त्यानें भाषण केलें कीं, मुला तूं किती अज्ञानी आहेस म्हणून तुला सांगावें ! ! जें तूं राज्यपद मागत आहेस तें नाशिवंत व अशाश्वत आहे. यापेक्षां मजपाशीं अत्युत्तम **बुद्धि** वृक्षाखालीं संपादिलेलें राज्यपद आहे तें मी तुला देतों. तें राज्यपद आत्म तत्वज्ञान हें होय. त्यानें आपल्या पुत्रास नव्या धर्माची दीक्षा दिली. हें **सुदोधनास** कळलें तेव्हां त्यास फारच दुःख झालें. कारण **गौतमाचा** सापत्न एक बंधु होता तोही असाच विरक्त होऊन गेला होता. एक नातू मात्र उरला तोही याप्रमाणें योगसाधनाच्या मागें लागला. कांहीं काळानें **गौतम** पुन्हा **राजगृहा**कडे निघून गेला.

वाटेनें जातांना तो पुन्हा **अनुप्य** आंबराईंत उतरला. त्या ठिकाणीं आप्तवर्ग व **कौलिण्या**मधील सोयरे धायरे यांस त्यानें धर्मदीक्षा दिली. त्यांपैकीं **आनंद, देवदत्त, उपाली** आणि **अनिरुद्ध** हे मुख्य होते. पुढें **आनंद** हा त्याचा पट्ट शिष्य होऊन गेला. **उपाली** हा जातीनें नापिक होता. तथापि त्याची बुद्धि विशाल असल्यानें तो मोठा ज्ञानी पुरुष झाला. **राजगृहांत** एक संवत्सर राहून **अनाथपिंडिका** या नांवाच्या श्रीमान व्यापारानें **गौतमास** **श्रवस्तीकडे** बोलाविलें ह्मणून तो तिकडे चालता झाला. या ठिकाणीं **जातवन** मठांत लोकांस

त्यानें पुष्कळच उपदेश केला. त्यानें सतत वीस वर्षेंपर्यंत उपदेश केला, त्याची परिमालिका खालीं लिहिल्याप्रमाणें:—

**वर्ष पहिलें**—योगाभ्यास पूर्ण झाल्यावर त्यानें **काशी** क्षेत्रीं एक संवत्सर उपदेश केला.

**वर्ष दुसरें व तिसरें—राजगृहामध्यें** त्यानें उपदेश केला. ह्या वर्षीं त्याच्या उपदेशाचा क्रम राजगृहामध्यें चालला असतां एक चमत्कारिक गोष्ट घडून आली, ती अशी. **केशागौतमी** या नांवाची एका सरदाराची बायको होती. तिला लग्न झाल्यापासून पुष्कळ दिवस पावेतों मूल झालें नव्हतें; परंतु दैवयोगानें तिला मूल झालें. तें खेळकर होऊन चालतें बोलतें झालें नाहीं तोंच तें मरण पावलें. त्यामुळें तिला अतिशय दुःख झालें. त्या मुलाचें शव घेऊन **केशागौतमी**, कोणास कांहीं औषध माहीत असलें तर सांगा, असें तोंडानें ह्मणत रस्त्यानें चालली. तिला वाटेंत **गौतमाचा** एक शिष्य भेटला, त्यालाही तिनें तसेंच विचारलें. शिष्यानें उत्तर दिलें कीं, मला औषध माहीत नाहीं; पण आमचे गुरुजी **गौतम** यांजकडे तुह्मी जाल तर ते तुम्हास रामबाण औषध सांगतील. त्यावरून **केशागौतमी** तिकडे गेली. **गौतमानें** तिला बाप, लेंक, आई, मूल, चाकर अथवा कोणतेंही माणूस मेलें नाहीं, अशा घरांतून थोड्याशा मोहऱ्या आणावयास सांगितल्या. हें ऐकून **केशागौतमी** गांवांत मोहऱ्यांचा शोध करीत चालली. एके घरीं जाऊन तिनें मोहऱ्या मागितल्या त्या तिला त्या घरांतील माणसांनीं दिल्या. त्यावर तिनें विचारलें कीं, कोणी तुमच्या घरांत मेलें तर नाहींना? हा प्रश्न ऐकून त्या घरांतील माणसें चकित झालीं आणि त्यांनीं तीस म्हटलें कीं, आहो बाई हें तुह्मी काय विचारतां? मेलेलीं व मरणारीं मनुष्येंच फार असतात आणि जगणारीं व जगलेलीं थोडीं असतात. हें ऐकून **केशागौतमी** निराश होऊन दुसऱ्या घरीं शोधार्थ गेली. तेथेंही तसेंच झालें. या प्रमाणें शोध करतां करतां तिला कोठेंही मोहऱ्या मिळाल्या नाहींत. तेव्हां तिची समजूत झाली. मग तिनें तें मुलाचें शव रानांत टाकलें व आपण **गौतमाकडे** गेली. तिला पाहून **गौतम** म्हणाला कीं, बाई मोहऱ्या आणल्या काय? यावर कांहीं एक न बोलतां तिनें **गौतमाच्या**

पायांवर मस्तक ठेवून म्हटलें कीं, महाराज मी अज्ञानी आहें, मला उपदेश करून तारा. या विनंतीवरून **गौतमानें** तिला सदुपदेश केला कीं, जगांतील सर्व माणसांस मृत्यूची स्थिति निश्चयेंकरून आहे. मृत्यूपासून कोणीही सुटका पावत नाहीं. याकरतां निर्वाण प्राप्त करून घेणें इष्ट होय. या उपदेशानें तिला उपरती होऊन ती **गौतमाची** धर्म भगिनी झाली. तिनें आपलें पुढचें सगळें आयुष्य धर्माचरणांत व सन्मार्गांत घालविलें.

**वर्ष चौथें—महावन** येथें **आगासेन** या नांवाच्या कोल्हाट्यास धर्मदीक्षा देऊन, **रोहिणी** नदीच्या पाण्यावरून **साख्य** व **कौलिण्य** लोकांत कलह माजला होता तो शांत करण्याकरतां तो **कापिलवस्तू**कडे गेला. त्या ठिकाणीं त्यानें एक संवत्सर उपदेश केला.

**वर्ष पांचवें**—आपला बाप **सुदोधन** राजा अगदीं अजारी आहे हें त्यास समजलें. याकरतां तो **कापिलवस्तूंत** आणखी गेला, बाप वारल्यावर तेथें त्याचें उत्तरकार्य आटपून व आपल्या नातेवाइकांची समजूत घालून महावनांतील **कुतुगार** विहारांत गेला. तेथें त्याची सापत्न माता, **यशोधरी** व **साख्य** आणि **कौलिण्य** घराण्यांतील स्त्रिया गेल्या. त्यांस दीक्षा देऊन तो **प्रयागा**जवळील **मकुल** पर्वतावर गेला.

**वर्ष साहवें—मकुल** पर्वतावर एक पावसाळा घालवून तो **राजगृहा**कडे गेला. तेथें **क्षेमाबाई, बिंबीसार** राजाची बायको, इनें धर्मदीक्षा घेतली. त्याची आई तो जन्मास आल्यावर सातवें दिवशीं मरण पावली होती, तिला उपदेश करण्याकरतां अपूर्व चमत्काराच्या योगें तो **स्वर्गलोकीं** गेला. तेथून तो **श्रवस्ती**कडे गेला.

**वर्ष सातवें—ज्ञातवन विहारां**त उपदेश करीत असतां ब्राम्हण लोकांच्या फिसादीनें **सिञ्च** या नांवाच्या रूपवान स्त्रियेनें त्याजवर व्यभिचाराचें तुफान घेतलें; पण तिची ती लबाडी पुढें उघडकीस आली.

**वर्ष आठवें—नकुळा**च्या मातापितरांस त्यानें धर्मदीक्षा दिली.

**वर्ष नववें**—शिष्य मंडळींत तंटा उत्पन्न झाला ह्मणून त्यानें समेट घालण्याविषयीं बरीच खटपट केली; पण त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं असें पाहून तो **आनंदास** घेऊन, परम दुःखानें वनांत गेला.

**वर्ष दहावें**—शेतकरी व अडाणी जातीचे लोक त्यास शरण गेल्यावरून त्यानें त्यांस दीक्षा दिली.

**वर्ष अकरावें**—**राजगृह** शहरांत पुन्हा तो गेला. तेथें **भारद्वाज** श्रीमान् ब्राह्मणास त्यानें दीक्षा देऊन पुण्यमार्गास लावलें. ही कथा फारच मनोरंजक आहे. **गौतम** एके दिवशीं शहरांत भिक्षा मागत असतां **भारद्वाज** या नांवाच्या श्रीमान् ब्राह्मणाच्या शेतावर तो गेला. तेथें कापणीचें काम लागलें होतें. **गौतमास** पाहून त्याच्या गड्या माणसांनीं त्याचा आदर सत्कार केला हें पाहून **भारद्वाजास** राग आला. **भारद्वाज** त्यास उर्मटपणें बोलला कीं, आह्मी मेहनत मशागत करून आपला उदरनिर्वाह करतों. तूं ही आमच्याप्रमाणें मेहेनत करून आपलें पोषण करीत जा. लोकांवर भार घालण्यांत काय हांसल आहे? हें ऐकून **गौतम** ह्मणाला मीही मेहेनत करूनच आपलें पोषण करतों. तूं ह्मणतोस पण तसें कांहीं दिसत नाहीं. तुझें गुरूं ढोर, नांगर आणि वेणें हीं कोठें आहेत? विश्वास हें माझें वेणें, ज्ञान आणि मितावस्था हे माझ्या नांगराचे फाळ, सत्कृत्यें हा पर्जन्य आणि उत्सुकता व तत्परता हे माझे दोन बैल. यांनीं मी आपल्या शेतकीचें काम करतों. या शेतकीचें फळ निर्वाण प्राप्ति हें होय. आणि अशा मेहेनतीनें दुःखाचें परिमार्जन होतें. हे **गौतमाच्या** तोंडचे शब्द ऐकून **भारद्वाजास** उपरती झाली आणि तो लागलाच त्याजबरोबर शिष्य होऊन गेला.

**वर्ष बारावें**—त्यानें **कोसाळ** प्रांतांत उपदेश केला.

**वर्ष तेरावें**—आपल्या **राहुल** पुत्रास उपदेश करून तो **श्रवस्तीस** गेला.

**वर्ष चौदावें**—**जातवन विहारांत** राहुलास त्यानें स्थापिलें.

**वर्ष पंधरावें**—**सुदोधनाच्या** मागून **भद्र** हा **साख्य** लोकांचा राजा झाला. त्याच्या मागून **माहानामा** राजा झाला त्याला त्यानें उपदेश केला. **कौलिण्य** लोकांचा राजा **सुप्रबुद्ध** यानें **गौतमाची** भर सभेंत निंदा केली ह्मणून पृथ्वीनें त्यास भक्षण करून टाकलें. नंतर त्यानें **जातवन विहारांत** धर्म या विषयावर अत्यंत उच्छुकतेनें व्याख्यान दिलें.

**वर्ष सोळावें—आळवी** येथें एक राक्षस त्या प्रांतांतील मुलें खाण्यास सोकावला होता त्यास त्यानें उपदेश करून चांगल्या गतीस लावलें.

**वर्ष सतरावें—राजगृह** येथें **श्रीमती** ह्मणून कोणी एक मोठा सरदार होता तो मरण पावला त्या प्रसंगीं त्यानें उपदेशपर भाषण केलें.

**वर्ष आठरावें—श्रवस्ती** येथें एका कोष्ट्याकडून अकस्मिक आपल्या कन्येचा खून झाला होता त्याचें त्यानें शांतवन केलें.

**वर्ष एकुणिसावें—वेणुवन विहारांत** वस्ती करून त्यानें सर्व **मागधदेशभर** उपदेश केला. एका प्रसंगीं पारध्यानें एका हरिणास सांपळ्यांत पकडलेलें त्यानें पाहिलें, तें त्यानें सोडून दिलें. नंतर तो एका वृक्षाखालीं समाधी लावून बसला. पारध्यास राग येऊन तो त्याला तीर मारणार इतक्यांत त्याचे हातपाय आंखडून तो लुळाखुळा होऊन पडला. **गौतमानें** पारध्यास कुटुंबासह दीक्षा देऊन पावन करून घेतलें.

**वर्ष विसावें—अंगुलियाल** ह्मणून कोणी एक पटाईत चोर होता त्यास त्यानें उपदेश करून ताळ्यावर आणलें.

**गौतमानें** मागें वर्णन केल्याप्रमाणें आपला देह केवळ लोकांना उपदेश व ज्ञान दान करण्यांत झिजविला. सामाजिक उपदेश करीत असतां अनेक चमत्कार घडले, त्याच्या शिष्य वर्गांत कलह माजले आणि जेथें जेथें तो गेला तेथें तेथें धर्म संबंधी वादविवाद व भिन्न मतें उत्पन्न झालीं. तथापि मूढ जनांस भव चक्रापासून पराकाष्टेचें दुःख होत आहे हें जाणून त्यानें आपल्या जीवाचा अटाहास्य करावयास सोडला नाहीं. एके वेळीं असें घडून आलें कीं, **विंबीसार** राजाचा पुत्र **अजात शत्रु** यानें **गौतमाकरतां राजगृह** शहरांत एक घर बांधून दिलें होतें, त्यांत तो येऊन राहिला असतां पावसाळ्यांत सांवत्सरिक उपदेश करण्याकरतां **वेणुवन** विहारांत गेला होता. तेव्हां **देवदत्तानें** त्याची विनंती केली कीं, अनुयायी आपल्या कायेस अधिक कष्ट देतील असा एखादा आपण **धर्म** पंथ **स्थापन** करा. पण ही विनंती **गौतमानें** मान्य केली नाहीं. यावरून **देवदत्ताच्या** मनांत त्याविषयीं वांकडे आलें. नंतर **देवदत्ताच्या** मसलतीनें **अजात शत्रु** आपला

पिता **बिंबीसार** यास ठार मारता झाला. **बिंबीसार** राजा मेल्यानंतर कदाचित आपणास फायदा होईल असें वाटल्यावरून **देवदत्तानें** हें कृत्य करविलें. **गौतमाचा** पूर्ण शिष्य व पुरस्कर्ता **बिंबीसार** राजा आपल्या पुत्राच्या हातून मारला गेल्यावर त्यास सर्व प्रकारें अडचणीच येऊं लागल्या. **देवदत्तानें गौतमाचा** घात करण्याची तीनदां मसलत केली पण तो त्या कामीं फसला. अशा रीतीनें आपला मतलब साधावयाचा नाहीं या साठीं **देवदत्त वेणुवनांत** कपटानें गेला. **गौतमाचा** व त्याचा धर्मानुयायी लोकांच्या वर्तनाविषयीं पुष्कळ संवाद झाला. **देवदत्ताचें** असें ह्मणणें होतें कीं, धर्माची दीक्षा घेतल्यावर अनुयायांनीं शहर किंवा गांव यांशेजारी न राहतां रानांत उघड्यावर रहावें, अंगावर वस्त्रें घ्यावयाचीं तीं फाटकीं तुटकीं असावीं, उदर निर्वाह करणें तो निमंत्रणावर अथवा लोकांनीं विहारांत पाठविलेल्या अन्नावर न करतां दारोदार भिक्षा मागून करावा आणि मांसाहार करूं नये. **गौतमाचें** ह्मणणें असें होतें कीं, याप्रमाणें वर्तनाची ज्यांची इच्छा असेल त्यांना प्रत्यवाय नाहीं; परंतु याप्रमाणें वर्तन झालेंच पाहिजे असें नाहीं. कारण कीं, तरूण व नाजूक मनुष्यास असलें दुर्घट वर्तन होणें कठीण आहे. मांसाहाराविषयीं म्हटलें तर ज्या देशांत जी आहाराविषयीं पद्धत आहे तीच कायम ठेवल्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र इतकेंच कीं, क्षुधाशमनार्थ केवळ आहार घ्यावयाचा अशी बळकट इच्छा असली पाहिजे. वृक्षाखालीं किंवा घरांत बसून, फाटकीं किंवा धडकीं वस्त्रें परिधान करून आणि मांसाहारावर पोषण करून किंवा न करून आत्म्याची शुद्धि व पवित्रता मिळविणें हें मनुष्याच्या स्वाधीनचें आहे. घर, **वस्त्रें** आणि आहार हीं त्यांला आडवीं येत नाहींत. सर्व साधारण एकच नियम करणें निर्वाण प्राप्तीस हरकत करणारें आहे. एतावता मुख्य बीज मानलें ह्मणजे झालें. यावर **देवदत्त** कुंठित होऊन आपल्या विहारांत गेला आणि तेथें त्यानें आपल्या मताप्रमाणें एक धर्म पंथ स्थापला. त्या पंथाला **अजात शत्रूचें** पूर्णपणें अंग होतें. काल गतीनें तो पंथ ही उत्तरोत्तर बलाढ्य झाला. **अजात शत्रूनें श्रवस्ती** हें बुद्ध धर्माचें पवित्र स्थान वसवून **कापिलवस्तूचा** नाश करून टाकला.

# गौतमाचा मृत्यु व त्याची योग्यता.

**श्रवस्ती** येथें **जातवन** विहारांत सांवत्सरिक उपदेश क्रम संपवून **राजगृहा**कडील ज्या पांच टेंकड्या पूर्वी सांगितल्या आहेत त्यांपैकीं उंच टेंकडीवर **गौतम** कांहीं वेळ पर्यंत एकांत वास करण्याकरतां गेला होता. अशा वेळीं **अजात शत्रूनें साख्यां**पैकीं **वाजन** लोकांवर स्वारी करण्याकरतां **मागध** देशासमोरील **गंगा** नदीच्या उत्तर किनाऱ्याकडील प्रदेश आपल्या कबजांत घेतला होता. **वाजन साख्य** मोठ्या फिकीरींत आहेत असें पाहून त्यास त्यानें असें सांगितलें कीं जावत्काल पावतों तुह्मी आपल्या जुन्या चालींस अनुसरून राहाल तों पर्यंत तुह्मी पारतंत्र्यांत जाणार नाहीं. आणि त्याच वेळीं त्यानें तेथील स्वानुयायी त्याच कामाकरतां एके ठिकाणीं गोळा केले होते त्यांसही त्यानें हेंच आग्रहपूर्वक कळविलें. जातांना त्यानें हाच उपदेश केला कीं, सर्वांनीं एकमतानें व एक धर्माचरणानें वागावें ह्मणजे **अजात शत्रूचें** कांहीं चालणार नाहीं. एवढेंच नव्हे तर कदाचित प्रसंग विशेषीं अजात शत्रु हा **देवदत्ता**चा मार्ग आवलंबन करणारा आहे त्याचें त्यासच तें वाईट वाटून तो माझ्या उपदेशानुरूप वागण्यास सिद्ध होईल. असें झालें ह्मणजे अर्थांतच त्यापासून कोणास पीडा व ताप हीं होणार नाहींत. नंतर तो **गंगानदी** उतरून **आंबापाली** येथें गेला. **आंबापाली**च्या आलीकडे **वाजन साख्यांस** भीति दाखविण्याकरतां **अजात शत्रूनें** **पाटणा** शहरानजवळ एक मोठा किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें होतें. हें **पाटणा** शहर उत्तरोत्तर इतकें महत्वाच्या संबंधानें वाढत गेलें कीं, **मागध** देशाचें तें एक मोठें राजधानी शहरच होऊन गेलें. **आंबापा-लीस** गेल्यावर **गौतमास** तेथील एका वड्या सरदारानें आश्रय दिला हें पाहून **विरोधी** लोकांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें. पण **गौतमा**च्या सोज्वल उपदेशानें तेथें ह्मणण्यासारखा तंटा झाला नाहीं. मग तो **कामकास** गेला. तेथें सांवत्सरिक उपदेश क्रम सुरू असतां त्याला हैराण गतीचें दुखणें लागलें. त्यानें आपल्या शिष्य मंडळीजवळ मन उघडून सांगितलें कीं माझा आतां **अंतकाल** समीप आला आहे.

या दुखण्यांतून मी वांचणार नाहीं. तरी तसाच दुखण्यांत असतां तो **वैशाळींत** गेला. तेथील स्वधर्म दीक्षितांस बोलावून आणून मी सांगितल्याप्रमाणें आचरण ठेवा असें त्यानें सांगितलें. तेथून **पवन** येथें गेला. त्या ठिकाणीं गुरूजींचा सत्कार करण्याकरतां **चंद** या नांवाच्या सोनारानें उत्तम प्रकारचा भात करून आणला होता तो भक्षण केल्यावर त्यास बराच अराम वाटला. त्याच दिवशीं दोनप्रहरीं तो **कुशी** नगराकडे जाण्यास निघाला. हें कुशीनगर **कपिलवस्तूच्या** पूर्व दिशेस सुमारें चाळीस कोशांवर आहे. या दोन शहरांमधून मधो- मध **कुकुष्टा** नदी वाहत आहे. या नदीच्या कांठीं येऊन पोहोंच- ल्यावर त्याला तृषेनें व्याप्त केलें. त्यानें आनंदास थोडेसें पाणी पिण्यास आणून देण्यास सांगितलें. आनंदानें तावडतोब पाणी आणून दिलें तें प्यायल्यावर त्याच्या आंगांत जरा शक्ति आली. त्यानें **कुकुष्टा** नदींत स्नान केले. तेथें पुष्कळ वेळ विश्रांति घेतल्यावर तो सायंका- ळच्या सुमारास **कुशी नगराच्या** वेशी बाहेर एका राईंत येऊन दाखल झाला. तेथें पांच दिवस त्याची प्रकृती अमळ बरी होती ह्मणून त्यानें आपलें उपदेशाचें काम चालविलें. परंतु असा योग्य, ज्ञानी, पुर- स्कर्ता आणि शुद्ध अंतःकरणाचा धर्मोपदेशक मृत्यूच्या पाशांत सांपड- ण्याचा काळ जवळ आला होता ह्मणून त्याची तेथें प्रकृती विलक्षण रीतीची बिघडली. आतां आपलें श्वासोश्वास एका एकीं नाहींसे होणार असें वाटून जमलेल्या लोकांस व शिष्यांस अखेरचा एकवार त्यानें अत्यंत मोहक व उपरती होणारा उपदेश केला. त्याचें तात्पर्य असें होतें कीं, ईश्वर व कोट्यावधी मनुष्य जीव यांचें परस्पर नातें कसें आहे व तें कोणत्या उपायांनीं चांगल्या पंथास लागेल याचा विचार करून ज्या धर्माचा मी प्रसार केला तो धर्म चिरायु व सुखावह होण्या- करतां सर्वांनीं एकत्रपणें त्याची थोरवी मानली पाहिजे, इतरांना तो सांगितला पाहिजे आणि त्याविषयीं रात्रंदिवस विचार केला पाहिजे. आहो शिष्यांनो मी आतां तुह्मांमध्यें नाहीं. मी लौकरच परलोकवासी होणार आहें. जन्मास येऊन जें करावयाचें होतें तें मीं केलें. आतां तुम्हीं मात्र पवित्र व विचारवंत व्हा. आपल्या आत्म्याच्या कल्या- णाविषयीं जपा. माझ्या उपदेशाप्रमाणें तुम्हीं वर्तणूक केल्यास हा घोर

व दुस्तर भवसागर सहज पार तरून जाल आणि तुमच्या दुःखाचा शेवट होईल. जे मुमुक्षु आहेत त्यांनीं अंतःकरण शुद्धि केली पाहिजे. बाह्यात्कारी विधींवर अवलंबून राहतां कामा नये. अजरामर वस्तु या जगांत कोणतीच नाहीं. सर्व वस्तूंचा नाश होणारा आहे. एक सुख म्हटलें म्हणजे निर्वाण स्थितींत आहे तेथें कशाचीविवंचना नाहीं किंवा क्लेश ही नाहींत. तर असें उत्तम स्थान मिळविण्याविषयीं मी सांगितल्या रीतीनें तुम्ही सर्वजण मनापासून झटा. यांत तुमचें फार कल्याण आहे. पुढें त्याच्यानें बोलवेना ह्मणून थोडा वेळ तो स्तब्ध राहिला.

इतक्या अवसरांत त्याला **चंदसोनाराची** आठवण झाली. त्यानें **आनंदाकडे** वळून ह्मटलें कीं, जें तूं भक्षण करतोस तेंच त्वां अन्न मला दिलेंस याबद्दल तुझें पुढच्या जन्मीं मोठें सार्थक होईल व तूं आपल्या मनांत माझ्या विरहाची खंती करूं नकोस, असा त्याला माझा निरोप सांगून त्याचें शांतवन कर. मी मेल्यावर माझ्या प्रेताचें काय करावयाचें व उत्तर कार्य कोणत्या रीतीनें करावयाचें आणि माझ्या मागें शिष्यांनीं स्वधर्मी स्त्रियांशीं कोणत्या प्रकानें वागावयाचें याबद्दल **गौतमाचें** व आनंदाचें पुष्कळ बोलणें झालें..

याप्रमाणें बोलणें संपल्यावर आनंद अगदीं खचून गेला. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. त्याला जो उमाळा आला त्या सरसें रडें कोसळलें. तो म्हणाला मी अद्यापि पूर्णतेस नाहीं आलों तोंच गुरूजी टाकून चालले. **गौतमानें आनंदाचें** मुख कुरवाळून म्हटलें कीं, बाबारे निर्वाणाची आस्था धर. म्यां तुला सांगावें असें नाहीं. या जगांतला संबंध असाच सत्वर लयास जाणारा आहे हें तूं माझ्या सहवासानें समजतोस. अरे **आनंदा** असा शोक कां करतोस? तूं आपल्याला त्रास करून घेऊं नको. जी वस्तु निर्माण झाली तिचा नाश झालाच पाहिजे. जी वस्तु अनंतकाळपर्यंत राहील अशी निर्वाणावांचून दुसरी दशा नाहीं. तुझा व माझा पुष्कळ दिवसांचा सहवास आहे या योगें तुजमध्यें विचारशीलता व दयार्द्रता वास करावयास लागल्या आहेत. तेव्हां तूं ही असाच अज्ञान व आयुष्य यां-

पासून कधीं तरी मोकळा होशील. दुसऱ्या शिष्यांकडे वळून त्याला **आनंदा**च्या आज्ञेंत तत्पर असण्याविषयीं त्यानें आज्ञा दिली.

अपराह्न झाल्यावर **कुशी** नगरचा **सुभद्र** कोणी एक ब्राह्मण तत्त्ववेत्ता, **गौतमा**कडे कांहीं प्रश्न विचारावयास गेला. परंतु या विषयाचें बोलणें कदाचित् लांबून गुरुमहाराजास त्रास होईल अशी भीति वाटून **आनंदानें सुभद्रा**स पुढें जाऊं दिलें नाहीं. हें त्याचें बोलणें **गौतम** ऐकत होता. त्या **सुभद्र** ब्राह्मणास **गौतमानें पुढें** बोलावलें. व **त्याजशीं** तो बोलावयास लागला. **सुभद्र** ह्मणाला कीं, महाराज तुह्मापूर्वीं असेच सहा बुद्ध उपदेशक होऊन गेले, ते असें ह्मणत कीं, वस्तुमय सृष्टीचें ज्ञान आह्मांस आहे तर खरोखर वस्तुमय सृष्टीची त्यांना कांहीं थोडीशी माहिती होती किंवा अगदींच नव्हती हें कसें काय आहे ? **गौतम** बोलला कीं, पहा मजवर तर मृत्यूनें आपले पाश घातले आहेत, हा समय असला वादविवाद करण्याचा नव्हे हें तुह्मी जाणतांच आहां. पण माझें धर्मतत्त्व लक्षांत ठेवा ह्मणजे झालें. तें हेंच कीं; सत्य, शुद्ध व पवित्र मार्गाश्रित झाल्यावांचून मुक्ती प्राप्त होत नाहीं. कदाचित् कोणी असें प्रतिपादन करील कीं, हटयोग व कर्मादिक साधनानीं साधक आपल्या वर्तनास निष्कलंक करून इच्छित कृतार्थता पावेल हें कधींही घडावयाचें नाहीं. कारण या साधनांनीं मानसिक इच्छा व तृष्णा यांवर कोणत्याही प्रकारचा परिणाम न होतां सत्य पवित्रता मिळावयाची नाहीं. यासाठीं मनुष्यांनीं होईल तितकें करून पवित्रता साधावी. मग निर्वाण ह्मणजे लांब व सायासाचें नाहीं. या भाषणानें **सुभद्र** तत्क्षणीं **गौतमा**चा शिष्य झाला. पुनरपि **गौतम आनंदाकडे** वळून बोलूं लागला कीं, अरे **आनंदा**, आतां हे माझ्या मुखांतून शब्दजाल चाललें आहेत ते बंद झाले ह्मणजे मी गेलों मी नाहींसा झालों असें तुला वाटावयास लागेल; तर असें वाटूं देऊं नकोस. जें तुला आजपर्यंत मीं पढविलें आहे व आपल्या धर्माचा प्रसार केला आहे त्या योगेंच तुला शिक्षण मिळत जाईल. नंतर लोकांनीं एकमेकांशीं कसें वागावें याविषयीं त्यानें थोडासा उपदेश केला. जमलेल्या समुदायाकडे पाहून त्यानें ह्मटलें कीं, जर कोणाला कांहीं विचारायाचें असलें तर विचारून घ्या. आतां यापुढें तुमची आमची भेट होणार नाहीं.

हें वाक्य ऐकून सर्वांचे नेत्र भरून आले. सर्व लोक निःशंक होऊन कोणी ही पुढें विचारण्यास गेले नाहीं. असें पाहून गौतमानें आकाशाकडे तंद्री लावली, सूर्य, तारे, खगोल, भूगोल वायु इत्यादि सर्व जग मनांत आणलें आणि प्रेमळ व उंच स्वरानें बोलावयास प्रारंभ केला. तो ह्मणाला या जन समूहांत ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून माझा उपदेश घेतला आहे व धर्मतत्वाचा स्वीकार केला आहे त्या सर्वांचें कधींही पतन व्हावयाचें नाहीं. परंतु त्यांची धर्मबुद्धींत सुधारणाच होईल व त्यांस त्यांचें खरें कर्तव्यकर्म समजेल. तर सर्व जन हो, मनुष्याचे शरिरावयव व त्यांजमध्यें जी कांहीं चलन वलन करण्याची एक अद्भुत शक्ति आहे या दोहींचा काळ गतिनुसार कधीं तरी वियोग व्हावाच पाहिजे. ह्मणून तत्परता राखून मुक्ति साधा ह्मणजे झालें. हे शब्द बोलून गौतम अखेरच्या वेदनांनीं व्याकूळ झाला व त्याच स्थितींत त्यानें आपलें प्राणोत्क्रमण केलें.

गौतम बुद्धाचें, जन्मापासून तों त्याच्या मृत्यूपर्यंत बुद्ध धर्मग्रंथांत प्रचरित असलेलें वर्णन व चरित्र समग्र तर नव्हेच, पण साधारणपणें दिशा दर्शनापुरतें मागें दिलेंच आहे व त्याप्रमाणें त्यानें केलेल्या उपदेशाचें ही वर्णन केलेलें आहे. त्यावरून हें सहजपणें लक्षांत येईल कीं, गौतमानें ज्या धर्माचा प्रसार व उपदेश केला तो धर्म ब्राह्मण धर्मास अगदीं विरोधी असा प्रत्याघातकारी दिसत होता. तसेंच, गौतम हा नास्तिक होता, ब्राह्मण धर्माचा तो तिरस्कार करीत असे; सर्व देशांत त्यानें भ्रष्टता करण्यासाठीं ढोंग मानविलें होतें आणि सनातन पुष्कळ दिवस चालत आलेला जो धर्म त्याची निरर्थक क्रांति त्यानें चालविली होती असें त्याजवर पुष्कळ आक्षेप घेतलेले आहेत. या संबंधानें विचार करून पाहतां असें दिसतें कीं, ब्राह्मण धर्माचें गूढतत्व आणि त्यापासून होणारा दुर्धर परिणाम हीं मात्र त्यानें उजेडांत आणलीं. हा विचार निःपक्षपातानें व स्वच्छ अंतःकरणानें केला ह्मणजे गौतमाची योग्यता कळल्यावांचून राहणार नाहीं. त्याचें थोडेसें जें चरित्र दिलें आहे त्यावरून निःशंकपणें इतकें मानलें पाहिजे कीं, धर्मसंबंधी विचार म्हणण्यासारखे सुधारलेले नसून लोकांच्या मनाचा ग्रह स्थापित धर्माविरुद्ध झालेला नम्हता अशा अडचणीच्या वेळामध्यें

धैर्यानें व प्रसंगीं मृत्यूचेंही भय न बाळगतां यानें आपला उपदेशक्रम अव्याहत् चालविला तेव्हां तो कोणी तरी प्रसादी प्राणी होता. दुसरें असेंही मानतां येईल कीं, बौद्ध धर्माचा अल्प काळांत मोठा प्रसार झाला होता आणि इतर धर्मांच्या तुलनेंत आतां देखील त्या धर्माच्या अनुयायांचें मान फारच मोठें आहे, तेव्हां गौतमानें उपदेशिलेल्या धर्माचें तत्व गृहणीय व व्यवहारास सोईचें असें होतें. एकंदरीनें पाहतां या साधु पुरुषावर जे अनेक प्रकारचे प्रहार या व अनेक देशांत झाले आहेत व होत आहेत ते अतिशय अश्लाघ्य आहेत. यास प्रमाण हेंच कीं, तो राजपुत्र असतांही सर्व संगपरित्याग करून यानें धर्माचें रहस्य अज्ञ, ज्ञानी, श्रीमान, दुबळे, राजा, रंक, अधिपति आणि सेवक यास सारखें शिकविलें. सर्व मनुष्यांत त्यानें भेदाभेद मानला नाहीं. तसेंच त्याचा जन्म आणि विद्या हीं आपणां हिंदु लोकांमध्येंच झालेलीं होतीं. त्याच्या समजुती या देशांतील लोकांच्या समजुतीप्रमाणें होत्या. आणि ब्राह्मण धर्माची जी त्याला लहानपणापासून दीक्षा मिळाली होती तींत कांहींएक कंपेश न करतां किंवा धर्मांतर न करतां तो त्या स्थितींतच मेला. यासाठीं त्याजवर धर्मक्रांतीचा किंवा नास्तिकपणाचा आलेला अरोप खरा नाहीं असें सिद्ध होतें. नीति संबंधानें गौतमानें जो उपदेश केलेला आहे तो ब्राह्मण धर्मपुस्तकांतील नीतीपेक्षां वेगळा नाहीं. प्रस्तुतकाळीं आमच्या देशांत धर्म सुधारण्याविषयीं जे चोहोंकडे प्रयत्न सुरू आहेत त्यांशीं त्याच्या उपदेशाचें पुष्कळ साम्य दिसतें. आणि आतां जें आपणांस वाटत आहे तेंच त्याच्या अनुभवास अडीच हजार वर्षांपूर्वीं येऊन चुकलें होतें. तस्मात् आजपर्यंत या भूतलावर जे जे धर्म संस्थापक होऊन गेले त्यांत गौतमाची योग्यता मोठी मानली पाहिजे.

गौतमानें शोधन करून काढलेला धर्म अगदींच निराळा व काल्पनिक होता असें अगदीं नाहीं. त्याच्या पूर्वीं या देशांत जे धर्मसंस्थापक होऊन गेले होते त्यांना जें तत्व मान्य, त्याचाच त्यानें प्रसार केला त्याचें महत्व वाढविलें आणि त्यास व्यवस्थेशीरपणा आणला. हें त्याचें कृत्य त्यावेळींदेखील कित्येक ब्राम्हण तत्वज्ञांस अमान्य झालें नाहीं. त्याचे जितके शिष्य झाले त्यांत ब्राम्हणच प्रमुख होते. स्वतां त्यानें

ब्राम्हणाचा कदापि अवमान केला नाहीं. ब्राम्हण हे सर्वत्र आदराला पात्र आहेत असें तो प्रतिपादन करी. त्याच्या पंथांत जे कोणी, साधु किंवा योगी लोकांप्रमाणें वागत त्यांस त्यानें ब्राम्हण असें म्हणावें व त्यांची मोठी प्रशंसा करावी. **गौतमास** नास्तिक व ब्रम्हधर्म द्वेष्टा असें म्हणण्याचा जो प्रघात पडला तो कांहीं योग्य कारणामुळें पडलेला आहे. तें कारण हें कीं, विप्रांस आणि अतिशूद्रांस सारख्या रीतीनें निर्वाण स्थितीचा मार्ग साधतां येतो. त्यास कर्म मार्गाचें प्रयोजन नाहीं मनुष्यानें केवळ **सदाचार** संपन्न झालें म्हणजे पुरें आहे. असें तो प्रतिपादी. आणि ब्राम्हणांचें म्हणणें असें होतें कीं, कर्माशिवाय मुक्ती प्राप्त होत नाहीं, अतिशूद्र तर या अधिकारापासून च्युत झालेले आहेत आणि हें **गौतमाचें** मत धर्माच्या खंबीर इमारतीस अत्यंत अश्रेयस्कर आहे. याप्रमाणें भिन्न मतानुवादानें त्यावेळीं मोठी खळबळ होऊन **गौतमास** अनेक प्रकारचीं लोकांनीं दूषणें लावलीं. परंतु **अशोक** म्हणून जो महा बलाढ्य सार्वभौम राजा झाला त्यास **गौतमाचा** उपदेश मान्य होऊन त्याच्या प्रतापानें या धर्मतत्वाची चर्चा झाली व पुढें त्या प्रांतांत बहुतेक तें पसरत चाललें. **गौतमावर** अरोप येण्यास हें योग्य कारण कदाचित् ब्राम्हणाच्या संबंधानें खरें आहे असें मानलें तरी, भिन्नता काढून एक वाक्यता करावयाची या दृष्टीनें पाहिलें असतां त्याला दोष देण्यास स्थल नाहीं. त्याचा उपदेश अतिशय मोहक होता. **अशोक** चक्रवर्तीची कारकीर्द संपल्यावर पुष्कळ दिवसांनीं **गौतमानें** स्थापलेल्या धर्मांत आणखी महदंतर होऊन त्याचा ऱ्हास होत चालला. तरी पण इतकें खचीत आहे कीं, **गौतमानें** केलेल्या उपदेशांत घेण्यायोग्य व आचरण करण्यायोग्य असें पुष्कळच आहे. हें कोणाच्यानें ही नाहीं म्हणवणार नाहीं. त्यानें जो उपदेश केला तो ब्राम्हण धर्माच्या आधारावरच केला आणि त्याचें स्वतांचें शिक्षण ब्राम्हण धर्माचेंच होतें. तस्मात् त्यास दोष देण्यास कोणत्याच प्रकारें कारण नाहीं. अस्तु याचें तात्पर्य हेंच कीं, हिंदुस्थान देशांत जितके धर्म संस्थापक होऊन गेले त्यांतीलच हा एक मोठा संस्थापक होता यांत संशय नाहीं. असे धर्म पुरस्कर्ते ईश्वराच्या कृपेनें ज्या दिवशीं या भूमींत अवतीर्ण होतील तेव्हांच धर्मग्लानि नाहींशी होईल.